वामन निंबाळकर

दलित साहित्य

स्वरूप व भूमिका

REFBK-002510

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचनाः—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५[८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

2 NOV 1986

92/99

28 NOV 1990

14 NOV 1992

(कृ. मा. पहा)
५०००-३-८४

दलित साहित्य : स्वरूप व भूमिका


REFBK-0025109

It may be your interest
to be our master
But how can it be ours
to be your slaves

Thucydides

दलित साहित्य : स्वरूप व भूमिका

वामन निंबाळकर

प्रबोधन प्रकाशन, नागपूर

प्रबोधन प्रकाशन – १३

दलित साहित्य : स्वरूप व भूमिका– वामन निंबाळकर

© सर्व हक्क सुरक्षित


पहिली आवृत्ती १ जून १९८६

किंमत २४ रुपये

पृष्ठे ८+१३०

प्रकाशक : प्रबोधन प्रकाशन,
१० /२ एम. आय. जी. कॉलनी,
मेडिकल चौक, नागपूर–४४० ००३

मुद्रक : चंद्रकांत तापस
श्री प्रसाद मुद्रण
८ वर्धा मार्ग, नागपूर–४४० ०१२



ज्यांनी, आम्हा सर्व भावांना आई-वडिलांचे प्रेम दिले व आमची आयुष्ये उभी करण्यासाठी अतोनात कष्ट केले, ते माझे मोठे भाऊ सदाशिवराव निंबाळकर यांच्या आठवणींना–

– वामन निंबाळकर

अनुक्रमणिका

- दलित साहित्याची पार्श्वभूमी १
- दलित साहित्य ९
- दलित साहित्याची प्रेरणा २०
- दलित साहित्याचे स्वरूप व भूमिका ३०
- दलित साहित्याची व्याप्ती ४२
- दलित कवितेचे पहिले तप ४७
- दलित कथा : एक अभ्यास ८०
- दलित आत्मकथा : वेदनांचे आलेख १०६
- दलित रंगभूमी ११७
- दलित साहित्याचे वैचारिक बळ १२५

मनोगत

गेल्या बीस-बावीस वर्षात दलित साहित्याचा प्रवाह रूंदावला असून तो सशक्त व गतीमान झाला आहे. सुरवातीला या साहित्याबाबत विरोधकांनी पसंतीचा पान्हा चोरला होता. अनेक प्रश्न निर्माण करून नविन निर्माण झालेल्या या प्रवाहाला मूळातच आटवून टाकण्याचे नेहमी प्रमाणेच डाव टाकल्या गेले. तरल, निखळ, कलावादी समीक्षेचे चष्मे लावून आपल्याच सौंदर्यशास्त्राच्या फुटपट्ट्यांनी या जीवनवादी साहित्याचे मोजमाप करण्याचा हास्यास्पद हटवादीपणा करून पाहिला. परंतु स्वयंप्रकाशाने दैदिप्यमान झालेल्या या साहित्याला उसनी बेगडी समिक्षा नको होती, सौंदर्यशास्त्र नको होते. प्रगल्भ, कसदार, रेखीव, ठसठसीत, उदंड साहित्य निर्मितीने विरोधकांचे ताबुत थंड पडले. आपल्या जीवनवादी कविता, कथा, आत्मकथा, नाटक इत्यादी वाङ्मय प्रकारांनी दलित साहित्य समृद्ध होत आहे. याच काळात त्याची वैचारिक भूमिका व समीक्षा लिहिण्याचे काम झाले. त्याला आकार येत गेला. त्याचे वेगळे अस्तित्व, सौंदर्यशास्त्र, त्याचे निराळेपण व मोठेपण सिद्ध होत गेले, मान्य होत गेले.

या दलित साहित्याच्या प्रारंभ काळापासून निर्मितीचा कवी कलावंत म्हणून आपली भूमिका पार पाडीत असताना केव्हा केव्हा त्यातील कविता, कथा, त्याचे स्वरूप व भूमिका, मूल्य व प्रेरणा इत्यादी विषयी चर्चा करावी लागली, त्या निमित्ताने लिहावे लागले, बोलावे लागले. या प्रासंगिक लिहिलेल्या लेखांचे संकलन म्हणजे 'दलित साहित्य : स्वरूप व भूमिका' हे पुस्तक होय. हे सलग लिहिलेले पुस्तक नव्हे. त्यामुळे यात काही मुद्यांची पुनरावृत्ती झालेली आहे. हे पुस्तक प्रकाशित करतांना तो दोष मुद्दाम काढला नाही. कारण त्या स्वतंत्र लेखांना त्यामुळे बाधा आली असती असे मला वाटते. दलित साहित्याची भूमिका, स्वरूप इत्यादीबद्दल

त्या–त्यावेळी प्रकाशित झालेल्या या लेखांचे पुस्तक निघावे असे काही मित्रांनी सुचविले.

या लेखांमधून काही मुद्दे स्पष्ट व निर्णायक मांडले आहेत. दलित कोणाला म्हणावे, दलित साहित्याची व्याप्ती, त्याचे स्वरूप व भूमिका या विषयी काही विचारवंत व समिक्षकांची वेगवेगळी मते देऊन त्यानंतर निष्कर्ष काढण्याचा व या संबंधात थोडीफार असलेली मतभिन्नता पुसण्याचा प्रयत्न केला आहे. तो कितपत साधला हे अभ्यासकांनी ठरवावे. कलावंत म्हणून जे मांडायचे ते मांडले आहे. समीक्षक म्हणून नव्हे.

या लिखाणात शोध प्रबंधाचा खोल अभ्यास दिसणार नाही; कदाचित पांडित्यपूर्ण समीक्षेची भाषा आढळणार नाही. परंतु मतांची स्पष्टता, विचारांची दिशा आणि भूमिकेचा ठामपणा निश्चित दिसेल असे मला वाटते. दलित साहित्याचे विद्यार्थी, अभ्यासक व दलित साहित्यिक इत्यादींना मदतनीस म्हणून जरी या पुस्तकाने काम केले तरी मला समाधान मिळेल.


पुस्तक प्रकाशित करावे म्हणून माझे मित्र प्रा. अनिल सोनार, डॉ. यशवंत मनोहर, माझी पत्नी सौ. स्नेहलता निंबाळकर यांनी सतत तगादा लावला नसता तर कदाचित अगोदरच उशीर झालेल्या या पुस्तक प्रकाशनाला अजूनही उशीर झाला असता.

श्री प्रसाद मुद्रणाचे श्री चंद्रकांत तापस, त्यांचे कर्मचारी यांचे कष्ट नेहमीचेच. त्यांचा आभारी आहे.

नागपूर
दि. २३ मे १९८६

—वामन निंबाळकर

दलित साहित्याची पार्श्वभूमी



दलित साहित्याची पार्श्वभूमी पाहताना येथील सामाजिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक परिस्थिती व तिचा मराठी वाङ्मयावर झालेला परिणाम (कारण आजतरी दलित साहित्य प्रामुख्याने मराठीतच निर्माण होत आहे.) या बाबींचा विचार करणे क्रमप्राप्त आहे.

या देशातील मागील हजार दिडहजार वर्षांचा सामाजिक इतिहास पाहिला तर चातुर्वर्ण्याधिष्ठीत समाजरचना हा येथील समाज व्यवस्थेचा मूळ पाया मानल्या गेला आहे. या विषम समाज रचनेला मान्यता म्हणून धर्मग्रंथांचा आधार दिल्या गेला देवाकडून तिची महती वदवून घेतल्या गेली. हे सारे धार्मिक ग्रंथात लिहून ठेवले. तसेच या ग्रंथप्रामाण्यवादाला आचारसंहिता मानल्या गेले. अशा सामाजिक विषमतेने काही ठराविक लोकांना अर्थप्राप्तीची वेगवेगळी साधने दिली, अधिकार दिले व काहींना अर्थार्जनापासून दूर ठेवले. तसेच काहींना ज्ञानार्जन करण्याची मुभा

दिली. तर काहींना तो अधिकार नाकारला. साहाजिकच समाजाचा एक प्रमुख घटक अर्थाजन व ज्ञानार्जनापासून वंचित राहिला. त्याच्या या दुबळेपणाने समाजाच्या एका अंगाला अर्धांगवायू झाला होता असे म्हणता येईल.

चातुर्वर्ण्याची उत्पत्ती

चातुर्वर्ण्याची उत्पत्ती सांगताना निरनिराळे पवित्रे घेतले जातात. धर्म, धर्मग्रंथ व देवाचा हवाला देऊन असे सांगण्यात येते की चातुर्वर्ण्य हे ब्रह्म याचेच अपत्य आहे ब्रह्माच्या तोंडावाटे ब्राह्मण, बाहुतून क्षत्रिय, मांडयातून वैश्य व पायातून शुद्र जन्माला आले. ब्राह्मणाने ज्ञानार्जन करणे, पूजाविधी करणे, मंत्रोच्चार करणे व खालच्या तिन्ही वर्णांना उपदेश करणे असे सांगण्यात आले. खालील तिन्हीही वर्णांनी ब्राह्मण हा पूजनीय मानावा, त्याला दान करावे, त्याची पूजा करावी, असा नियम घालण्यात आला क्षत्रियाने ब्राह्मण व इतरांचे रक्षण करावे, राज्य करावे, लढाया कराव्या व खालच्या दोन्ही वर्णांकडून सेवा करून घ्यावी, मात्र ब्राह्मणांना आदराने, सत्काराने वागवावे, वैश्याने व्यापारउद्दीम करावा व शुद्राने वरील तिन्हीही वर्णांची फक्त सेवा करावी हे दंडक होते.

चातुर्वर्ण्याच्या उत्पत्तीबद्दल दुसरे मत असे की सुरवातीला जाति-प्रथा वा वर्णव्यवस्था नव्हती. कोणीही कोणताही व्यवसाय करीत असे. ज्याच्या त्याच्या आवडीनुसार धंदे चालत. ज्ञानार्जन, अध्यापन करणारे ब्राह्मण, जे राज्यकारभार करीत ते क्षत्रिय, व्यापार करीत ते वैश्य व सर्व लोकांची सेवा करीत ते शुद्र असे संबोधण्यात येई. हे धंदे गुणवाचक असत. अशी श्रमविभागानुसार बनलेली ही सामाजिक व्यवस्था होती. पण कालांतराने श्रमविभाग व्यवस्था मोडून गेली व गुणवाचक नामकरणे जातीवाचक झाली. ज्ञानाचा लवलेश असो वा नसो, तो शहाणा, चतुर असला काय किंवा नसला काय, किंवा मूर्ख व भ्रष्ट असला तरी तो जर ब्राह्मण कुटुंबात जन्माला आला तर तो ब्राह्मण ठरे. त्याचे सामाजिक श्रेष्ठत्व वरचे असे. क्षत्रिय कुळात जन्मलेला शूर नसला व त्याला शस्त्रास्त्रे

चालविण्याचे ज्ञान नसले तरी तो क्षत्रियच म्हणूनच ओळखल्या जावू लागला. व्यापार उदीमाचे कवडीचेही ज्ञान नसलेला परंतु वैश्य कुळात जन्मल्यानेच वैश्य झाला. ज्ञान व अक्कल हुशारीने कितीही मोठा असला तरी शुद्राची गणना चवथ्या वर्णातच झाली. या चातुर्वर्ण्याचे पुढे जातीत रूपांतर झाले. भाषा, प्रांत, वेशभूषा, चालीरिती, इत्यादिमुळे प्रांतवाद, भाषावाद, पोटवाद, उपजातींची निर्मिती झाली. व देशात जबरदस्त वर्णकलह माजला.

चातुर्वर्ण्याची अजून एक उत्पत्ती अशी सांगितल्या जाते की सिंधु नदी पलिकडील आर्यांनी हिंदुस्थानातील मूळ रहिवाशांवर आक्रमणे केली व त्यांना युद्धात पराभूत केले. युद्धात पकडल्या गेलेल्यांवर गुलामगिरी लादली व त्यांच्या कडून सेवेची हलकीसलीकी कामे करवून घेऊन त्याला गावाबाहेर ठेवण्यात आले. पुढे त्यांना अस्पृश्य संबोधण्यात येऊ लागले. युद्धात पराजित झालेले हाती न लागता जे जंगलात पळून गेले ते आजचे आदिवासी. गोंड, भिल्ल, कोरकू, संताळ या अदिवासी जमाती होत. आर्यांच्या आगमनापूर्वी या देशात जातियता नव्हती.

या सर्व उत्पत्तीतील खरेखोटेपणा शोधताना एक गोष्ट निश्चित लक्षात येते की या मनुष्य निर्मित जातियवादाला धर्माचा व धर्मग्रथांचा आधार दिल्या गेला. त्यामुळे या देशातील कोट्यावधी लोकांचे जीवन हजारो वर्षे अन्याय, अत्त्याचार, अज्ञान, दारिद्रय, लाचारी इत्यादित सडत, कुजत राहिले.

संतांचे कार्य

हा जातियतेचा वारसा मराठी वाङ्मयाने जोपासला. वेद उपनिषदे, रामायण, महाभारत, गीता, मनुस्मृती या वैदिक वाङ्मय परंपरेच्या कुशीतच मराठी वाङ्मयाचा जन्म झाला. ज्ञानेश्वर, चक्रधर, मुकुंदराज हे मराठी वाङ्मयाचे जन्मदाते व त्यानंतरचे नामदेव, एकनाथ, रामदास तुकाराम या संत मंडळीने ईश्वराच्या नावाचा गजर करीत भक्ती महिमा गायिला व वेद, स्मृती, रामायण, महाभारतातील भेदाभेदाच्या वृत्ती

सांभाळून ठेवण्यास कुचराई केली नाही. सामाजिक भेदाभेदाच्या उतरंडी जशाच्या तशाच ठेवण्यात संतानी, पंतांनी व शाहिरांनीही धन्यता मानली, नव्हे त्यांनी तो धार्मिक कार्यक्रमच हाती घेतला. कारण नंतर झालेल्या मुसलमानाच्या आक्रमणांनी व आलेल्या इस्लामी राजवटीने त्यांचा धर्म व देव धोक्यात आला होता. हजारो वर्षांची परंपरा नष्ट होते की काय अशी भीती त्यांना वाटू लागली. म्हणून त्यांनी आपली सर्व प्रतिभा व अक्कल हुशारी पणाला लावून भक्तीने मोक्ष मिळतो, सरळ स्वर्गात जाता येते असा टाहो फोडून व ईश्वराचे गुणगाण करून पुन्हा सर्वसामान्य माणसाचा मेंदूला व डोळ्याला अध्यात्माच्या झडपा लावण्याच्या आटोकाट प्रयत्न केला.

संतांनी वर्णव्यवस्था टिकविण्यासाठी जीवाचा आटापिटा करून ईश्वरशाहीचा गजर केला. ईश्वर हा जळी, स्थळी, काष्ठी व पाषाणी आहे. तो माणसाला त्याच्या कर्मानुसार त्या त्या कुळीत जन्माला घालतो. त्या सर्वकर्त्या करवित्या ईश्वराजवळ प्रत्येकाच्या पापपुण्याचा जमाखर्चाची खाती असून त्या त्याप्रमाणे मनुष्य प्राण्यास तो त्या वर्णात जन्माला घालतो. अशी पापपुण्याची भीती दाखवून संतांनी जातियता सांगणारी वर्णव्यवस्था शब्दबद्ध केली. ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास, नामदेव, एकनाथ यांच्याबरोबरच चोखाबासारख्या दलित संतानेही विषमतेला जोपासणारे व ईश्वरशाहीची महिमा सांगणारेच अंभग लिहीले.

या धार्मिक स्थितीने समाजासमाजातील जातियतेचा साखळदंड मजबूत होत गेला.

परकीयांच्या शासनाचे परिणाम

याच सुमारास भारतावरील मुसलमानांचे राज्य व नंतरचे ब्रिटीश राज्यकर्ते यांच्या आगमनाने येथील समाजमनावर परिणाम झाला. अस्पृश्यतेच्या छळामुळे काही अस्पृश्य मुसलमान झाले. व ब्रिटीश राजवटीत ख्रिश्चनही झाले. ब्रिटीशांच्या वेळी शिक्षणाच्या सोयीने खालच्या समाजाला शिक्षणाचे दरवाजे उघडे झाले. त्यांना एक नवी दिशा मिळाली.

बुद्धीवादी ज्ञानवंत डोळस समाज निर्माण होऊ लागला. हजारो वर्षे ज्यांच्यासाठी शिक्षणाचे दरवाजे बंद होते ते अस्पृश्य हळूहळू शाळेची पायरी चढू लागले राजर्षी शाहू महाराज, क्रांतीवीर ज्योतिबा फुले, आगरकर, लोकहितवादी यांच्या लेखनाने व कार्याने या तळागाळातील समाजाचा अन्याय अत्त्याचार वेशीवर टांगल्या जावू लागला अंधश्रद्धा, चमत्कार, कर्मकांड यांच्यावर प्रहार होऊ लागले. रूढी, परंपरा, धर्म यांना सुरुंग लावण्याचे काम या मंडळीनी केले. इंग्रजांच्या आगमनाचे ते फलित होते. साहित्य निर्मितीची पारंपारिक, अध्यात्मिक विषयांऐवजी नवीन लेखन या काळात झाले परंतु मध्यम वर्गीय मर्यादा मात्र ते ओलांडू शकले नाही. पाश्चात्य संस्कृति व येथील चातुर्वर्णाचा वारसा जोपासणारी वैदिक संस्कृति यांच्या तूलनेत पाश्चात्त्य संस्कृती ही उजवी ठरते. ती माणसाच्या गतिचा विचार करते. विज्ञानाचा स्वीकार करते आणि माणसाला रूढी परंपरेच्या बेडचा तोडायला स्वातंत्र्य देते. मनूच्या वारसदारांनी निर्माण केलेले मराठी वाङ्मय बदलाचा हा काळ ठरतो. देवाला पायतानाने झोडपणारे केशवसुत याच काळाची निर्मीती होत. परंतु एखादे केशवसुत वगळले तर मराठी साहित्यिकांना परंपरा मोडता आल्या नाहीत.

मार्क्सवादी साहित्य

तंतर पुरोगामी साहित्याची लाट आली. मार्क्सवादाने रशिया, चीन मध्ये क्रांत्या झाल्या होत्या. त्या विचाराचे साहित्य जागतिक पातळीवर पुरोगामी साहित्य समजल्या जाऊ लागले. त्याच विचारांनी प्रभावित होवून काही लेखकांनी मराठीत लेखन करण्यास प्रारंभ केला. हा १९३०-३५ च्या पुढचा हा काळ होता. आपल्या देशातील वर्णवादाच्या जातीयतेच्या रूढी परंपरेच्या विरोधातला कसलाही विचार यांच्या साहित्यात नव्हता. येथील समाजवास्तवतेचे भान न ठेवता त्यांच्या कल्पनेतल्या वर्णवादाचे ते गणित मांडू लागले. येथे विषमता सांगणाऱ्या चातुर्वर्ण्य, धर्म, जाति ह्या पहिल्या पायऱ्यांवर पाय न ठेवता ते एकदम शेवटच्या

विषमतेच्या पायरीवर उडी घेऊ लागले. येथील धर्मात सांगितलेली जातियता मोडणे त्यांना त्यांच्या फायदयाचे वाटले नाही. कारण स्वकीयांशीच विद्रोह, संघर्ष करावा लागणार होता. तो त्यांना परवडणारा नव्हता. तात्पर्य, ते तत्वनिष्ठ नव्हते तर पोथीनिष्ठ होते. येथेही त्यांची पोथीनिष्ठा त्यांना सोडता आली नाही. भारतीय समाजात अस्पृश्य, शूद्र आदिवासी हे खालचे समजले जात आहेत. वरच्या जातीत घनघोर दारिद्रच घेऊन जन्मलेला मजूरसुद्धा श्रीमंत व ज्ञानी अस्पृश्याला अजूनही दूर ठेवतो, आपल्या बरोबरीचाही समजत नाही ही गोष्ट या 'पुरोगामी' लेखकांना कधीच दिसली नाही, दिसणारही नव्हती. कारण ते प्रथम हिंदू होते व नंतर मार्क्सवादी. मार्क्सवादाचा घसाफोड करणाऱ्या येथल्या कामगार नेत्यांनीही मजूर-कामकऱ्यांच्या डोक्यातील जात काढण्याचा कधीही प्रयत्न केला नाही. त्यांनी जातीच्या पायांवरच आंदोलने उभारण्याचे लंगडे प्रयत्न केले. 'धर्म ही अफूची गोळी' म्हणणाऱ्या मार्क्सचे भारतीय वारसदार हे असे होते. हिंदू धर्माच्या, चातुर्वर्ण्याच्या व जातीयवादाच्या चौकटीत बसून त्यांना मार्क्सवाद सांगायचा होता. त्यावर साहित्य लिहायचे होते. येथील दलितांच्या आक्रोशाशी, त्यांच्या शोषणाशी अन्यायाशी, त्यांच्या आसवांशी या 'पुरोगामी' लेखकांना काही घेणे नव्हते. 'पुरोगामी' साहित्य लिहून त्यांना रशियन पुरस्कार मिळवायचे होते. रशियाच्या वाऱ्या करायच्या होत्या व नंतर पुन्हा रशियाचे प्रवासवर्णन, तेथील सारे भव्य, दिव्य, उदात्त चित्र येथील झोपडपट्टीतील गावकुसाबाहेरील दलितांना दाखवायचे होते. हे काम मात्र त्यांनी अतिशय निष्ठेने केले.

अनियतकालिके व नवसाहित्य

त्यानंतर मराठी साहित्यात 'लघु नियतकालिकांची चळवळ' व 'नवसाहित्य' असे दोन लघु प्रवाह अनुक्रमे क्षणकाळ व काहीकाळ आले व आटले. त्यांना स्वतःचे अंगभूत 'पाणी' नव्हते. एखाद्या खड्डयात दोन चार तांबे (लोटे) पाणी टाकून त्यालाच नवीन झरे लागले असे म्हणण्याचा तो प्रकार होता.

लहान लहान मुलांनी जसे वाळूचे किल्ले करावे, घरे करावीत, पेरकंडाच्या गाड्या कराव्यात व त्यांच्याशी खेळतांना मोठ्यांची नक्कल करावी, अशाच प्रकारचे लहान मुलांसारखे खेळणारेही मराठी साहित्यात झाले. त्यालाच त्यांनी 'लघु अनियतकालिकांची चळवळ' म्हटले. मुद्रित किंवा हस्तलिखित स्वरूपात वितभर किंवा वीटभर 'वाटेल तेव्हा निघेल' हे घोषवाक्य घेऊन काही अनियतकालिके या मंडळींनी जन्मास घातली. परंतु ती जन्मास आलीत ती स्वत:च्या अन्त्यविधीची तयारी करूनच. ही मंडळी स्वत:स 'यँग्री यंग मेन' किंवा 'गांडूंच्या पिढीचे वारसदार' म्हणवून घेत. यांचा राग फक्त येथील प्रस्थापित मासिकांवर होता. जशी मुले खेळण्यात कधीही गंभीर नसतात, खेळ सोडून केव्हाही पळून जातात, तसेच काहीसे याही मंडळींचे होते.

या जीवनाला काहीही अर्थ नाही. नियती किंवा अनाकलनीय शक्तीच्या भरवशावरच माणसाचा व सृष्टीचा गाडा चालतो. अशा विचारांच्या नव्या वाटलीत जुनीच परंपरावादी दारू 'अस्तित्ववादी' साहित्याच्या नावाखाली विचार मांडणे आजच्या काळात चालू आहे. दुर्बोध किंवा लफ्फेदार कलात्मक शैलीत हा विचार काही साहित्यिक कथा, कादंबऱ्यांच्या माध्यमातून पेरत आहेत. हे क्रांतीकारक साहित्य आहे असा या साहित्यिकांचा गोड गैरसमज आहे. ज्या मराठी समिक्षेला कधीही सूर्य पाहण्याचे डोळे फुटले नाहीत त्या समिक्षेने अंधाराची तरफदारी केली तर तिचे कुठे चुकले ?

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य

१९२७ पासूनच युगप्रवर्तक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याला सुरुवात झालेली होती. ज्यांना ज्ञानार्जनाचे अधिकार नाकारल्या गेले होते त्या पददलित समाजात प्रचंड स्वाभिमान निर्माण करून त्यांना 'शिका–संघटित व्हा– व संघर्ष करा' असा संदेश बाबासाहेबांनी दिला. हजारो वर्षे दगड होवून पडलेला हा समाज चैतन्यमय झाला. युगायुगाची ज्ञानाची तहान बाबासाहेबांना लागली होती. म्हणूनच अनेक विषयांतील सर्वोच्च

पदव्या त्यांनी आपल्या कष्टाने व कर्तृत्वाने त्यांनी मिळविल्या. या ज्ञान-महर्षींच्या संदेशाने सारा पददलित समाज घुसळून निघाला. ज्यांच्या हातात झाडू, खराटे, टोपले असायचे त्यांची मुले पाटी दफ्तर घेऊन शाळेत जाऊ लागली. पुढील प्रकाशयुगाची ती 'निळी पहाट' होती. बाबासाहेबांनी १९४७ व १९४९ साली मुंबईला सिद्धार्थ कॉलेज व औरंगाबादला मिलिंद कॉलेज ही महाविद्यालये काढली. शेकडयांनी व पुढे हजारोंनी दलितांची मुले मुली ज्ञानाच्या क्षितीजावर स्वयं प्रकाशित ताऱ्यांप्रमाणे चमकू लागले व सर्वच आघाडयांवर लढू लागले.

रामायण, महाभारत, पोथ्या, पुराणे, स्मृती ते वाचू लागले. कथा, कादंबऱ्या यांचा अभ्यास करू लागले आणि त्यांच्या लक्षात एक गोष्ट आली की त्यांचा नायक त्यांना वाङ्मयात कोठेही आढळत नव्हता. त्यांची आक्रंदने, त्यांचे उसासे, आसवे व त्यांचे जगण्याचे कोणतेच पदर या वाङ्मयात नव्हते. त्यांचे एखादे पात्र कोठे आढळले तर ते नुसते लाचारी, दारिद्र्याचे प्रतिनिधी म्हणून, टिंगलीचा विषय वनून किंवा सहानुभूतीवर जगणारे. त्यामुळे डॉ. बाबासाहेबांनी दिलेल्या ज्ञानाने, त्यांच्या प्रेरणेने निर्माण झालेल्या अस्मितेने त्याने मराठी वाङ्मयात बंडाचा झेंडा उभारण्यासाठी हात ऊंचावला. माणसाला केन्द्रबिंदू मानून त्याच्या विचारांना त्याने गतीमान केले. तो साहित्य प्रसवू लागला. त्याला दलित साहित्य संबोधल्या जाऊ लागले. मराठी वाङ्मयाशी त्याचे कसलेच नाते नव्हते. त्याची जीवनमूल्ये वेगळी होती, त्याची भूमिका वेगळी होती व त्याचे स्वरूपही मराठी वाङ्मयापेक्षा वेगळे होते. दलित साहित्य या अंधार-युगाच्या पार्श्वभूमीवर उभे असल्यामुळे त्याचे पुढील प्रकाशयुग डोळे दिपविणारे ठरते.

• • •

दलित साहित्य

दलित साहित्य म्हणजे काय या प्रश्नाचे उत्तर शोधतांना सुरवातीला दलित साहित्यातील 'दलित' या शब्दाचा अर्थ, त्याची व्यापकता व व्याख्या अभ्यासणे महत्वाचे ठरेल अस्पृश्य ठेवल्या गेलेला, नाडल्या-पिडल्या गेलेला, कमजोर, दुर्बल, शोषित, बौद्ध, कष्टकरी, मजूर म्हणजे दलित. जो दैन्य, दास्य, लाचारी, अज्ञान, अन्याय, अत्त्याचार इत्यादिचा वाटेकरी तो दलित. पुरातन काळापासून ईश्वराच्या तोंडी धर्मग्रथांतून शूद्रवर्णाचा जो अर्थ सांगण्यात आला तो दलित शब्दाचा अर्थ. मनुस्मृती, गीता, ज्ञानेश्वरी व इतरही हिंदूंच्या धर्मग्रंथातून शूद्र व अतीशूद्र म्हणून ज्यांच्यावर शिक्कामोर्तब करण्यात आले ते दलित. त्यात महार, मांग, चांभार, ढोर, भंगी, गोंड, भिल्ल, कोरकू या व अशाच कितीतरी जाति जमातींचा समावेश होतो.

या दलितांच्या वस्त्या कोठे असाव्या, त्यांनी कोणती कामे करावीत, काय खावे-प्यावे व नेसावे, तात्पर्य त्यांनी कसे जगावे हे उच्चवर्णीयांनी ठरवायचे असे धर्मग्रंथात लिहून ठेवण्यात आले. दलितांचे जगण्या–मरण्याचे हक्क उच्चवर्णीयांनी हिरावून घेतले होते. नव्हे त्याला ते देण्यातच आले नव्हते. असा हा दलित फक्त अंधाराचाच वारसदार होता. परंतु नंतर मात्र त्याला शूद्रवर्णापासून तोडून व्यापक अर्थ देण्यात आलेला दिसतो. जो जीवनाच्या कोणत्या ना कोणत्या अंगाने नाडल्या व पिडल्या गेलेला आहे–तो दलित. मग तो कोणत्याही जाती धर्माचा वा पंथाचा असो. याच वरील विवेचनाप्रमाणे 'दलित' या शब्दाच्या व्याख्या केलेल्या आढळतात. त्यापैकी काही अशा–

डॉ. बाबासाहेब आंबेडकर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या लेखनातून 'दलित' हा शब्दप्रयोग जरी केला नसला तरी या शब्दाचेच समानार्थी शब्द त्यांनी आपल्या ग्रंथातून वापरले १) शेडचूल्ड कास्ट (Scheduled Caste) २) शेडचूल्ड ट्राईब (Scheduled tribe) ३) डीनोटीफाईड. याचे वर्गीकरण व विश्लेषण खालीलप्रमाणे करण्यात आले आहे.

१) शेडचूल्ड कास्ट : अनुसूचित जाती : ज्याना चातुर्वर्णात शूद्रवर्ण संबोधून अस्पृश्य म्हणून ठेवले गेले व ज्यांच्या स्पर्शाचाही विटाळ मानल्या गेला ते. उदा. मांग, महार, चांभार, भंगी वगैरे.

२) शेडचूल्ड ट्राईब : अनुसूचित जमाती : जंगलात, रानावनात रानटी अवस्थेत ठेवून ज्यांना मानवी संस्कृतीचा स्पर्श होऊ दिल्या गेला नाही त्या जमाती. उदा. : गोंड, भिल्ल, कोरकू, संताळ वगैरे.

३) डीनोटीफाईड : विमुक्त जमाती : उपजीविकेचे साधनम् हणून ज्यांना चोऱ्यामाऱ्या, दरोडे यासारखे गुन्हेगारीचे व्यवसाय लादल्या गेले त्या जमाती. उदा. : रामोशी, बेरड इत्यादी

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या 'व्हॉट काँग्रेस ॲंड गांधी हॅव्ह डन टू दी अनटचेबल्स्' या ग्रंथात 'अस्पृश्य' (Untouchables),

'मागास वर्ग' (Depressed classes), 'वेठबिगारी करणारे', (Servile classes) व 'हरिजन' (Harijan) या शब्दांचे प्रयोग जरी केलेले असले तरी ते शब्द समानार्थी असून त्यांचा 'अस्पृश्य' हाच अर्थ त्यांना अभिप्रेत होता असेही त्यांनी प्रतिपादन केले आहे.

युवक क्रांती दल : गेली हजारो वर्षे जातिसंस्थेने जखडल्या गेल्यामुळे भारतीय समाज माणुसकीला पारखा झाला. चातुर्वर्ण्याच्या संकल्पनेचा आधार घेऊन आणि समाज व्यवस्थेच्या मार्फत येथील मूठभर सत्ताधारी वर्गाने भारतातील बहुसंख्य दलितांची सतत वंचना केली आहे. आणि दलितांचे सर्वांगाने शोषण केले आहे.

तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी : दलित हा मानवी प्रगतीत सर्वात मागे पडलेला आणि मागे रेटलेला सामाजिक वर्ग.

डॉ. म. ना. वानखडे : दलित या शब्दाची व्याख्या केवळ बौद्ध अथवा मागासवर्गीयच नव्हे तर जे जे पिळले गेलेले आहेत ते सर्व दलित.

प्रा यशवंत मनोहर : शोषितांची जात शोषित. शोषणाऱ्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक इत्यादी सर्वच प्रकारांनी काळोखलेले शोषितांचे सर्वच नातेवाईक घटक हे 'दलित' होत.

तात्पर्य असे की सामाजिक विषमतेने ज्याला डांबून रूढी, वर्ण वंशपरंपरा, मागासलेपणा, अज्ञान, बेकारी, दारिद्र्य, कर्मकांड, अपमान, दास्य, अन्याय, अत्याचार हे ज्यांचेवर हजारो वर्षे लादल्या गेले व ज्याला पशूहूनही खालच्या स्तराचे हीन आणि अमानुष जीवन जगावे लागले तो दलित. त्याला माणूस म्हणून स्वतंत्रपणे जीवन जगण्याचा, स्वतःची प्रगती, विकास ज्ञानार्जन, धनसंचय करून सुसंस्कृत व संपन्न होण्याचा अधिकारच नाकारल्या गेला होता.

परंतु गेल्या दीड दशकात 'दलित' हा शब्द वेगळे रूप व अर्थ ल्याला आहे. त्याच्याभोवती असलेले न्यूनगंडतेचे व घृणास्पदतेचे कवच गळून पडून त्याला नवीन आशयही प्राप्त झाला आहे. त्याची व्याप्ती वाढली

आहे. आणि ते नवीन अर्थ, आशय व व्याप्ती मराठी वाङ्मयात आणि जनमानसात मान्यताही पावली आहे, त्या संदर्भात जे घडले ते असे–

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जनजागरणाने हा कालपर्यंत दलित समजल्या गेलेला व म्हणून अज्ञातात आणि अज्ञानात वावरत असलेला मानवी समुदाय प्रकाशाची वाटचाल करू लागला. त्याने ज्ञानाची कास धरली.तेव्हा त्याला जागृतीची नवी दृष्टी व जीवनाचे नवे अर्थ प्राप्त झाले. हजारो वर्षांपासून जुलूम, अत्याचार, दैन्य, दास्याच्या शृंखला तोडून हा समाज त्यांच्या विरोधात दंड थोपटून उभा राहिला. तो क्रांतीनिष्ठ झाला, क्रांतीमान झाला, क्रांतीपुत्र झाला आणि सम्यक क्रांतीसाठी त्याने जीवन जगण्याचे नाते संघर्षाशी जोडले, विद्रोहाशी जोडले, मुक्तीलढ्याशी जोडले. म्हणून 'दलित' या शब्दाच्या कालच्या व्याख्याही बदलल्या.

बाबुराव बागुल : दलित म्हणजे वर्णव्यवस्थेला आणि तिच्या समग्र वैचारिक व्यवस्थेला उध्वस्त करू बघणारा. . . . दलित म्हणजे हे जग आणि जीवन नव्याने मांडू बघणारा. . . . दलित म्हणजे या युगाने ज्याचे हात प्रज्ञावंत, प्रलयंकारी केलेले आहेत आणि ज्याच्यासाठी आधुनिक 'शस्त्रे' आणि 'शास्त्रे' उपलब्ध करून दिलेली आहेत तो. या आपल्या दलितांच्या व्याखेत अमेरिकेतील काळा, गोरा, तांबडा, आफ्रो एशियाई देशातील काळा, गोरा, पिवळा येतात.

यशवंत मनोहर : दलित हे ईश्वरी न्याय म्हणून कालपर्यंत जपल्या गेलेल्या शोषित आयुष्याचे, लाचारी, दुःख, अज्ञान, दैन्य व दारिद्र्याचे आणि आज अवघ्या जीवनालाच न्यायाचे अधिष्ठान द्यायला सिद्ध झालेल्या क्रांतीकारी शक्तीचे नाव आहे.

या व्याख्या अभ्यासल्यानंतर असे लक्षात येते की, 'दलित' या शब्दाचा अर्थ आमुलाग्र बदलला आहे. त्याला देण्यात आलेल्या अर्थाने त्याची व्याप्तीही वाढली आहे. या व्याख्यांमधून व विवेचनावरून खालील निष्कर्ष निघतात. काल–

१) दलित म्हणजे चातुर्वर्ण्यातील अस्पृश्य.

२) ज्याचे ईश्वर व धर्माच्या नावाखाली सामाजिक, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक शोषण झालेला तो.

३) ज्याला प्रगतीचे सर्व मार्ग बंद होते तो दलित.

४) समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय या जीवनमूल्यांना डावलून ज्याच्यावर ईश्वर, धर्म, कर्मकांड, ग्रंथप्रामाण्याच्या साधनांनी अमानुष जीवन जगण्याची पाळी आणल्या गेली तो दलित.

परंतु आज, ज्याच्या त्याच्या हातात त्याचेच प्रकाशमान भविष्य आले आहे. काल त्याच्यावर झालेल्या धुंवाधार अन्यायाने तो पार पेटून निघाला आहे. त्याने कालच्या कल्पना आणि संकल्पना मोडित काढल्या आहेत म्हणून आज–

१) कालपर्यंत ज्यांनी त्याला जुलमांच्या जोखडात अडकविले ते ईश्वर, आत्मा, धर्म, पुनर्जन्म, कर्मकांड, चमत्कार, अंधश्रद्धा आदींना नकार देतो तो दलित.

२) अनिश्वरवाद, अनात्मवाद, विज्ञानवाद, बुद्धीप्रामाण्यवाद, तर्कवाद व नीतीवाद जो स्वीकारतो तो दलित.

३) सम्यक परिवर्तन घडवून आणण्यासाठी जो बद्धपरिकर झाला आणि ज्याने जाती, धर्म, भांडवलशाही किंवा अन्य मार्गाने होणारे शोषण थांबविणे हाच आपला जीवनमार्ग बनविला तो दलित.

४) समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय ही जीवनमूल्ये म्हणून जो स्वीकारतो तो दलित.

दलित साहित्य म्हणजे काय ?

भारतीय समाज जीवनातील कालच्या दलित जाणीवेचे आजच्या दलित जाणीवेत झालेले परिवर्तन ही दलित साहित्याची जननी आहे. दलित साहित्याने स्विकारलेली मूल्ये आजपर्यंतच्या मराठी वाङमयातील ललित वा वैचारिक वाङमयाच्या मूल्यापेक्षा वेगळी आहेत. त्यांची प्रकृत्ती

व प्रेरणा वेगळी आहे. आणि त्याचा आशय तर पूर्णतया वेगळा आहे. ही जाणीव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या क्रांतीकारक विचारातून मिळालेली आहे. म्हणून दलित साहित्याचे विवेचन पाहण्याअगोदर मराठी वाङ्मयाबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार काय होते हे पाहणे इष्ट ठरेल.

'आपण आपल्या जीवनाकडे, कर्तव्यधर्माकडे आणि संस्कृतीकडे दुर्लक्ष करीत आहोत. थोडे अंतर्मुख होऊन विचार केला तर आपली जीवनमूल्ये आणि सांस्कृतिकमूल्ये कशी करपून जात आहेत याचे भेसूर चित्र उभे राहील. कारणे काहीही असोत पण आपण अधःपतनाच्या, अवनतीच्या मार्गावरून जात आहोत असे आढळून येईल. तेव्हा तत्परतेने सावध होवून जीवन व संस्कृतीविषयक मूल्ये साहित्यिकारांनी जोपासली पाहिजेत, ती सतेज बनली पाहिजेत, वृद्धिगत केली पाहिजेत. तुमच्या कथा-कादंबऱ्यातील सीता आता लक्ष्मणरेषा ओलांडून जात आहेत. आणि दुष्यन्त शकुंतलेला ओळख देत नाही. ती वनवासी होत आहे. म्हणून मला साहित्यकारांना आवर्जुन सांगायचे आहे की उदात्त जीवनमूल्ये व सांस्कृतिकमूल्ये यांचा आपल्या साहित्य प्रकारातून आविष्कार करा. आपले लक्ष आकुंचीत, मर्यादित ठेवू नका. ते विशाल बनवा. आपली वाणी चार भिंतीपुरती राखू नका. तिचा विस्तार होऊ द्या. आपली लेखणी आपल्या प्रश्नांपुरतीच बंदिस्त करू नका. तिचे तेज, खेड्यापाड्यातील गडद अंधार दूर होईल असे प्रवर्तित करा. आपल्या या देशात उपेक्षितांचे, दलितांचे फार मोठे जग आहे हे विसरू नका. त्यांचे दुःख, त्यांची व्यथा नीट समजावून घ्या आणि आपल्या साहित्याद्वारे त्यांचे जीवन उन्नत करण्यास झटा त्यातच खरी मानवता आहे.'

(२ मे १९५४, विदर्भ साहित्य संघ, नागपूर)

डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे हे साहित्यविषयक मौलिक विचार काय सांगतात? की काल परवापर्यंत मराठी साहित्यिक जीवनमूल्यांचे भान ठेऊन लिहीत नव्हते. त्यांनी चाकोरीबद्ध लिखाण करून आपली वाणी, लेखणी

अत्यंत संकुचित करून ठेवली. ते परंपरावादी होते. म्हणून आजच्या साहित्यिकांना बाबासाहेबांनी दिलेला जीवनमूल्ये जोपासण्याचा, ती वृद्धींगत करण्याचा व सतेज करण्याचा, तसेच दृष्टी विशाल बनवून लेखणी सर्व उपेक्षित, दलितांच्या उत्थापनासाठी रावविण्याचा संदेश हा फक्त दलित साहित्याचाच जाहिरनामा ठरत नाही तर विश्ववाङमयाच्या स्वातंत्र्याची घटना ठरते.

आजचे सबंध दलित साहित्य बाबासाहेबांच्या वरील उद्‌गारांच्या मूलभूत पायावरच उभे आहे.

दलित साहित्य म्हणजे काय याचा विचार करताना 'दलित साहित्य' हा शब्द प्रयोग, प्रथम केव्हा झाला एवढेच पाहून भागणार नाही. तर त्या साहित्याची वाटचाल केव्हा सुरू झाली आणि ती गतीमान केव्हा झाली, त्याला वैचारिक भूमिका केव्हा व कोणती मिळाली याबद्दल विचार करावा लागेल.

'दलित साहित्य संघ' हा शब्दप्रयोग १९५० च्या आसपास झालेला आहे. 'दलित साहित्याचे समालोचन' १२ सप्टें. १९५३ व 'दलित साहित्याची अनास्था' २८ फेब्रु. १९५५ हे अनुक्रमे जनता व जयभीम साप्ताहिकांमध्ये आप्पा रणपिसे यांचे प्रकाशित झालेले लेख वाचावयास मिळतात. परंतु 'दलित' हा शब्द १९३५ अगोदरही काही ठिकाणी वापरात आढळतो. १ मार्च १९५८ ला तर प्रबुद्ध भारताचा 'दलित साहित्य विशेषांक' प्रकाशित झालेला आहे.

हे जरी खरे असले तरी दलित साहित्याला वाङ्मयीन चळवळ (Literary Movement) समजून त्याची निर्मिती, त्याची व्याख्या आणि त्याचा सर्वांगाने समिक्षात्मक विचार १९६७ नंतरच झालेला आहे. याचा अर्थ असा नव्हे की त्या अगोदर साहित्य निर्मिती झाली नाही; ती झाली आहे पण तिला तात्विक भूमिका देण्याचे कार्य नंतरच झाले.

–तर दलित साहित्याच्या अनेक विचारवंत, वाङ्मयीन चिकित्सक, समिक्षक व लेखकांनी व्याख्या केलेल्या आहेत त्या पाहू––

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : दलितांची दुःखे, कुचंबणा, गुलामगिरी, कौटुंबिक अधःपात, विपन्नावस्था, विटंबना, ह्या बरोबरच दारिद्र्यातही जीवनाचे कलात्मक शैलीचे साहित्य म्हणजेच दलित साहित्य होय.

(अस्मितादर्श दि. अं. १९७३, पान ७५)

डॉ. मनोहर ना. वानखडे : दलित साहित्य माणसाला केन्द्रबिंदू मानते. माणसाच्या सुखदुःखाशी समरस होते. व माणसाला सम्यक क्रांतीकडे घेऊन जाते. माणसाच्या समूहाला म्हणजे समाजाला समतेची शिकवण देते. माणसाला महान मानते. दलित साहित्य हे माणसामाणसात वैरभाव न पसरविता ते माणसामाणसात प्रेम पसरविते. (१४, १५ जाने. १९७६, दलित साहित्य सम्मेलन, नागपूर, अध्यक्षीय भाषण)

पु. ल. देशपांडे : अन्यायाविरुद्ध उठताना संतापून फुटणाऱ्या अश्रूंचे मोल सर्वात मोठे असते. सामान्याच्या भाषेत हा तळतळाट असतो. त्याच तळतळाटाचे एक उदात्त स्वरूप म्हणजे दलित साहित्य. (द. सा. संमेलन, नागपूर–७६ स्मरणिका)

बाबुराव बागूल : अस्पृश्यतेशी आणि दास्याशी, विषमतेशी आणि दुःखाशी दलित साहित्याचे वैर आहे. जोपर्यंत अस्पृश्यता, दास्य हे या देशात असेल, तोपर्यंत दलित साहित्य निश्चित आहे. माणसाच्या मुक्तीचा पुरस्कार करणारे, माणसाला महान करणारे, वंश वर्ण, आणि जाती श्रेष्ठत्वाला कठोर विरोध करणारे जे साहित्य असते ते दलित साहित्य असते. (अध्यक्षीय भाषण, दुसरे महाराष्ट्र बौद्ध साहित्य संमेलन' महाड, दि. १३, १४ फेब्रुवारी १९७१)

प्रा. नरहर कुरुंदकर : प्रत्येक मानवाला स्वातंत्र्य, प्रतिष्ठा आणि भीतीशून्य सुरक्षितता मिळाली पाहिजे अशा भूमिकेवरून निर्माण झालेली एक प्रवृत्ती वाङ्मयात अभिव्यक्त होत आहे. त्याला मी दलित साहित्य मानतो.

(निकाय: एप्रिल १९७६, पृ. ५९)

प्रा. शरदचंद्र मुक्तिबोध : दलित वाङ्मय म्हणजे दलितोद्धाराचे वाङ्मय किंवा खांडेकरांच्या 'दोन मने' कादंबरीतील नायकही दलितच आहे.

ह्यात दलित वरिष्ठ वर्गातील असून कनिष्ठ वर्गाकड अनुकंपेच्या दृष्टीने पाहतो. हे दलित वाङ्मय नव्हे किंवा दलित लेखकांनी निर्माण केलेलं वाङ्मयही दलित साहित्य नव्हे. दलित असणे व दलित जाणीव असणे हे भिन्न आहे. दलित जाणिवेतून दलित जीवनविषयक जे वाङ्मय निर्माण होते ते दलित वाङ्मय.

दलित साहित्याचे एक अभ्यासक डॉ. सदा कऱ्हाडे म्हणतात की दलित साहित्यात तीन वृत्ती ध्वनित होतात.

१) बंड, नकार, विद्रोह व प्रक्षोभ यांचा जाणीवपूर्वक उद्घोष करण्याची वृत्ती.

२) असत्य, अन्याय व ढोंग याकर चिडीने आसूड मारूनही समाजाला जोडण्याची वृत्ती.

३) हिंदुधर्म नष्ट करूनच देशाचा भविष्यकाळ उज्वल करू पाहणारी वृत्ती.

(जुलै १९७० दलित साहित्याच्या निमित्ताने, सत्यकथा.)

प्रा. यशवंत मनोहर : दलित साहित्य हे वर्ग बळीचे आणि वर्ण बळीचे साहित्य. बाबासाहेबांच्या वाणीचा हा वाङ्मयीन वणवा आहे. संस्कृतीने ज्यांची पोटे आणि मनेही उपाशी ठेवली त्या उपेक्षितांच्या हृदयाचे, मेंदूचे हे जीवंत ललिताकार आहेत. या साहित्याच्या पोटी एक मानवकेन्द्र सुसभ्य युगाचा गर्भ वादळी निकराने वाढतो आहे.

(दलित साहित्य संमेलन, नागपूर, १९७६ निवेदनातून)

प्रा. गं. बा. सरदार : दलित वाङ्मयाची निर्मिती ही सामाजिक दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण घटना असून या वाङ्मयाचा आशय मराठी साहित्याच्या अभ्यासकांनी तत्परतेने जाणून घेतला पाहिजे.

तीव्रतर दाहक अनुभवांतून व जाणीवांतून या वाङ्मयाची निर्मिती होत आहे, त्यात नवजागृत समाजाची आत्माविष्कारी व आत्मविकासाची जिद्द पदोपदी दिसून येते.

भारतीय समाजाच्या पुनर्घटनेच्या दृष्टीने हे मानसिक परिवर्तन ऐतिहासिक महत्त्वाचे आहे. या दलित वाङ्मयात कदाचित साहित्यगुण कमी असतील. पण नव्याने जाग आलेल्या माणसाची तीव्र संवेदनशीलता व मुक्त भावनोद्रेक त्यात काठोकाठ भरून राहीला आहे. त्यात दुबळेपणाला थारा नाही. त्याची भाषा उघड उघड विद्रोहाची, आव्हानाची आहे. आपल्या पूर्व परंपरेचा त्यांचा अनुभव इतका कडवट व क्लेशदायक आहे की त्याचेवर प्रहार करताना त्यांना मागेपुढे पाहण्याचे कारण नाही. दलित वाङ्मयातील बंडखोरपणाच्या वातावरणामुळे आपल्या समाज परिवर्तनाच्या चळवळीला नवे वळण लागण्याची शक्यता आहे.
(१५ आक्टो. १९७५, मुंबई व उपनगर एकविसाव्या साहित्य संमेलनातील अध्यक्षीय भाषणातून)

प्रा. गं. बा. सरदारांच्या या विवेचनामुळे दलित साहित्याची व्याख्या ठरविण्यास निश्चितच दिशा मिळते.

वरील मान्यवरांच्या दलित साहित्याच्या व्याख्या अभ्यासताना काही मुद्दे आपल्यासमोर स्पष्ट होतात. आणि जे निष्कर्ष निघतात. ते असे–

१) दलित साहित्य हे दलित जाणिवेतून निर्माण झालेले एका नकाराचे व एका स्वीकाराचे जीवनविषयक साहित्य आहे.

२) दलित साहित्य हे वर्ण व वर्गवादाच्या विरोधी वाङमयीन आवाज उठविते.

३) हिंदुधर्मातील चातुर्वर्ण्याचा ते कडाडून विरोध करते व माणसाच्या नीतीमान प्रवृत्तींचा ते स्वीकार करते.

४) प्रत्येक माणसाच्या प्रगतीचा ते आलेख मांडते. म्हणूनच त्याच्यासाठी समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय आणि प्रज्ञा, शील, करुणा या मानवी मूल्यांचा भरभक्कमपणे पुरस्कार करते.

५) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उभ्या केलेल्या अस्पृश्यता निवारण चळवळीतील हा वाङ्मयीन पवित्रा आहे.

६) अ) या देशातील सामाजिक, आर्थिक विषमता, दलितांवरील अन्याय, अत्याचार, दास्य, दैन्य, लाचारी, रुढीवाद, परंपरा-देव, धर्म, चमत्कार, अंधश्रद्धा आदी माणसाचे व माणुसकीचे एक नंबरचे शत्रू आहेत म्हणून.

आ) त्यांच्यापासून माणसाला मुक्त करण्यासाठी 'दलित साहित्य' त्याचा हुंकार झालेले आहे, प्रक्षोभ झालेले आहे, विद्रोह झालेले आहे.

७) दलित साहित्य हे समाजवादी, जीवनवादी, नीतीवादी, जडवादी, भूमिका घेऊनच प्रकटते.

८) मराठी वाङमयाच्या सातशे वर्षाच्या इतिहासात ज्यांना प्रवेशच देण्यात आला नव्हता तो आज ज्या साहित्यातील नायक झाला ते दलित साहित्य.

या वरील निष्कर्षामुळे दलित साहित्य म्हणजे काय हे स्पष्ट होते.

• • •

दलित साहित्याची प्रेरणा

दलित साहित्य प्रवाहाला गती मिळाली ती १९६७ नंतर. दलित साहित्याची मूलभूत भूमिका, त्याची व्याख्या पर्यायाने वैचारिक बैठक आणि जाणीवपूर्वक निर्मितीची प्रक्रिया या महत्त्वपूर्ण गोष्टी या काळातच झाल्या. दलित साहित्याचा नकार, स्वीकार, प्रक्षोभ, विद्रोह, संघर्ष, प्रेरणा, प्रवृत्ती, भूमिका व स्वरूप हे पाहिले तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेले सामाजिक लोकशाहीचे तत्त्वज्ञान याला पायाभूत ठरते. दलित साहित्य हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनक्रांती संग्रामाच्या पार्श्व-भूमीवर उभे आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या जीवनात उचललेले प्रत्येक पाऊल हे येथील विषम सामाजिक व्यवस्थेच्या, परंपरेच्या, रूढीवादाच्या म्हणजेच एका माणसाने दुसऱ्यास लहान करण्याच्या प्रक्रियेविरुद्ध होते. जन्मत:च ज्यांच्या आयुष्याला तुरुंग आणि सुरुंग बांधून येत असत त्यांच्या

मुक्तीसाठी आणि शक्तीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जीवनातील एकेक क्षण क्रांतीपर्व म्हणून वापरला. सबंध पारंपारिक मूल्यांच्या विरोधात उभे ठाकताना त्यांना जीवनाच्या सर्व पातळ्यांवर एकाच वेळी लढावे लागले. हा लढा साधा व सोपाही नव्हता. हजारो वर्षांच्या परंपरेशी, व्यवस्थेशी, ते मानणाऱ्या जातीनिष्ठ, पोथीनिष्ठ मेंदूशी आणि भोंदूशी साध्या तिरकमठ्याने लढणे परवडणारे नव्हते. तसेच ते यशदायीही ठरले नसते. म्हणूनच त्यांनी त्यांच्या चालण्यात, बोलण्यात, उक्तीत आणि कृतीत, आचारात आणि विचारात एक वेगवेडे वादळ बांधून घेतले, बॉम्ब बांधून घेतले आणि त्या हिमालयाएवढ्या दंभाचा स्फोट केला. येथल्या धर्मग्रंथ, स्मृती, पुराणे यांचे त्यांनी डिसेक्शन केले. ज्यांच्या आयुष्याचे मातेरं झालेले होते, त्यांना त्यांनी स्वाभिमानाचे मूल्यवान जीवन बहाल केले. आणि ज्यांच्या तोंडी वा करवी जातिव्यवस्था सांगितली होती, त्या देव, धर्म, आत्मा, धर्मग्रंथ, कर्मकांडाचे पोतेरे केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अफाट कर्तृत्वाने व विचाराने स्वतः किंवा कुणाचा एका व्यक्तीचा विचार केला नाही तर एका प्रचंड जनसमुदायाचा बिचार केला. एका समाजाचा विचार केला. त्याच्या उत्थानासाठी त्याच्याच हातात तत्वज्ञानाचे पलिते दिले. ते नीतीविचार होते, ते क्रांतीविचार होते. म्हणून ते गतीविचार होते. या विचारांमध्ये तळागाळातील समाजाच्या प्रगतीचा शिलालेख होता. त्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवनच आंदोलन झाले होते. या आंदोलनाने दलितांच्या जीवन-जाणीवा बदलल्या. या आंदोलनातूनच अनेकांनी अनेक आशा घेतल्या, दिशा घेतल्या आणि प्रेरणाही घेतल्या. म्हणून आजच्या दलित साहित्याची प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर ठरतात; त्यांचे तत्त्वविचार ठरतात. हे तत्त्वविचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धम्म क्रांतीला प्रेरक मानतात. कारण नव्या जीवन-जाणिवांची मुळे बुद्ध विचारात शोधता येतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मुक्ती संग्राम

भारतीय दलितांच्या मुक्तीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जो

लढा उभारला त्याचे वेगवेगळाले प्रयोग आणि टप्पे आपणास दिसतात. परंतु या सर्वांमध्ये एका विचाराची आखणी व पेरणी केलेली दिसते. हा लढा १९२७ मध्ये महाड येथील चवदार तळ्याच्या सत्याग्रहापासून सुरू होतो. नंतर काळाराम मंदिराचा सत्याग्रह, १९३५ ची येवला येथील धर्मांतराची घोषणा, १९४६ ला सिद्धार्थ व १९४९ ला मिलिंद या कॉलेजेसची मुंबई व औरंगाबादला स्थापना, १९४७ ते १९५० च्या दरम्यान भारतीय घटनेचे लिखाण, स्वतंत्र मजूर पक्ष, शेडच्यूल कास्ट फेडरेशन या पक्षाची स्थापना आणि नंतर रिपब्लीकन पक्षाच्या स्थापनेबद्दलचे विचार, मूकनायक, बहिष्कृत भारत, जनता इत्यादि वृत्तपत्रांचे संपादन, १४ ऑक्टोबर १९५६ ला बौद्ध धम्माची दिक्षा आणि वरील सबंध काळात वेळोवेळी लिहिलेल्या ग्रंथांची निर्मिती या घटनांकडे वरवर जरी पाहिले तरीही एका युगंधराच्या युगप्रवर्तक विचारांची शृंखला आहे असे आपणास जाणवते. हे युगप्रवर्तक विचार भारतीय पददलित माणसाच्या मुक्तीचे विचार होते. ही मुक्ती होती हजारो वर्षे चातुर्वर्ण्याच्या शृंखलांनी बांधून शुद्र संबोधिल्या गेलेल्या मानव जातीची. या मुक्ती संग्रामासाठी त्यांना जी शस्त्रे आणि अस्त्रे हवी होती ती त्यांनी वापरली. म्हणूनच युद्धात ज्याप्रमाणे शेवटी निर्णायक म्हणूनच सर्वात प्रभावशाली अस्त्राचा उपयोग करतात त्याचप्रमाणे बाबासाहेबांनी १४ ऑक्टो. १९५६ ला दिलेली बौद्ध धम्माची दिक्षा म्हणजे हिंदु धर्मातील विषमतेवर सोडलेला प्रभावशाली बॉम्ब होता.

बौद्धधम्मात नीतीला प्रथम स्थान दिले आहे. नीतीविचारच माणसाला मोठा करतो. त्याला समतेच्या पातळीवर जगायला शिकवितो; स्वातंत्र्य प्रदान करतो, न्यायाचे दरवाजे खुले करतो आणि माणसामाणसात बंधुभावाचे नाते प्रस्थापित करतो. म्हणजेच हा विचार सामाजिक जाणीव घेऊन आलेला असतो. याच जीवनमूल्यांचा स्वीकार व हीच जाणीव घेऊन दलित साहित्य प्रकटते. म्हणून ते बुद्धविचाराचे साहित्य असते, पर्यायाने आंबेडकरी प्रेरणेचे साहित्य असते. म्हणूनच ते इतर मराठी साहित्यिकांच्या साहित्यापेक्षा वेगळे असते. हीच भूमिका दलित

साहित्याचा विचार करणाऱ्यांनी मांडली आहे. त्यापैकी काही मान्यवरांचे विचार असे--

म. भि. चिटणीस : दलित वर्गीय लेखकाची प्रेरणा या आणखीन् एका बाबतीत इतर मराठी लेखकांपेक्षा भिन्न आहे. सौंदर्य भावना आणि नीती या त्यांच्या प्रेरणेत एकरूप आहे. कारण त्याची वाङ्मयीन प्रेरणा ही जितकी वैयक्तिक तितकीच सामाजिक आहे. आणखी काही काळ लिहिताना आणि त्याची भूमिका केवळ आपल्या व्यक्तिगत विशिष्ट क्षणाच्या भाव-भावना व्यक्त करीत नसून एका मोठ्या वर्गाच्या शतकांच्या अनुभवातून स्फुरलेल्या भाव-भावना आपण व्यक्त करत आहोत अशी राहणार ! अन्यायाची जुनी समाजरचना मोडून 'समता' पुनर्घटना केल्याविना आपले व्यक्तिगत आणि समाजाचे जीवन सुंदर होणार नाही असा त्यांचा दृढ विश्वास असल्यामुळे त्यांच्या वाङ्मयीन प्रेरणेत नीतीची प्रेरणा अनुस्यूत असणारच.

(अस्मितादर्श ३१ मार्च १९७१, पान ५५)

डॉ. म. ना. वानखडे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या महत्वपूर्ण शहरी आपल्या सर्वांसमवेत धम्मचक्र फिरविले. त्या क्रांतीकारक घटनेतून जे सर्वंकष बंड आणि वैचारिक आंदोलन समाजाच्या ठायी उत्पन्न झाले. त्याचा एक आविष्कार म्हणजेच दलित साहित्य होय, या वैचारिक आणि मानसिक जागृतीतूनच शंकरराव खरात, बाबुराव बागूल इत्यादि लेखकांनी प्रेरणा घेतल्या. आणि या अभूतपूर्व घटनेने शाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या लेखनालाही नवा आशय प्राप्त झाला.

(१७ जाने. १९७६, नागपूर अध्यक्षीय भाषण द. सा. संमेलन.)

बाबुराव बागूल : . . . . त्या उद्‌गाराबरोबरच मला डॉ. बाबासाहेबांचे आयुष्य आठवू लागले.

उच्च विद्याविभूषित डॉ. बाबासाहेब. पण त्यांचा शिपाई त्यांची जात लक्षात घेऊन फायली दुरून फेकून देतो आणि बाबासाहेबांच्या अंगावरून येणाऱ्या वाऱ्याने बाटणारा धर्म असा वाचवतो.

उच्च विद्याविभूषित व तज्ज्ञ बाबासाहेब नोकरी मिळत नाही म्हणून शेअर बाजारात व्यापाऱ्यांना सल्ला मसलत देणारी फर्म उघडतात आणि त्यांची जात कळताच व्यापारी त्यांच्यावर बहिष्कार टाकतात. आणि नंतर महार बॅरिस्टर म्हणून त्यांना धंदा मिळणे मुष्कील होते.

महाडच्या मुक्तिसंग्रामाचे उद्‌गाते बाबासाहेब. पण तहान लागली असताना हॉटेलवाले त्यांना प्यायला पाणी द्यायचे नाकारतात आणि हा युगंधर ढसाढसा रडतो.

ह्या तुच्छतेची, तिरस्काराची, अवमानाची, दुःख यातनांची प्रतिक्रिया अंतःकरणात एका भयंकर वादळाला एका महायुद्धाला, एका बुद्धाला, एका भयानक अभियानाला जन्म देत होती आणि डॉ. बाबासाहेबांनी इतिहास घडविला. युग घडले आणि बाबासाहेब आदर्श झाले. पुराण पुरुष झाले, प्रेरणा प्रकाश देणारे सूर्य झाले.

बाबासाहेबांनी धम्मचक्र परिवर्तन केलेले आहे. तेराव्या शतकापासून निर्वासित झालेला बुद्धधर्म त्यामुळे लाखो अनुयायांचा धम्म झाला. अजिंठा, वेरूळ, सांची, सारनाथच्या अनाथ झालेल्या शिल्पांना वारसा मिळाला आहे. आणि ज्याला डॉ. आंबेडकरांशिवाय दुसरे काही नव्हते त्यांना ज्ञानाची, कलेची, उज्वल इतिहासाची महान संपत्ती मिळाली आहे.

(उत्थानगुंफेच्या निमित्ताने : प्रस्तावना–
प्रबोधन द. सा. संमेलन विशेषांक, १४, १५ जाने. १९७८, मुंबई)

प्रा. रावसाहेब कसबे : आजचे दलित साहित्य जीवनवादी भूमिका स्वीकारणारे व आंबेडकरी प्रेरणेतून निर्माण झालेले आहे. . . . वाङ्मयीन क्षेत्रातून जीवनवादी भूमिकेचा पराभव होण्याने दलित साहित्य वृद्धींगत होईल या भ्रमात राहण्यात अर्थ नाही. उलट जीवनवादी भूमिका जितकी समर्थ होईल तितके दलित साहित्य बहरेल आणि पुन्हा तेच जीवनवादी भूमिका अधिक समर्थ करील . . . . . आजचे दलित साहित्य आंबेडकरवादी प्रेरणेतून निर्माण झाले आहे असे म्हणत असतानाच दलित साहित्यात आंबेडकरवाद आणि मार्क्सवाद असे दोन गट पाडण्याची

अनेकांची खटपट सुरू आहे. भारतातील जातियतेचे संदर्भ ज्यांच्य लिखाणात दिसतात ते आंबेडकरवादी आणि आर्थिक पिळवणूकीचे संदर्भ येणारे लिखाण हे मार्क्सवादी अशी चुकीची मांडणी करण्याची प्रथा पडत आहे. याचे कारण एक तर दलित निर्मितीचे कलात्मक दृष्टीकोणातून कोणीही समीक्षक मूल्यमापन करीत नाही आणि दुसरे सामाजिक, राजकीय दृष्टीकोणातून केलेल्या मूल्यमापनात समीक्षक सांप्रदायिक अभिनिवेश टाळण्यात यशस्वी होत नाहीत. हा दलित साहित्याला मोठा धोका आहे. दलित साहित्याच्या कक्षा निश्चित ठरविण्याचा अविवेकी प्रयत्न अनेक थरातून होत आहे. दलित साहित्यामागची आंबेडकरी प्रेरणा हा एक गतीमान विचार असल्याने दलित साहित्याच्या कक्षा सतत विस्तारत जाणार आणि एक दिवस जीवनवादी भूमिका हे साहित्य आपल्यात पूर्ण सामावून घेणार. ही दृष्टी ठेवूनच दलित निर्मितीचा आणि कलावंताचा विचार करणे आवश्यक आहे.

(आंबेडकरवाद : बुद्धिस्ट पब्लिशिंग हाऊस, नागपूर.)

प्रा. गं. बा. सरदार : दलित समाजात नवचैतन्य व स्वत्व भावनेचा पीळ निर्माण झाला तो डॉ. आंबेडकरांच्या आंदोलनामुळे. ह्या यातनेची वृत्ती नष्ट होऊन आपल्या नैसर्गिक हक्कांसाठी झगडण्याची प्रेरणा त्यांना या आंदोलनातून मिळाली. दास्यवृत्तीचे जोखड झुगारून देऊन समाजाचा स्वतंत्र घटक म्हणून जगण्याची उमेद हा समाज बाळगू लागला. 'आज आम्हाला या खोपटा-खोपटातून पूर्ण सूर्य दिसतोय. त्याच्याकडे पाठ फिरवून यापुढे अंधारयात्रिक होण्याचे आम्ही नाकारणार' असा निर्धार त्यांच्यातील नवकवींच्या शब्दाशब्दातून प्रकट होतो आहे. काळोखाने ग्रास-लेल्या मृतकल्प जीवनाला नकार आणि ज्वलंत प्रकाशमय जीवनाकडे वाटचाल अशा उभारीने त्याचे लेखन चालू आहे.

(शनिवार, १५ ऑक्टो. १९७५, मुंबई व उपनगर
एकविसाव्या साहित्य संमेलनातील अध्यक्षीय भाषण)

प्रा. यशवंत मनोहर : १) माणसाला सर्व शोषणमुक्त करू इच्छिणारा तेजाचा उपासक माणूस या जाणिवेचा म्हणून दलित साहित्याचा लाडका

नायक आहे. वरील जाणिवेने झपाटलेला, त्या जाणिवेला आचार विचारात इमान बहाल करणारा दलित लेखकांचा एक मोठा वर्ग आज महाराष्ट्रात निर्माण झाला आहे. हे दृश्य मराठी साहित्याच्या परंपरांच्या आणि जीवनमूल्यांच्या परंपरांच्या संदर्भात अत्यंत अपूर्व आणि विद्रोही आहे. कर्मविपाकाच्या निर्मात्यांच्या बाहेरचे आहे. इथल्या अध्यात्म्याच्या कल्पने-पल्याडचे आहे. ग्रंथपंथाच्या कल्पना विकासातील तत्त्वज्ञानाच्या कादंबऱ्यातील आणि इथल्या शोषणाधिष्ठीत परंपरा जपणाऱ्या मनामनातील परमेश्वराच्या सर्व शक्तीमान प्रतिभेबाहेरचे विद्रोही दृश्य आहे. हे दृश्य सगुण साकार करणाऱ्या तेजोगर्भ दलित साहित्याला प्रत्यक्ष आणि एकमेव प्रेरणा आहे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ऐतिहासिक क्रांतीकार्याची.

२) ही क्रांती जाणीव मराठीमध्ये आणि भारतामध्येही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने साहित्यविष्कार होत आहे त्या साहित्याविष्कारचेच दलित साहित्य हे नाव आहे.

(दलित साहित्य : सिद्धान्त आणि स्वरूप–१) पान ५६, २) पान ५९)

वरील सर्व विचारवंत व लेखकांनी हे मान्य केले आहे की दलित साहित्याची एकमेव प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच आहेत. परंतु अलिकडे काही दलित व काही दलितेतर लेखक कारण नसताना प्रेरणेच्या मुद्यावर वाद उपस्थित करताना दिसतात. जे दलितेतर लेखक बाबासाहेबांव्यतिरिक्त दुसऱ्या कोणाची प्रेरणा दलित साहित्याला चिकटवीत असतील त्यांना एकतर दलित साहित्याची भूमिकाच कळलेली नाही. किंवा मुद्दाम असे वाद निर्माण करून यात गोंधळ घालायचा आहे. दलितेतरांची हा घोळ निर्माण करण्याची भूमिका एकवेळ समजावून घेण्यासारखी तरी असू शकेल. परंतु सर्वांत घातक आणि अक्षम्य गोष्ट कोणती असेल ती ही की काही दलित लेखक व तथाकथित विचारवंत काही प्रतिभावंत दलित लेखक, कवी व विचारवंतांना बदनाम करण्यासाठी, त्यांना हेतुपुरस्सरपणे मार्क्सवादी ठरविण्याच्या आटोकात प्रयत्नात असतात. कारण इतरांना एकदा मार्क्सवादी ठरविले की मग आपण आपोआपच आंबेडकरवादी ठरतो आणि सर्वसामान्य माणसांची सहानुभूती

मिळवितो असा त्यांचा समज आहे. हा डाव स्वस्त व सोपा आहे. आपले पांढरेपण किंवा उजळपण सिद्ध करण्यासाठी दुसऱ्याच्या सबंध शरीराला डांबर फासून त्यांच्या पार्श्वभूमीवर उभे राहण्याचाच हा प्रकार आहे. आणि मग हेच लोक मार्क्सवाद हा भारतीय दलितांचा एक नंबरचा शत्रु आहे असा आभास निर्माण करतात. त्याचा परिणाम दलितांमधील सर्वसामान्य वाचक व माणूस मार्क्सचे नाव काढताच अंगावर पाल पडल्यासारखा दचकतो. पण मार्क्स भारतीय दलितांचा शत्रु होऊ शकतो का, असेल तर कसा वा नसेल तर का नाही ? या देशातील दलितांचा खरा शत्रु कोण ? व इतरही शत्रु कोण ? मित्र कोण ? आमचा लढा हा कोणाविरुद्धचा व कशासाठी आहे ? इत्यादी प्रश्नांची उत्तरे शोधण्याच्या तो भानगडीत पडत नाही. आणि काही दलित लेखकांना मार्क्सवादी ठरविणारे ते दलित लेखक तसा विचारही करू देत नाही.

या आमच्या भाबड्या मित्रांचा एक विनोद असा की एखाद्या दलित लेखकाच्या किंवा कवीच्या लेखात वा कवितेत शोषण, वर्गलढा, मार्क्स हे साधे शब्द जरी आले तरी तो मार्क्सवादी झाला. अशी कोल्हेकुई हे करतात व ते हे विसरतात की दलितांच्याच लढ्याला आपण स्वतःच अडथळे निर्माण करीत आहोत.

दलित साहित्याची प्रेरणा या मुद्यावर अनेक जागी काही लेखकांनी वाद माजविण्याचा प्रयत्न केल्याने या मुद्यावर थोडे विवेचन केल्यास वावगे ठरू नये.

कार्ल मार्क्स

कार्ल मार्क्स भारतात जन्मला नसल्याने येथील चातुर्वर्ण्याधिष्ठीत सामाजिक विषमतेचा त्याच्या तत्वज्ञानात ऊहापोह केलेला नाही. ही वस्तुस्थिती जरी असली तरी ती काही त्याची चुक नाही. मार्क्सने आर्थिक शोषणाच्या मुद्यावर शोषकांनी शोषितांच्या विरुद्धच्या लढ्याविषयीचे तत्वज्ञान मांडले. म्हणजेच एका विषमतेविरुद्ध लढ्याचे त्याने कुशल पद्धतीने शास्त्रीय विवेचन केले. आर्थिक विषमतेच्या संदर्भात जागतिक

पातळीवर एका प्रचंड विषमतेविरुद्ध व मानवतावादाच्या शत्रुविरुद्ध मार्क्स लढण्याचे सांगतो. जगातील सर्व शोषितांचा जो शत्रु तो भांडवलदार व भांडवलशाही याविरुद्ध मार्क्सने आपले तत्वज्ञान मांडले. भारतात हा शत्रु तर आहेच किंवहुना यापेक्षा कितीतरी मोठा व या भांडवलशाहीच्या शत्रुलाही पोसणारा असा एक जगावेगळा शत्रु आहे. आणि तो आहे जातियवाद. भारतातील जातियवादावरच येथील आर्थिक उतरंडही अवलंबून आहे. म्हणजेच जोपर्यंत या जातियवादाची पाळेमुळे खोदून काढल्या जात नाही तोपर्यंत येथे मार्क्सचाही विचार लागू होत नाही.

बेडेकरांची चूक !

महाराष्ट्रातील एक तरुण लेखक व विचारवंत सुधीर बेडेकर यांनी 'साहित्याचे नवे–बियाणे' या त्यांच्या प्रसिद्ध झालेल्या लेखात दलित साहित्याच्या दोन प्रेरणा शक्ती मानल्या आहेत. एक बाबासाहेब आंबेडकरांची व दुसरी मार्क्सची. त्यांनी आपल्या लेखात म्हटले आहे की समाजाचे आकलन करून लढा उभारण्यासाठी धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक--आर्थिक या घटकांमुळे होणारा अन्याय व पिळवणूक एकात्म आहेत हे जाणले पाहिजे व तिच्या विरुद्धचा लढाही एकात्म असला पाहिजे. विद्रोह संपूर्ण असला पाहिजे ही जाण येथे आहे. खालच्या जाती व इतर गरीब कामगार–शेतकरी, खेड्यात व शहरात एकत्र येत आहेत. ('आम्ही' मासिक, जून १९७१) बेडेकरांनी म्हटल्याप्रमाणे हा लढा एकात्म असला पाहिजे व आहेही. हे जरी मान्य असले तरी एवढ्यासाठीच मार्क्स दलित साहित्याची प्रेरणा ठरू शकत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजाचा सामाजिक–आर्थिक व सांस्कृतिक–धार्मिक दृष्टीने विचार केला होता आणि हा त्यांचा लढा सर्वांगीण होता. तो भारतीय तळागाळाच्या माणसाच्या अभ्युदयासाठी होता. परंतु आजही सवर्ण हिंदू गरीब, कामगार, शेतमजूर खेड्यात व शहरात दलितांच्या या लढ्यात सामील होत नाहीत. ही वस्तुस्थिती असताना बेडेकर म्हणतात की खेड्यात, शहरात ते एकत्र येतात. वस्तुस्थिती नाकारून

असे चुकीचे प्रतिपादन करणे म्हणजे दलित साहित्याच्या प्रेरणेसंदर्भात आग्रहपूर्वक काही खोटचा गोष्टी नोंदविणे असाच याचा अर्थ निघतो.

असे जरी असले तरी मार्क्स दलितांचा शत्रु होऊ शकत नाही. कारण तो काही जातियवाद पाळत नाही, धर्म मानित नाही. आर्थिक विषमतेचा गौरव करीत नाही. किवा जे, जे भारतीय दलितांचे शत्रु आहेत त्यांचा तो सहकारी नाही.

निष्कर्ष असा की दलित साहित्याची प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकरच आहेत. मार्क्स किंवा निग्रोवाङ्मय ही दलित साहित्याची प्रेरणास्थाने होऊ शकत नाही.

• • •

दलित साहित्याचे स्वरूप व भूमिका

मराठी साहित्यात 'दलित साहित्य' हा शब्द प्रवेशतानाच स्वतः-बरोबर अनेक प्रश्न घेऊन आला. दलित म्हणजे काय ? दलित साहित्य म्हणजे नेमके कोणते साहित्य ? साहित्य हे दलित असते का ? लेखक व कलावंत दलित असू शकतो का ? दलित साहित्याच्या प्रेरणा कोणत्या ? या व अशाच स्वरूपाचे ते कितीतरी प्रश्न होते. जेव्हा जेव्हा वाङ्मयीन परंपरा मोडणारे, चाकोरीबद्ध, वाटचालींना धक्का देणारे आणि नव्या वाटा चोखाळणारे, नवी दृष्टी प्राप्त झालेले वाङमय येते तेव्हा अशाच प्रकारच्या प्रश्नांनी त्याचे स्वागत होते. रूढीप्रिय, परंपराप्रिय, स्थितीप्रिय समाजाला नव्याने येणाऱ्या बदलाचे हादरे, चटके व धक्के सहन करण्याची ताकद नसते. तशी त्याची मानसिक तयारीही नसते. त्याची वाङमयीन मूल्ये ठरलेली असतात. त्यांना तो शाश्वतमूल्ये मानतो आणि म्हणून त्यांचीच तो वर्षानुवर्षे पूजा करीत असतो. त्याची वाङ्मयीन मोजमापे,

मानदंड, निकष ठरलेले असतात. त्यांच्या माध्यमातूनच तो नव्याचीही मोजणी करतो, त्यांना जुनेच निकष लावतो. नव्याने प्रकाशीत असलेल्या साहित्यसूर्याचे तेज साठविण्याची त्याच्या दृष्टीत ताकद नसते. त्यामुळे तो अस्वस्थ होतो आणि मग वाङ्मयीन जुन्या मूल्यांच्या आधारावर तात्त्विक चर्चेचा आव आणून येऊ घातलेल्या प्रवाहाला अडथळे निर्माण करण्याचा उगीच प्रयत्न करण्यासाठी वरच्या प्रश्नांसारखे प्रश्नांचे जाळे विणण्याचा खटाटोप करीत असतो. परंतु त्याला माहित नसते की हे होणारे बदल त्यांच्याभोवती टाकण्यात येणाऱ्या प्रश्नांचे जाळे तोडण्यासाठी उत्तरांचे शस्त्र व बळ घेऊन आलेले असतात आणि त्यातल्यात्यात वाङ्मयात येणारा जीवनवादी विचार तर कोणत्याच प्रश्नाने अडून बसणारा नसतो. उलट त्याला पायाच्या ठोकरीने बाजूला सारून पुढे सरसावत असतो.

तसेच काहीसे दलित साहित्याच्या मानवतावादी विचाराने मराठी साहित्यात घडले. मराठी मन हे अत्यंत स्थितीप्रिय आहे. रूढीप्रिय, परंपराप्रिय आहे. देव, धर्म, कर्मकांडाबरहूकूम जगणाऱ्या या मनाला वाङ्मयीन वा इतर कोणताही बदल स्वीकारण्यास अतिशय त्रास होतो. जेव्हा जेव्हा येथे कोणी नवा वाङ्मयीन विचार किंवा सामाजिक उत्थापनाचा विचार दिला तेव्हा तो आपल्या पारंपारिक चष्म्याच्या निकषातून त्याकडे पाहू लागला. जेव्हा त्याला त्याच्या बदलाचे स्वरूप जाणवले तेव्हा तो विलक्षण अस्वस्थ झाला. जगबुडीचा त्याने ओरडा केला. दलित साहित्याच्या आगमनाने पुन्हा एकदा असे घडले यात नवल नाही. आणि म्हणून त्याने दलित साहित्याला प्रश्नांच्या धारेवर धरले, जीवाच्या आकांताने टीकेचे हल्ले केले. काहींना मात्र त्याची अपूर्वता जाणवली, असलीपणा कळला. म्हणून त्यांनी त्याचे हार्दिक स्वागतही केले.

मराठी साहित्याच्या सातशे वर्षांचा इतिहास पाहिला तर अत्यंत निराशाजनक आहे. त्याच्या पानापानावर नजर जरी फिरविली तरी त्यावर प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे देवाचे, धर्माचे, अध्यात्माचे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे मनुचे साम्राज्य दिसते. मनुच्या कायद्यांची कोठेही

पायमल्ली होताना दिसत नाही. तसे करणाऱ्याला विनबोभाट वाळीत टाकल्या जाते. त्याच्यावर बहिष्कार टाकण्यात येतो, त्याचे अन्न, पाणी बंद केल्या जाते. एवढेच नव्हे तर मुडदाही पाडण्यात येतो आणि हे सर्व करण्याचे अधिकार देव, धर्माने दिल्याचे सांगण्यातही येते.

आणि याच संस्कृतीचे गोडवे गाणारे हे साहित्य रामायण–महाभारताची मौलिकता सिद्ध करीत राहिले. शंबुकाचा शिरच्छेद जेथे होतो ते रामराज्य व जो करतो तो राम राजा यांना आदर्श राज्य आणि देवाचा अवतार मानण्यात आले. घडल्याचा कोणताही पुरावा उपलब्ध नसलेल्या महाभारताच्या वेळी सांगितलेल्या गीतेत 'चातुर्वर्ण्यम् मया सृष्टम्' असा वर्णवादाचा पुरस्कार करणारा कृष्ण हाही देवाचा अवतार मानल्याने हिंदूमन पर्यायाने मराठी मन, वाणी व लेखणी ही देववाणी सांगण्यातच स्वत:ला धन्य समजू लागली. मराठी संतांनी जी रचना केली ती देवाची गोडवे गाणारी, स्तुती करणारी अशी पारमार्थिकच होती. भक्तीमार्ग हा त्यांचा ध्येयवाद असल्याने स्वर्गात जाण्यासाठी व देवाला प्रसन्न करण्यासाठी त्यांनी वाणीने, लेखणीने व कायेने जीवाचा आटापिटा केला. जगण्याच्या सामाजिक मानवी प्रश्नांना त्यांनी स्पर्श केला नाही. येथे निर्माण झालेल्या व माणसानेच निर्माण केलेल्या दु:खाची दाद ते अस्तित्वात नसलेल्या देवापाशी मागत होते. एकनाथासारख्या संताने महाराच्या पोराला कडेवर घेतल्याची व अस्पृश्यांसोबत जेवल्याची भाकड कथा उगीच सांगण्यात येतात. त्या सांगून ते जातियतेच्या किंवा अस्पृश्यतेच्या विरोधी होते असे नव्हे तर अस्पृश्यांच्या स्पर्शाने विटाळलो वा अपवित्र झालो तर गंगेत स्नान केल्याबर ती अपवित्रता व विटाळ निघून जाऊ शकतो ही त्यामागची त्यांच्यासाठी समाधानाची बाब व मुद्दा होता. म्हणूनच त्यांनी लिहून ठेवले.

अंत्यजाचा विटाळ ज्याशी ।
गंगास्नाने शुद्धी त्याशी ।।

ज्ञानेश्वर, एकनाथ, नामदेव, तुकाराम, रामदास, चोखामेळा या व

इतर सर्व संतांनी हजारो अभंग, ओव्या ईश्वराची करूणा भाकण्यासाठी रचले. भक्तीमार्ग सोडून सामाजिक उत्थापनाचा, विषमतेच्या विरोधात एक शब्दही त्यांनी खर्ची घातला नाही. उलट चातुर्वर्ण्याधिष्ठीत समाज रचनेला पुष्टी मिळावी यासाठी मात्र त्यांनी रचना केली. त्याचे समाजाला पाठ दिले. कारण ईश्वराने सांगितलेले कार्यच आपण करीत आहोत असा त्यांचा भ्रम होता. एकीकडे सर्व मानव ही एकाच देवाची लेकरे म्हणायचे व दुसरीकडे भेदाभेदाच्या उतरंडी मजबूत करायच्या हे त्यांचे तंत्रच वेगळे होते. ज्ञानेश्वर, रामदास आदींनी तर उघड, उघड चातुर्वर्ण्याचा पुरस्कार केला आणि ब्राह्मणांचे वर्चस्व अबाधित राखण्यासाठी अभंगांची रचना केली.

ब्राह्मण वेद मूर्तीमंत ।
ब्राह्मण तोचि भगवंत
किंवा
जरी ब्राह्मण मूढमती ।
तरी जगद्‌वंद्य ॥
किंवा
अंत्यज शब्दज्ञाता बरवा ।
परी तो नेऊन काय करावा ॥

या व अशाच कितीतरी अभंगावरून भेदाभेदांचा त्यांच्या डोक्यात असलेला विचार स्पष्ट होतो. ब्राह्मण व इतरांचेही वर्चस्व कायम ठेवून फक्त शुद्रांची वाटेल तशी विटंबना करण्यात आली. त्याला गुलामीत ठेवण्यासाठी पोथी, पुराणे, वेद, शास्त्र व देव, धर्म यांना राबविल्या गेले. 'मराठा तितुका मेळवावा । महाराष्ट्र धर्म वाढवावा ॥' असे म्हणणाऱ्यांनी सामाजिक विषमता नष्ट करण्याचे किंवा कमी करण्याचे कार्य कधीच केले नाही. अडाणी, अज्ञानी समाजाला देवाचे, धर्माचे वेड लावून त्याला कर्मकांडापायी आंधळे करून ठेवले. म्हणून संत साहित्यात तोच प्रचार विखुरलेला दिसतो. चोखामेळ्यासारख्या दलित समाजात जन्मलेल्या संतानेही 'आम्ही उच्छिष्टांचे दास' म्हणून स्वत:ची लाचारीही सर्टिफाय

केली. 'ठेविले अनंते तैसेची राहावे' असा वर्णव्यवस्थेच्या विजयाचा झेंडा तुकोबांनी आपल्या कवितेच्या खांद्यावर दिला.

सोबतच मराठी साहित्यात पंत, शाहिरी वाङ्मयाचे युग सुरू झाले. पंतांनी स्वतःच्या पांडित्याचे दिवे पाजळले तेही अध्यात्माच्या तेलाने. शाहिरी वाङ्मयात दलित शाहिरांचा वाटा असूनही त्यांच्याजवळ लेखणी नसल्याने त्याचा फायदा त्यावेळेच्या ज्यांच्या हातात लेखणी होती त्यांना मिळाला. तेथेही अस्पृश्यांना स्थान नव्हते. काही काळ कलावादाच्या गजरात मराठी साहित्य फेर धरून नाचले-फक्त मनोरंजनासाठी. त्यावेळी साहित्याला नुसते मनोरंजनाचे व कलावादाचे धुमारे फुटले होते. जीवनाकडे त्याने संपूर्ण पाठ फिरविली होती. एका जातीच्या लोकांच्या हाती लेखणी असल्याने मराठी साहित्यात त्यांनी मनमानी करून ठेवली. आधुनिक मराठी साहित्यात तेच सुरू राहिले. जे बदल झाले ते फारच वरवरचे होते. समाधानकारक नव्हते. वरच्या समजलेल्या जातींचेच चित्रण मराठीत झाले. त्यांच्याच भावभावनांचा विचार तेथे करण्यात आला. त्यांच्याच जीवनाचे व जगण्याचे प्रश्न सोडविण्यासाठी, मनोरंजनासाठी आधुनिक मराठी साहित्यिकांची लेखणी राबू लागली. नंतर आलेल्या ग्रामीण साहित्यानेही तेच केले. ग्रामीण साहित्यिकांची समाजाकडे पाहण्याची दृष्टीही पांढरपेशीच होती. असे घडत असताना मात्र त्यांना त्यांचे काही चुकले आहे, आपल्या हातून पाप घडत आहे याची जाणीव कधीच झाली नाही. एखादाच केशवसूत म्हणतो की गेल्या अनेक शतकांच्या पापांचा कलंक धुण्यासाठी तुमच्या रक्ताची गरज आहे.

गत शतकांची पापे घोरे, क्षालायाला
तुमची रुधिरे, पाहिजेत रे
स्त्रैण न व्हा तर

असे म्हणणारे व काही बाबतीत क्रांतीकारक दिसत असलेले केशवसूत सुद्धा देव, धर्माच्या कचाट्यातून मोकळे झालेले दिसत नाहीत. म्हणून याबद्दल आपले मत व्यक्त करताना दलित साहित्याचे प्रवक्ते व

विचारवंत डॉ. म. ना. वानखडे म्हणतात,

'आजवरच्या इतिहासातील समाज जीवनात अनेक राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक अशी आंदोलने हादरून टाकणारी होती. पण मराठी साहित्यात या आंदोलनांचे पुसट प्रतिबिंबही (काही सन्माननीय अपवाद सोडले तर) उमटलेले आढळत नाही. उलट स्वप्नरंजनात्मक लेखनच भरपूर झाले. हे स्वप्नरंजनात्मक लेखन लेखकांची व समाजाची दिशाभूल करणारे होते असे दिसते. त्याचे कारण असे की मराठी लेखक ज्या वर्गात वा वर्णात जन्मला तो जन्म, होणारे संस्कार व त्यामुळे येणाऱ्या मर्यादा, त्या मर्यादांमुळे जीवनाचा अर्थ लावण्यात येणारी बंधने या सर्वांमुळे तो आपल्या लहानशा डबक्याबाहेर कधी येऊ शकलाच नाही. बाहेर केवढे विराट जीवन आहे; दुःखी, व्याकुळ, तडफडणारे, आक्रांत करणारे आणि आतून संतापाने वणव्याप्रमाणे पेटलेले विश्व आहे. हे कधी त्याला दिसलेच नाही. त्यामुळे आजवरचे मराठी वाङ्मय हे कृत्रिम आणि अत्तरी फुलाप्रमाणे खोटे आहे.'

तात्पर्य हे सर्व झुगारून मनुष्याला स्वातंत्र्य, समता, बंधूता व न्याय या तत्वाने जगा व इतरांनाही जगवा असा मानवतावाद आपल्या लेखणीद्वारे एकाही मराठी लेखकाने मांडला नाही. त्यात कोठे ना कोठे ते फसत राहिले. पारंपारिक विचार, आचार, देवाची, जातीची व धर्माची चौकट मोडून लेखणी राबवणारा एकही कलमबहाद्दर गेल्या सातशे वर्षात सापडत नाही. एवढ्या प्रदीर्घ कालावधीच्या इतिहासात मराठी साहित्य एका विशिष्ट जीवनापाशीच गरगरत राहिले. त्यात जे थोडेफार बदल झाले ते फारच वरवरचे होते. समग्र साहित्य तळागाळापासून ढवळून काढणारा विचार आलाच नाही. कारण त्या साहित्य विचाराला समाजाकडे पाहण्याची एक चातुर्वर्ण्याधिष्ठत विचारधारा व दृष्टी होती. ती तोडून त्यापलिकडे असलेल्या व हजारो वर्षे अस्तित्वहीन ठेवलेला दलित समाज हा मराठी वाङ्मय प्रकारातील कोणत्याही प्रकारात आला नाही. तो चितारला गेला नाही. . . चुकून जेथे आला तो सहानुभूतीचा किंवा टिंगलीचा विषय होऊन. त्यामुळे मराठी समाजातीलच नव्हे तर

भारतीय समाजातील एका मोठ्या गटाचे वाङ्मयीन चित्र चितारल्या गेले नाही. साहित्य हा समाजाचा आरसा आहे अशी साहित्याची व्याख्या करणारांनी या आरशात दलितांचे प्रतिबिंब कधीच दाखविले नाही. सर्वच वाङ्मय प्रकार त्याच्यासाठी अस्पृश्य राहिले व तो त्यांच्यासाठी अस्पृश्य ठेवल्या गेला. असा हा समाजाचा काळकुट्ट अंधारलेला भाग प्रकाशमान करण्यासाठी विडा उचलला–लेखणीत, वाणीत व कृतीत सूर्यतेज घेऊन आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी. अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी देव, धर्म अध्यात्म, कर्मकांडाला नकार देणारा व विज्ञानवादी बुद्धी प्रामाण्यवादी, जीवननिष्ठेचा पुरस्कार करणारा हा पहिला विद्रोही लेखक या समाजाचा हृदयसम्राट ठरला. त्याने शब्दांचे सामर्थ्य ओळखले होते. मृतप्राय पडलेल्या समाजात त्याने जीव ओतला व त्याला माणूस म्हणून उभे राहण्यासाठी बाहूत, शरीरात आकाश कवेत घेण्याचे सामर्थ्य दिले; स्वाभिमान दिला. बंड दिले. वाचा बंद केलेल्या व गमावलेल्यांच्या तोंडी मानवतेची स्तोत्रे गाणारे गीत दिले, संगीत दिले. हजारो वर्षापासून एकाच ठिकाणी दगडागत पडलेल्यांच्या पायात प्रकाशमान क्षितिज गाठण्यासाठी वेगवेडे वादळ दिले. आणि अन्याय, अत्याचार, जात, धर्म, देव, कर्मकांड, अध्यात्म यांच्या विरोधात लढायला हातात लेखणीच्या संगीनी दिल्या. सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय आणि सांस्कृतिक संघर्षासाठी पेटलेला वर्ग बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केला. बाबासाहेबांनी हा समाज ढवळून काढला. त्यामुळे एक नवचैतन्य निर्णाण झाले. हिंदू सामंतशाहीच्या विरोधात सर्व आघाड्यांवर लढणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यांचे विचार या समाजाचे एकमेव प्रेरणास्थान ठरले. म्हणून 'दलित साहित्याची प्रेरणा' या आपल्या लेखात प्रा. यशवंत मनोहर म्हणतात,

'लोकशाही समाजवादाचे सामाजिक लोकशाहीचे म्हणजे स्वातंत्र्य, समता, बंधुत्वाचे बीजारोपण त्याने घटनेत करून ठेवले या घटनेचा लेखक विद्रोही होता, एका बलशाली आणि मग्रुर अशा परंपरेच्या संदर्भात हा दलितांचा एवढ्या प्रचंड शक्तीचा लाडका लेखक विद्रोही

होता. मूलगामी आणि तळगाळ चेतवणारे अफाट संशोधन मांडणारा हा प्रज्ञावंत विद्रोही होता. त्यांच्या वाणीकरणीने दलितांचे जग सूर्यसन्मुख झाले, सूर्यवेधी झाले, सूर्यमंत झाले, सूर्यभू झाले. आणि सूर्यस्वीही झाले. दलित साहित्य याच दलितांच्या विद्रोही लेखकाच्या प्रेरणेचा आविष्कार आहे.'

(दलित क्रांती विशेषांक मार्च १९७७)

अशा भक्कम विचारांचे प्रेरणास्थान मिळालेल्या दलित साहित्याचा जन्म कोणत्या अपरिहार्यतेतून झाला हे सिद्ध होते. आणि दलित साहित मराठी साहित्यापेक्षा वेगळे काय देते हेही सांगते. मग या संदर्भात दलित लेखक कोण असा प्रश्न निर्माण होतो. त्याचे उत्तर अभ्यासकाना मिळते. जे जीवनानुभव मराठी वाङमयकारांच्या दृष्टीपथाबाहेरील होते, जे जग त्यांच्या जगापेक्षा वेगळे होते, ज्याने हजारो वर्षाचा अन्याय, अत्याचाराचा अंधार आपल्या खोपटा, खोपटातून दडवून ठेवला होता त्याचा काडीमात्र संबंध मराठी साहित्यिकांना त्यांच्या कलाकृतीत आणता आला नव्हता. नेमका हा जीवंत अनुभव दलित साहित्यिकांनी आपल्या वाङमयातून प्रभावीपणे मांडण्यास सुरवात केली. कथा, कविता, कादंबरी याशिवाय वैचारिक लेखनातून आपले वेगळेपण सिद्ध केले. जीवघेण्या ज्या यातना भोगाव्या लागल्या व लागत आहेत त्यातून बाहेर येण्यासाठी त्याचे बंडखोर मन त्याच्याभोवती जखडण्यात आलेल्या परंपरा व रूढी वादाच्या शृंखला तोडण्यास विद्रोही बनले.

'माणसाने माणसावर केलेले अत्याचार जेव्हा साहित्याच्या रूपाने व्यक्त होतात, तेव्हा मानवी संस्कृती उज्वल होते.'

(प्रा. रा. ग. जाधव : साहित्य आणि सामाजिक संदर्भ)

त्याने देव, धर्म, कर्मकांड नाकारले. तसेच नव्या विज्ञानवादी, तर्कनिष्ठ व विवेकनिष्ठ आदि जाणिवांचा स्वीकार केला. त्याचा अनुभव हा त्याचाच होता. भूतकाळात सांडलेले माणसामाणसातील विषमतेचे रंग माणसाच्या जीवनात किती कुरूपता निर्माण करू शकतात हे त्याने पाहिले

होते, अनुभवले होते. म्हणून वर्तमान जीवनाचे हे चित्र त्याने स्वातंत्र्य समता, बंधूता व न्याय यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हातात दिलेले रंग व कुंचला घेऊन तो माणसाचे मानवतावादी, उदात्त, अप्रतीम चित्र रंगवायला निघालेला आहे. भविष्यात माणसाचे अत्यंत देखणे, मनाला मोहिनी घालणारे चित्र त्याच्या डोळ्यासमोर आहे. दलित साहित्याची ही भूमिका प्रतिपादन करताना प्रख्यात कथाकार व विचारवंत बाबूराव बागूल म्हणतात,

'या देशात माणसाचा भयंकर अवमान झालेला आहे. माणसाचा एका व्यवस्थेने कोंडी करून मुडदा पाडलेला आहे. आणि म्हणून दलित साहित्य माणसाला केंद्र करते. माणसाच्या स्वातंत्र्याचा प्राणपणाने उच्चार करते. माणसाला महान मानते आणि देवधर्माला माणसाहून लहान मानते. माणूस म्हणजे महाकाव्य. माणसाच्या भावना म्हणजे महान ऋतु. माणसानेच हे जग नटविले आहे. आणि माणसाचेच हात प्रगतीचे रथ होत असतात. माणसाच्याचे कष्टाळू करकमळातून क्रांत्या जन्म घेत असतात असा आमचा विश्वास आहे. म्हणून हे युग आम्हाला आमचे युग वाटते. कारण या युगाने माणसाला मुक्ती दिली आहे.'

(महाड बौद्ध सा. संमेलन : अध्यक्षीय भाषण १९७१)

असे या दलित साहित्यात माणसाच्या माणूसपणाला, त्याच्या सर्वांगीण विकासाला, त्याच्या विवेकनिष्ठ व नीतीमान आचाराला, विचाराला व त्याच्या सर्वंकष मुक्तीला केंद्र मानले आहे. आणि म्हणूनच दलित साहित्य हे मराठी साहित्यापेक्षा निश्चितच वेगळे आहे. त्याची उंची, व्याप्ती व खोली मोजायची मापे अजून तयार व्हायची आहेत. पारंपारिक मानदंड व मोजमापे त्याला लावता येणार नाहीत. त्याचे निकष अजुन ठरायचे आहेत.

साहित्य दलित असते का याचे उत्तर नकारार्थी मिळते. म्हणूनच हे साहित्य दलित नाही. ते दलितत्वाचा निषेध करते. धिक्कार करते. या भारतीय समाजात जातीच्या नावाखाली, आर्थिक विषमतेच्या नावाखाली

वा जीवनाच्या इतर कोणत्याही अंगाने माणूस शोषला जात असेल आणि ते दलितत्व जोपर्यंत असेल तोपर्यंत दलित साहित्य हा शब्दप्रयोग असेल. देवाच्या, धर्माच्या नावावर सामाजिक विषमता, जाती जातीच्या खुळचट कल्पना नाहीशा होणे आमच्यालेखी सर्वात महत्वाचा मुद्दा आहे. त्याला आम्ही अग्रक्रम देतो. दलित साहित्य शोषकांना अंकुश लावणारा शब्द आम्ही मानतो. ज्यांना दलित ठेवल्या गेले त्यांच्या डोक्यावर किंवा गळ्यात मिरविणारे दलितत्व हे चिन्ह नाही तर जे शोषक वरच्या कोणत्याही प्रकारचे शोषण करीत असतील त्यांच्या अघोरी, अमानवी कृत्यांची संज्ञा आम्ही मानतो. दलित साहित्य या नावाबद्दल काही साहित्यिक मित्रांचे मतभेद दिसून येतात. कालचे अस्पृश्य आज बौद्ध झाल्याने काहींचे म्हणणे असे की याला बौद्ध साहित्य म्हणावे. याची प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर असल्याने याला आंबेडकरी प्रेरणेचे साहित्य म्हणावे असे काहींचे म्हणणे आणि काहींचा याला विद्रोही साहित्य म्हणावे असा आग्रह आहे. परंतु या साहित्याला काय म्हणावे हा वादाचा विषय होऊ शकत नाही. मात्र दलित साहित्य का म्हणावे याचे उत्तर वरच्या परिच्छेदात मिळेल.

जे दलित साहित्याचे ते दलित साहित्यिकांचे. माणूस हा दलित असतो किंवा आहे त्यावर आमचा विश्वास नाही. मग साहित्यिक वा कलावंत कसा असेल ? वर्ण व वर्गवादाच्या विषमतेची दुःखं वेशीवर टांगणारा, ते साखळदंड तोडण्यास कटिबद्ध झालेला, देव,–धर्म कर्मकांड पूर्वजन्य व पुनर्जन्म नाकारणारा व माणसाचे मोठेपण मानणारा लेखक व कवी आम्ही दलित साहित्यिक मानतो. दलितांचे दुःख स्वतः अनुभवलेला व सहअनुभव घेतलेला या दोघांचाही त्या संदर्भात विचार करण्यात यावा. अर्थात प्रत्येक कलावंताची एक कुवत असते. तो मुद्दा येथे चर्चिता येणार नाही.

वर्ण व वर्गाचे विभाजन साहित्यात लावणे जसे बरोबर होणार नाही तसेच समाजातही वर्ण व वर्ग असणे किंवा असलेले टिकविणे हेही अत्यंत चुकीचे, असभ्यपणाचे व असंस्कृतपणाचे द्योतक आहे. म्हणून ही

चूक, अमानवीपण आणि असंस्कृतपणा कमी करण्यासाठी दलित साहित्य व दलित साहित्यिक ही शब्दशस्त्रे आम्ही हातात घेतली आहेत. कारण सुईने शिवता येते, तलवारीने, बंदुकीने वा लढण्याच्या इतर साधनांनी लढता येते यावर आमचा विश्वास आहे. विद्युतमुळे जसा प्रकाश तेज मिळते तसे विद्युतस्पर्शाने वेडेपणाही घालविता येतो. तद्वतच रूढी-वादाचा, पारंपारिकपणाचा सडलेला भाग काढून टाकून नवीन जीवनमूल्ये स्वीकारून माणसाचे नवीन जीवनवादी साहित्य निर्माण करण्याचे काम दलित साहित्यिकांचे आहे.

साहित्याने क्रांती होते किंवा दलित साहित्याने तसे काही होणार आहे काय असा प्रश्न काही वेळा उपस्थित केला जातो. त्याला पण उत्तर असे की साहित्य हे क्रांतीचे हत्यार नाही. किंवा त्यामुळे कोणी क्रांती करणार आहे किंवा होणार आहे असेही नाही. तसा समज कोणी करून घेऊ नये. परंतु अभिप्रेत असलेल्या क्रांतीचे चित्रण रेखाटणे आणि झालेल्या क्रांतीचे चित्र दाखविणे आवश्यक ठरते. 'कोणत्याही क्रांतीकडे एका उच्च पातळीवरून पाहण्याचे द्रष्टेपण ललित साहित्यात असते, (प्रा. रा. ग. जाधव : साहित्य आणि सामाजिक संदर्भ) म्हणून ते कार्य दलित साहित्य अतिशय प्रामाणिकपणे करू लागले आहे. दलित साहित्याला सम्यक क्रांती अभिप्रेत असून त्या संदर्भात वेळोवेळी होणाऱ्या बदलाची सामाजिक जाणीव दलित साहित्यिक स्पष्टपणे आपल्या साहित्यासाठी स्वीकारणार आहे. कारण 'साहित्य म्हणजे स्वतंत्रपणे जगण्याची सनद आहे.'

(रा. ग. जाधव : साहित्य व सामाजिक संदर्भ)

ह्या सर्व गोष्टींचा विचार करताना एक गोष्ट लक्षात येते की दलित साहित्याची ठोकळेबाज व्याख्या करून उगीच त्याच्यावर कोलांट्या खाण्यात सध्यातरी हंशील नाही. कोणत्याही व्यवहारात नवीन आलेल्या गोष्टीची व्याख्या करून त्याला ताबडतोब एखाद्या चौकटीत डांबून टाकण्याचा इतरांचा आगळा वेगळा डाव दलित साहित्यिकांनी ओळखावा.

साहित्यिकांनी, विचारवंतांनी या असल्या फालतू भानगडीत पडून वेळेचा अपव्यय करू नये. आज येथे वाङमय निर्मिती महत्त्वाची आहे. व्याख्या महत्त्वाची नाही. निर्मिती प्रक्रिया मंद न होता ती वेगवान कशी होईल, या समाजाच्या जगण्याचा प्रत्येक पदर संपूर्णपणे ती कसा उलगडून दाखवू शकेल याचा विचार झाला पाहिजे व वाङमयाची सर्व दालने समृद्ध कशी होतील यावर भर दिला गेला पाहिजे.

जीवनानुभवाचे जीवंत प्रामाणिक शब्दचित्र रेखाटणे आज महत्त्वाचे आहे. जुन्या मिथ नाकारल्या तर नव्या मिथही जन्माला येथील. जबाबदारीने शब्दाची मांडणी, शब्दाचे वळ, ताकद, शब्दाची कला-कलाकुसर व शब्दाचे महात्म्य दलित साहित्यिकांनी ओळखले आहे. ओळखलेही पाहिजे. शब्दाचे अवमूल्यन होणार नाही याची जाणीव त्याला सतत असायला हवी.

कारण शब्द हे आग असतात. ते पाणीही असतात. ते माणसाला, समाजाला, देशाला व जगाला पेटवू शकतात किंवा विझवू शकतात. ते तुडवू शकतात, ते घडवू शकतात. म्हणून काय तुडवायचे व काय घडवायचे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले असल्याने व त्याच्या सत्यतेचा प्रत्यय आम्ही घेतल्याने दलित साहित्यिकासमोर दलित साहित्याचे स्वरूप व भूमिका स्पष्ट आहे.

• • •

दलित साहित्याची व्याप्ती

गेल्या दिड तपापासून दलित साहित्याची निर्मिती झपाट्याने होत आहे. दलित साहित्यातील वैशिष्टचपूर्ण कथा, कविता प्रचंड प्रमाणात निर्माण झाल्या व होत आहेत. तसेच कांदबरी, एकांकीका, नाटके, स्वत:चे मागील जीवनाचे कथन (ज्याला पारंपरिक मराठी वाङ्मय प्रकारात आत्मकथन म्हणतात) हे वाङ्मयप्रकारही अल्प प्रमाणात पण भक्कमपणे आपली पावले टाकीत आहेत. दलित साहित्याची वैचारिक बाजू, त्याचे स्वरूप, भूमिका, सौंदर्यशास्त्र, प्रेरणा व प्रवृत्ती, सिद्धान्त इत्यादी समीक्षात्मक बाजूही मांडून झाली आहे. आणि त्यामुळेच दलित साहित्याचे वेगळेपण, त्याची व्यापकता व ठोस अस्तित्व निर्विवाद मान्य झाले आहे. नव्हे त्याच्या अंगभूत गुणवैशिष्टचांनी मान्य करणे भाग पडले आहे. दलित साहित्याचे निराळेपण कशात आहे ? तर ते त्याने स्वीकारलेल्या जीवन दृष्टीत, जाणीवात, प्रेरणात व मूल्यांमध्ये आहे. यासंबधात दलित

साहित्याने मराठी वाङ्मयाच्या प्रचलित प्रवाहाचे हेतू, जाणीवा, प्रेरणा व मूल्ये त्याज्य ठरविली, नाकारली आहेत. आणि त्याचवेळी ह्या सबंधच बाजू नव्या दृष्टीने स्वीकारल्या आहेत. आजवरच्या मराठी वाङ्मयाला देव, धर्म, आत्मा, पूर्वजन्म, रूढी, परंपरा, जातीच्या नावाखाली माणसा-माणसातील विषमता व शोषणाचे सर्व मार्ग मंजूर होते, नव्हे त्या वाङ्मयाने या सर्व गोष्टींचा भक्कमपणे पाठपुरावा केला होता. त्यामुळे येथील समाजात जातीभेदाचे व त्यामुळे शोषणाचे दरवाजे काही मंडळीला सदोदित खुले झाले होते. येथील शोषित व ज्यांच्यावर जाति-व्यवस्थेने अन्याय केले त्या पददलित माणसाचे चित्र मराठीतच काय पण भारतातील कोणत्याही भाषेच्या वाङ्मयात रेखाटल्या गेले नाही. रेखाटले ते टिंगलीचा, हेटाळणीचा किंवा सहानुभूतीचा विषय म्हणून .. वाङ्मयात दलितांचा नायक चितारला गेला नव्हता. नेमके दलित साहित्याने हेच हेरले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने व तत्त्वज्ञानाने नवीन जीवनदृष्टी प्राप्त झालेल्या या साहित्यिकाने सामाजिक अन्याय अत्याचाराविरुद्ध दंड थोपटले. जातियतेला खतपाणी घालणारे देव, धर्म, परंपरा, रूढी, कर्मकांड, आत्मा इत्यादिना त्याने नकार दिला व त्याने अनिश्वरवाद, अनात्मवाद, नीतीवाद, विज्ञानवाद स्वीकारला. माणसाच्या प्रगतीचा तो विचार करू लागला. त्याने माणसाला व तेही सामान्य माणसाला आपल्या विचाराचा, पर्यायाने साहित्याचा केन्द्रबिंदू मानले. समता, स्वातंत्र्य, बंधूता व न्याय ही जीवनमूल्ये त्याने स्वीकारली. हा माणसाला पुढे नेणारा विचार डोक्यात ठेवून तो लिहू लागला. शेकडो वर्षांच्या गुलामी व दास्याच्या ओल्या जखमा आणि नवीन जीवन जाणिवांची प्रचंड उर्मी यांची सांगड घालून तो लिहू लागला. तो क्रांतीपुत्र व प्रकाशपुत्र ठरला. शेकडो वर्षे निर्माण झालेल्या मराठी वाङ्मयापेक्षा दलित साहित्य असे वेगळे होते. त्याला आपला लढवय्या नायक सापडला. त्याला तो प्रभावीपणे कथा काव्यात, नाटकात उभा करू लागला. हा नायक तळागाळातील, जनसामान्यातील होता .. दलित होता. जीवनाच्या कोणत्या ना कोणत्या अंगाने पिळल्या, नाडल्या गेलेला होता. त्याला

जात नव्हती. तो जातीभेदाचा विरोधक होता. दलित साहित्याला सामाजिक, आर्थिक वा कोणतीही विषमता मंजूर नाही. या संदर्भात वेगवेगळ्या विचारवंतानी केलेल्या व्याख्या पाहू. 'दलित' या शब्दाची व्याख्या करताना दलित साहित्याचे एक प्रवर्तक डॉ. म. ना. वानखडे म्हणतात, 'दलित या शब्दाची व्याख्या केवळ बौद्ध अथवा मागासवर्गीयच नव्हे तर जे जे पिळले गेलेले असे श्रमजीवी आहेत ते सर्व दलित.' याच प्रकारच्या व्याख्या प्रसिद्ध विचारवंत व मान्य टीकाकार तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, गं. बा. सरदार, बाबूराव बागूल इत्यादींनी केल्या आहेत. अशा या दलित माणसाचे साहित्य हे जातीयवादी किंवा संकुचित राहणार नाही तर ते सर्वसामान्य माणसाचे साहित्य राहील. त्यात आदिवासी, भटक्या जमाती, गोरगरीब मजूर, श्रमिक, कष्टकरी राहतील. त्याला जात, धर्म, पंथ मान्य असणार नाही. असे हे दलित साहित्य आपल्या गौरवशाली सामर्थ्यानिशी येत आहे.

जनसाहित्य काय आहे ?

आता जनसाहित्याविषयी पाहू. जनसाहित्य नावाचे काही वेगळे साहित्य आहे का ? त्याला उत्तर 'नाही' मिळते. जनसाहित्य नावाचे कोणतेही साहित्य अस्तित्वात नाही. समजा काहींच्या अट्टाहासापायी असे मान्य केले की जनसाहित्य असू शकते. तर मग प्रश्न उभे राहतात की त्याची भूमिका काय ? जीवनदृष्टी कोणती ? प्रेरणा व मूल्ये कोणती ? त्याची व्याख्या काय ? ते काय स्वीकारते व काय नाकारते ? या प्रश्नांची उत्तरे द्यावी लागतील. 'जनसामान्याचे साहित्य ते जनसाहित्य' अशी एक व्याख्या जनसाहित्याची केली जाते परंतु तेवढी व्याख्या करून भागणार नाही. एवढेच नव्हे तर पारंपारिक मराठी वाङ्मय व दलित साहित्य या दोहोपेक्षा ते वेगळे कसे व त्याचा प्रवाह मोठा कसा ? याचीही उत्तरे द्यावी लागतील. ती मात्र त्यांनी दिलेली नाहीत. किंवा जनसाहित्याचा अट्टाहास धरणाऱ्या आमच्या चिरंजीव दोस्तांनीही दिली नाहीत.

जन साहित्यिक कोण ?

जन साहित्य नावाचे कोणतेही साहित्य अस्तित्वात नसताना, त्याला कोणतीही भूमिका व मूल्य नसताना मग जनसाहित्याचा अट्टाहास धरणारी व स्वत:ला जनसाहित्यिक म्हणवून घेणारी मंडळी कोण असा प्रश्न उपस्थित होतो. त्याचे उत्तर शोधताना असे दिसून येते की जे स्वत: ब्राह्मण नाहीत व बहुजन समाजातील असून ज्यांना दलित म्हणवून घेण्याची लाज वाटते किंवा जे 'दलित' हा शब्द जातीवाचक ठरवितात असे काही 'मधले' लोक ही 'टुम' चालवित आहेत. महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे हे नुसते नाव घेतात. यांची जगण्याची मूल्ये मात्र पारंपरिक आहेत. नसतील तर ती त्यांनी जाहीर घोषित करावी. तसे मात्र आजपर्यंत झालेले नाही.

दलित साहित्य हे विश्वसाहित्य

दलित साहित्य ही मूळ मराठी साहित्याच्या इतिहासातील एक अवस्था आहे असे म्हणणे म्हणजेही दलित साहित्याकडे पाहण्याची संकुचित दृष्टी सिद्ध होते. आणि त्याचे मोठेपण व वेगळेपण नाकारणेच होय. दलित साहित्य आज जरी मराठी भाषेच्या माध्यमाने लिहीत्या जात असेल म्हणून ते काही मराठी साहित्याच्या इतिहासातील अवस्था आहे असे म्हणणे बरोबर होणार नाही. मराठी साहित्याचा इतिहास हा परंपरा रूढी, जाती आणि देव धर्माचा इतिहास आहे. दलित साहित्य हे जीवनवादी साहित्य असल्याने ते विश्व साहित्याच्या इतिहासातील अवस्था आहे असे म्हटले तरच योग्य होईल. दलित साहित्य अखिल मानवमुक्तीचा विचार करते म्हणून त्याला संकुचित करून त्याचे मोठेपणा कमी करता येणार नाही. शोषणाच्या विरोधात व समतेच्या बाजूचे लिखाण म्हणजे दलित साहित्य. मग ते कोणत्याही भाषेच्या माध्यमाने निर्माण होवो. आता मराठी दलित साहित्याचे अनुवाद अनेक प्रमुख भारतीय भाषांमध्ये तसेच परकीय भाषांमध्येही होऊ लागले आहेत. आणि अनेक भाषांमधून दलित साहित्याची दर्जेदार निर्मिती होऊ लागली आहे.

विद्रोह हा दलित साहित्याचा कणा

सामाजिक विद्रोह हा सामाजिक स्तरावर जरी बरोबर व आवश्यक असला तरी तो साहित्यात दलित साहित्यिकांनी आणू नये असेही म्हटले जाते. हे विधान किंवा म्हणणेही भोंगळपणाचे आहे. साहित्य हे जर समाजाचा आरसा असेल तर समाचात असलेली विषमता, अन्याय, शोषण व त्याविरूद्ध लढणारे सामाजिक कार्यकर्ते आणि त्यांचे विचारही साहित्यात कलेची पातळी राखून उमटणे अपरिहार्य आहे. नव्हे त्यानेच ते साहित्य जीवंत ठरणार आहे. सामाजिक विद्रोह साहित्यात आणू नका असे म्हणणे म्हणजे जीवनवादी समिक्षेला व भूमिकेला विरोध करणेच होय. दलित साहित्यात विद्रोह हा येणारच. उलट तो त्याचा कणाच आहे असे म्हटले तर वावगे होणार नाही.

आदिवासी साहित्य वेगळे नाही

दलित साहित्य हे येथील शोषितांचे साहित्य आहे. आदिवासी, विमुक्त भटक्या जमाती, मागास जाती, मजूर, श्रमणारे, सर्वांगाने नाडलेले, पिडलेले इत्यादिंचे साहित्य हे दलित साहित्य आहे. दलित हा शब्द एका ठराविक जातीसाठी नाही. आदिवासींचे साहित्य हा दलित साहित्याचाच एक भाग आहे असे जर कोणी म्हणत असेल तर तेही चूक आहे. ते दलित साहित्यच आहे. दलित साहित्याच्या व्याप्तीचा याच पद्धतीनेच विचार करावा लागेल.

• • •

दलित कवितेचे पहिले तप

मराठी कवितेत दलित कवितेच्या झंझावाती प्रवेशाने प्रचंड वादळ निर्माण केले आहे हे आपणास स्पष्ट दिसत आहे, जाणवत आहे. जर एखाद्या भाषेतील कविता संपन्न, समृद्ध असेल तर ती भाषा बोलणाऱ्या समाजजीवनाचे सर्व अनुभव तिने व्यक्त केलेले असावेत. त्यातच तिचे संपन्नत्व सामावलेले असते, असलेही पाहिजे. परंतु तसे होत नसेल तर मग त्या भाषेतील कविता कोठेतरी उणी पडते आहे, कमी पडते आहे, ती एकारल्या जात आहे असे म्हणणे भाग पडते. हा उणेपणा, कमीपणा, एकारलेपणा मराठी कवितेतच नव्हे तर सर्व भारतीय भाषांमधील कवितेत आहे. त्याला कारण भारतीय समाजव्यवस्था होय. भारतीय समाजव्यवस्थेचा बळी झालेल्या एका मोठ्या समाज गटाला त्याचे जगण्याचे अस्तित्व जेव्हा हजारो वर्षांपासून नाकारल्या गेले तेव्हा त्याचा चेहरा साहित्यात दिसणार कसा आणि दाखवणार तरी कोण ? म्हणून

मराठी कवितेला संपन्न करण्यासाठी दलित कवितेचे आगमन अत्यंत महत्त्वाचा सूचक असा टप्पा आहे.

दलित कवितेने प्रचंड उलथापालथ करून मराठी कवितेचे स्वरूपच बदलून टाकले आहे. दलित कविता ही पारंपरिक मराठी कवितेला किंवा जिला आधुनिक मराठी कविता संबोधल्या गेले आहे तिलाही धक्का देऊन पुढे जाणारी, आशय व रचना ह्या दोन्ही दृष्टींनी बंड करून उठणारी कविता आहे. अर्वाचीन मराठी कवितेतील विद्रोह व दलित कवितेतील विद्रोह यात महदंतर आहे. या कवितेत नुसतीच भाषेची मोडतोड नाही किंवा शब्दांच्या कसरती, खेळ नाहीत तर वर उल्लेखिलेल्या दाबलेल्या व दबलेल्या समाजमनाच्या हुंकारातून तिचा जन्म झाला आहे. कवितेत कलामूल्ये असणे आवश्यक आहे हे जरी सर्वमान्य असले तरी ती कलामूल्ये जीवनाशी फारकत करणारी नसावी आणि नेमकी दलित कविता येथेच अर्वाचीन मराठी कवितेच्या पुढे जाते असे मी म्हणेन. दलित कवितेत उत्कट जीवनानुभावाचे सामर्थ्य आणि रचनेचे सौंदर्य या दोहोंची सांगड घातल्या गेली असल्याने ती सामर्थ्यशाली व स्वरूपसंपन्न झाली आहे. दलित कवितेतील जीवनविषयक जाणीव व तिच्यातील सौंदर्यशास्त्र यांचा वेगवेगळा विचार या लेखात करता येणार नाही. परंतु यापुढे तो होणे आवश्यक आहे. जीवनातील दाहक अनुभव व नितळ जीवन जगण्याचा विज्ञानवादी दृष्टीकोण हा वैचारिकतेचा घटक दलित कवितेत येत असल्याने प्रथमदर्शनी ती गद्यसदृश व विधानात्मक दिसते; परंतु तिच्या कवित्वाला त्यामुळे कोठे धोका निर्माण होत नाही किंवा बाधाही येत नाही. कारण दलित कवीच्या एका संवेदनेच्या पातळीवरून तिचा जन्म झाला आहे. जीवनातील ऊर फाडणारी अस्पृश्यतेची टोचणी, दास्य, दारिद्र्य, अन्याय, अत्याचार, अगतिकता, संताप, बंड, अंतर्मुख होऊन भूतकाळाच्या अंधारातूच वर्तमानात व भविष्यात प्रकाशमयी जीवन जगण्याचा मानवतावादी, विवेकनिष्ठ, विज्ञाननिष्ठ, नीतिमत्तेवर आधारलेला नितळ दृष्टिकोण सामाजिक नेत्रांनी पाहत असल्याने वैचारिकता हा तिचा स्थायीभावच झाला आहे. ती माणसाला आपला

केन्द्रबिंदू मानते आणि त्याच्या जीवनाच्या सर्वांगीण विकासाचा विचार करते. परिणामी ती सामाजिक परंपरा, रूढी, अध्यात्म, देव, धर्म, कर्मकांड यांच्या साखळदंडाने जखडलेल्या समाजाचा विचार करते व त्यातून त्याची सोडवणूक करताना त्यावर घणाघाती प्रहार करण्यात रममाण होते व मानवी समाजाच्या संदर्भात सत्याचा शोध घेण्यात ती चिंतनशील बनते. माणसाने माणसावर केलेल्या अन्याय, अत्याचाराविरुद्ध ती तुटून पडते, संताप व्यक्त करते, आवश्यक तेथे ती बंडाची भाषाच वापरत नाही तर ती महायुद्ध पुकारायलाही मागेपुढे पाहत नाही. म्हणूनच दलित कविता ही एक विचारधारा आहे. ज्या विचाधारेचा उगम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यापासून होतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांअगोदर महात्मा फुले किंवा त्यांच्याही अगोदर बुद्धापर्यंत साहित्य–चळवळीचे प्रेरणास्थान नेण्याचा काही लोक उगीच उपद्व्याप, खटाटोप करीत आहेत. परंतु बुद्ध वा फुले यांच्या कार्याने येथे साहित्यिक चळवळ निर्माण झाली नाही. ती बाबासाहेबांच्याच कार्याने झाली आणि या साहित्यिक चळवळीचे पहिले बंडखोर लेखकही डॉ. बाबासाहेब आंबेडकरच होत हेही आपणास अभ्यासताना दिसेल.

दलित कवितेचा विचार करताना गेल्या बारा ते तेरा वर्षांतील कवींच्या कवितांचाच विचार करावा लागेल. कोणी हा प्रवाह मागे किसन फागून बनसोडपर्यंत नेतात. परंतु कि. फा. बनसोड, शिवराम जानबा कांबळे, केरूबुवा गायकवाड, पतितपावन, दिनबंधू शेगावकर, वामन कर्डक या कवींनी किंवा त्यानंतरचे हरिहरराव सोनुले, दिनेश लखमापूरकर, वसंत राजस, शरद महातेकर, वाळकृष्ण वासनिक, यादवराव गांगुर्डे, सौ. हिरा बनसोडे आदी कवीनी विपुल काव्य लेखन केले असले किंवा त्यांपैकी काहींचे कवितासंग्रहही प्रकाशित झालेले असले तरी त्यांच्या काव्यलेखनात मराठी कवितेत स्वत:चं स्थान निर्माण करून टिकविणारं असं गुणात्मक वैशिष्ट्य नव्हते. त्यांच्या काव्यलेखनाच्या कालखंडात सातत्य नव्हतं, त्यातील काहींची पारंपरिक कवितेशी नाते सांगणारी

कविता होती आणि त्यांच्यातील काहींची डॉ. बाबासाहेब आंबडकर यांची चरित्रात्मक, सामाजिक आशयाचीच परंतु सिनेमाच्या व इतर चालीवर भजनी मंडळे, जलसे, गायनपार्टया, कलापथके यामध्ये गाता यावी अशी गाणी होती. त्यात लोकरंजनाचा भाग जास्त होता. याचा अर्थ असा नव्हे की त्यांच्या रचनांचा विचारच केल्या जाऊ नये. तो जसा एका वेगळ्या संदर्भात आवश्यक ठरतो तसाच तो दलित कवितेचा विचार करताना अप्रस्तुत ठरतो असे मला वाटते. कारण तसाच विचार केला तर हा कालखंड त्यामागेही कर्ममेळ्यापर्यंत नेता येईल, पण तो निश्चितच चुकीचा ठरेल. आपणाला हेही दिसून येईल की आजचे जे आघाडीचे दलित कवी आहेत तेही सुरुवातीला पारंपरिक कविताच लिहीत होते.

बालकवी, केशवसुत, मर्ढेकर, कुसुमाग्रज, बोरकर, इंदिरा संत, मुक्तिबोध, पाडगावकर, करंदीकर, वापट इत्यादी कवींच्या परंपरा ते जोपासत होते. त्यांचा काव्यसंभार आदर्शभूत मानून तशाच प्रकारची ते कविता लिहीत होते. आजचे आघाडीचे दलित कवी या वरीलपैकी कोणत्या ना कोणत्या कवीने झपाटलेले होते. परंतु नंतर मात्र त्यांना स्वतःच कवितेतील खोटेपणा, नकलीपणा कळू लागला. कारण अर्वाचीन मराठी कवितेचे जनक केशवसुत किंवा त्यानंतरचे गोविंदाग्रज, तांबे, कुसुमाग्रज, मर्ढेकर, माधव ज्युलियन किंवा बोरकर, पाडगावकर, करंदीकर, वापट आदींनी सामाजिक जाणिवांचे काव्यलेखन केलेही आहे. परंतु त्यांच्या सामाजिक जाणिवांना मर्यादा होत्या हिंदुत्वनिष्ठ परंपरेच्या, रूढीवादाच्या, धार्मिक अज्ञान, अंधत्वाच्या, चातुर्वर्णाच्या. कवितालेखन-परंपरेच्या पद्धतीत व विषयात त्यांनी बदल केलाही असेल पण तो भारतीय दलितांच्या जीवनापासून शेकडो मैल दूर होता. या कवींचा विद्रोह धर्म, रूढिप्रियता, चातुर्वण्य मानून जगणारा होता. दलितांचे दुःख त्यांच्या गावीही नव्हते. त्यांची दृष्टी चंद्र, सूर्य, रान, झाडे, पाने, फुले, फळे, सुगंध, मदिरा, प्रेम, राधा, गोपिका, देव, धर्म या व अशाच भाराभर विषयांवर खिळून होती. ती त्याच्यापुढे जातच नव्हती. हा कवी

'जेथे न जाय रवि' तेथे जात होता. पण अस्पृश्यांच्या झोपड्या, त्यांच्या जीवन जगतानाच्या उरी फाटणाऱ्या वेदनेपर्यंत, त्यांच्या आक्रोशापर्यंत त्यांची दृष्टी पोहचली नव्हती. पोहचूही शकत नव्हती. त्यांची जाणीव मध्यमवर्गीय होती.

आणि असाच दुसरा कालखंड मराठी कवितेत येऊन गेला. तो म्हणजे लघुनियतकालिकातील कवींच्या कवितांचा. या कवींची जाणीव परभृत होती. तिला नुसतेच वासनेचे डोहाळे लागले होते आणि तिच्या प्रसूतोच्या वेदनांतून 'कंजीनायटल ॲबनॉरमॅलिटी'ची 'ॲनन कॅफॅली' सारखी निष्पत्ती झाली. ती निरर्थक प्रसूती होती. त्याविषयी या लेखात हा ओझरता उल्लेख करणे यासाठी जरुरी आहे की दलित कवितेने व साहित्याने मराठी साहित्यात जे अनेक ऐतिहासिक बदल घडवून आणले त्यात मराठी साहित्यात येऊ घातलेल्या ह्या 'कुचिन्हा'चा जन्मतःच गळा दाबला. नाहीतर ही मराठी कवितेला जबरदस्त कीड होती. ही बिनचेहऱ्याची, बिनडोक्याची, हातपाय नसलेली आणि फक्त लिंग असलेली कविता दलित कवितेच्या आगमनाने नपुंसक ठरली.

दलित कवींना सुरुवातीच्या स्वतःच्या कवितेतील पारंपरिकपणा, नकलीपणा, खोटेपणा कळू लागल्यानंतर ते दलितांच्या जाणिवांची, सामाजिक आशयाची कविता लिहू लागले. त्यांना त्यांचा आवाज सापडत गेला, चेहरा दिसू लागला. १९६३-६४ च्या नंतर त्यांच्या कवितांमध्ये फरक झाला. त्यात सातत्य आले. कारण प्रवाह हा अखंड असावा लागतो. थांबतो तो प्रवाह नसतो. तसेच काव्यात्मक गुणांनी त्यांनी मराठी कवितेत स्वतःची भाषा (शैली),सौंदर्य आणि स्थान निर्माण केले. म्हणून याच कवींच्या बारा ते तेरा वर्षां अगोदरच्या प्रकाशित, अप्रकाशित कविता दलित कवितेचा विचार करताना कालबाह्य ठरतात.

म्हणून दलित कविता ही अनुकरणात्मक नाही. तर असे ठामपणे म्हणता येईल की दलित कवितेने जुने संकेत, जुन्या कल्पना, जुने विषय, जुने हेतू त्याज्य ठरविले. एवढेच नव्हे तर कवितेचे जुने अंतर्बाह्य

स्वरूपच पालटवून स्वतंत्र, अस्सल कवितेने मराठी कवितेचे दालन समृद्ध केले. मराठी कवितेत एक महत्त्वाचा लक्षवेधी टप्पा निर्माण केला.

काही टीकाकारांचे म्हणणे असे की दलित कवितेत कवीचा स्वतःचा चेहरा दिसत नाही. तीत कवीचा स्वतःचा आवाज नाही. तिचा गोंधळ ऐकू येतो. परंतु ही टीका अतिशय ठिसूळ स्वरूपाची आहे. दलित कविता अभ्यासताना एक गोष्ट स्पष्ट लक्षात येते की दलित कवींची भूमिका त्या समाजाचे प्रतिनिधित्व करणारी आहे. स्वतः व समाज भोगीत असलेल्या आणि भोगलेल्या अत्याचारांचे भेदक चित्र व त्याविरुद्धचा नकार, विद्रोह या कवींच्या काव्यनिर्मितीचे प्रयोजन असल्याने त्याचे प्रतिबिंब त्यांच्या कवितेत उमटणे स्वाभाविक आहे. ही अनुभूती मराठी कवितेत प्रथमःच येत असल्याने ती कधी कवीच्या आवाजाने, चेहऱ्याने, कधी समाजाच्या आवाजाने चेहऱ्याने प्रतीत होते. त्यामुळे तिच्या कवित्वाला कोणताच उणेपणा येत नाही. तिच्यातून सामाजिक प्रबोधनाचा विचार होत असतानाच कवीच्या प्रबुद्ध भावनांचा अनावर उद्रेक बाहेर पडतो. तिच्यात डोकावले तर तिची धग, तेज जाणवते. तिचे तळपते प्रकाशमान रूप डोळ्यात भरते. म्हणूनच दलित कविता ही स्वयंभू आहे. तिचा स्वतःचा एक आवाज आहे.

दलित कवितेतील अभिव्यक्तिच्या संदर्भात दोन अस्पष्टसे प्रवाह आहेत. ते आपणाला सूक्ष्म निरीक्षणानंतर दिसतात. त्यातील एक प्रवाह म्हणजे खेडचातील अस्पृश्यता, दारिद्र्य, भीषण अत्याचार यामुळे व्यथित झालेले मन, त्याचे गर्दचित्र व त्याविरुद्धचे आक्रंदन, प्रक्षोभ, विद्रोह हे सांगणारा आणि दुसरा मुंबईच्या बकाल वस्त्या, झोपडपट्टचा, वेश्या व त्यांचे अड्डे, गिरणीतील कामगार, गोदी कामगार आदींच्या कष्टांचे, दारिद्र्याचे, राहण्याचे, जगण्याचे, भणंग जीवनाचे जीवघेणे चित्र रेखाटणारा, त्याविरुद्ध बंडाची भाषा बोलणारा व गर्जून उठणारा. हे दोन प्रवाह दाखविण्याचे कारण मुंबईतील दलितांच्या राहण्याचे, जगण्याचे प्रश्न व खेडचातील दलितांच्या राहण्याचे, जगण्याचे प्रश्न भिन्न, भिन्न

आहेत. मात्र हे दोन्हीही प्रश्न माणुसकीला काळिमा फासणारे, हृदय छिन्नविच्छिन्न करणारे, संतापाचा डोंब निर्माण करणारे असे आहेत. या दोन्ही प्रवाहांत समग्र दलित जीवनाची अनुभूती चित्रित झाली असल्याने असे म्हणता येईल की दलित व्यक्तीचे आक्रंदन हेच दलित कवितेचे उगमस्थान आहे आणि अधिष्ठानही.

म्हणून या बारा–तेरा वर्षांच्या कालखंडात जी कविता निर्माण झाली ती आपणासमोर कवितासंग्रहाच्या रूपाने व काही स्फुट स्वरूपात आहे. दलित साहित्यातील कथा, कादंबरी, नाटक, वैचारिक लेखन, समीक्षा इत्यादी वाङ्मयप्रकारापेक्षा काव्यप्रकार मोठ्या प्रमाणात लिहिल्या जात असून पुस्तकरूपाने बाहेर येण्याचेही त्याचे प्रमाण इतरांच्या तुलनेत अधिक आहे. हे पाहू जाता आपणासमोर आज तरी ज्यांच्या कवितांचा विचार करणे क्रमप्राप्त ठरणार आहे ते कवी आहेत केशव मेश्राम (१), नामदेव ढसाळ (४) †, वामन निंबाळकर* (१), दया पवार (१), यशवंत मनोहर (१), नरेश इंगळे (१), शशिकांत लोखंडे (१), त्र्यंबक सपकाळे (१), चोखा कांबळे (१), प्रल्हाद चेंदवणकर (१), ज. वि. पवार (१).

केशव मेश्राम

ज्यांच्या कवितांचा आपण विचार करणार आहोत त्या सर्वांमध्ये काव्यलेखन करणारे नुसतेच सिनियर नव्हे तर प्रभावशाली कवी म्हणून केशव मेश्राम यांचा उल्लेख करावा लागेल. सुरुवातीची दहा वर्षे त्याचा काव्यलेखनाचा कालखंड तत्कालीन मराठी कवितेसारखा चाकोरीबद्ध असूनही स्वतःचं वैशिष्ट्य कायम करणारा होता. त्या पिढीतील मधुकर केचे, ग्रेस, नारायण सुर्वे, तुळशीराम काजे, शंकर रामाणी, दिलीप चित्रे, अनुराधा पोतदार या कवींबरोबर केशव मेश्राम यांनी प्रचलित प्रवाहात आपलं नाव नोंदविल्या जावं असं काव्य लेखन केलं. मराठीच्या दर्जेदार

---

† (१) कंसातील आकडे हे प्रकाशित झालेल्या कवितासंग्रहाचे आहेत.

* माझ्या कवितेविषयी मी बोलणार नाही.

नियतकालिकांतून त्यांची कविता प्रकाशित होत असतानाच त्यांच्या कवितेने गेल्या तपात एक लक्षणीय वळण घेऊन सामाजिक जाणीव समर्थपणे रेखाटण्यात वेगळेच यश प्राप्त केले. मेश्राम यांच्या कवितांमध्ये सामाजिक दुःख व्यक्त करताना निसर्गातील चराचराच्या प्रतिमा इतक्या सहज आणि नेमक्या येतात की त्यांनी दलितांच्या मूलभूत दुःखाची खोली अंतर्बाह्य कळायचे मोजमाप कविता वाचताना वाचकांच्या दृष्टीत येते.

ज्या समाजरूपी पाखराचे पंख आजवर कापले गेले होते किंवा या पाखरांना पिंजऱ्यात ठेवल्या गेले होते ती पाखरे आज उड्डाण करायला बाहेर पडली आहेत, या समाजातील तरुण परंपरेची सर्व बंधने झुगारून देऊन जीवनाचे खऱ्या अर्थाचे स्वातंत्र्य मिळवायला झेपावली आहेत. त्यांच्याभोवती आमिषांचे जाळे टाकायला येथली स्वार्थी परंपरा व त्यांचे ठेकेदार मागेपुढे पाहणार नाही.

अशा पाखरांना कवी म्हणतो, तुमच्यासाठी मी काय करू ते सांगा. पण जगलो ते दळभद्री जीवन मात्र तुम्ही मात्र जगू नका. येथील संस्कृतीने, धर्माने मला त्यांच्या सोयीसाठी लवून सलाम करणे म्हणजे दास्यच शिकविले. त्यांचे ईप्सित साध्य करण्यासाठी माझा त्यांनी भरपूर उपयोग करून घेतला. राहण्यासाठी सुन्दर घरे, शिक्षणासाठी विद्यापीठे, पाण्यासाठी पाणवठे, बसण्यासाठी सुंदर जागा, एवढेच नव्हे तर मेल्यानंतर चांगले मसणवटेही त्यांच्यासाठी त्यांनी उभारलीत. यांपैकी माझ्यासाठी मात्र काहीही नाही. आमच्यापैकी कोणी चांगले राहू लागला तर त्याला मात्र तसे न राहण्यास भाग पाडले जाते. म्हणून कवी या वेगवेडचा पाखरांना उद्देशून म्हणतो की खुशाल भरारी मारा, आकाशात, सुसाट भन्नाटा,

लावली बाणाला माझीच पिसे मिरकावण्यासाठी
मला शिकविल्या ऋचा . . . लवून सलाम सुभाषिते

. . . . . .

. . . . . .

करतात कलकलाट सरळ कोणी वडावरू उतरू लागला तर
सारे पाणोठे, तिठे मसणवटे, सरकारी विद्यापीठे,
विद्धानांच्या ढोल्या त्यांच्यासाठी, त्यांच्यासाठी . . .

. . . काय मग आपल्यासाठी

तुमच्या आकाशातला संभाव्य वाळूगर्द तुकडा
ठेवाल का माझ्यासाठी ? पाखरांनो भरारा, सन्नाटा,

उत्खनन या त्यांच्या कवितासंग्रहातील ' बंद दरवाजे ' या पहिल्याच कवितेत मेश्रामांनी आपली निष्ठा आपल्या भूमिकेवर असल्याचे घोषित करून आपल्या हाकांना रान मोकळे असल्याचें सांगितले आहे.

मेश्राम हे कवी हृदयाचे विचारवंत असल्याने खेड्यातील व शहरातील सामाजिक, आर्थिक विषमतेविषयी त्यांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण होणे साहजिकच आहे. ' हे गल्ल्यांचे शहर ' किंवा 'आम्ही जळतो' या कवितांमधे याचा प्रत्यय येतो. या भीषण विषमतेचे चित्र रंगवताना ते देवाला शिवी देऊन विचारतात,

' साल्या तुकडाभर भाकरीसाठी
गाडीभर लाकडं फोडशील काय ?
बापाच्या बीडीकाडीसाठी. . . . . .
भावाबहिणीची हाडके शिजवशील ?
आणि हे तुला जमणार नाही.
कारण त्यासाठी मातीत अपमानित होवून राव रावावं लागतं
व तरीही आपल्या चिल्यापिल्यांवर प्रेम करावं लागतं,

आमचं जीवन एवढं खडतर व कष्टमय आहे की ते देवालाही (अर्थात असला तर) शक्य नाही इतके स्पष्ट विचार कवी मेश्राम आपल्या कवितेत काढतात. कवी मेश्राम यांच्या कवितेत भोगलेल्या दु:खाचे गडढ कढ, समाजाचे खोल जखमी मन, त्याला कसलाही भडकपणा न देता शब्दरूप घेऊन समर्थपणे आकारत जाते. कोसळलेल्या दीन, दलितांचे जीवन

त्या युगंधर पुरुषाने उभे केले. दगडागत पडलेल्याना चालायला शिकविले. त्यांच्या संदेशाने दास्याचे हजारो वर्षांचे मणामणाचे अवजड ओझे या लोकांनी भिरकावून दिले आहे व ते आता चालायला लागले आहेत. त्यांच्या या पायवाटेवर रूढींचे, परंपरेचे पहाड उभे असताना आणि अनेक अडथळे येतानाही हे चालणारे थकणार नाहीत. कारण चालण्याचे त्यांनी व्रत घेतले आहे, ते थांबणार नाहीत. हा आशावाद कवी मेश्राम त्यांच्या कवितेत व्यक्त करतात,

पहाडाला पाठी टेकवित लोक चालवित
त्यांच्या कपाळावर मळवट भरलेला असेल

. . . . . .

. . . . . .

हातातल्या मशाली पहाडाला खेटणाऱ्या
पोरासारख्या पेटतात
टेंभे भटकतात. बोळे धडकतात हे पाहणारांचे
डोळेच फाटतील
(उत्खनन : लोक चालतील)

अत्यंत आशयगर्भ असलेल्या 'कोंडी', 'नाच', 'ऊन', 'डंख', 'आम्ही जळतो' इत्यादी कविता कवी केशव मेश्राम यांच्या काव्यलेखनसामर्थ्याची जाणीव करून देतात. याच सामर्थ्यामुळे मराठीच्या अभ्यासक्रमात त्यांच्या कविता समाविष्ट झाल्या आहेत. आज मराठी कवितेत त्यांना वरचे स्थान प्राप्त झाले आहे ते त्यांच्या उत्खनन या काव्यसंग्रहाने.

नामदेव ढसाळ

मराठी कवितेत प्रचंड सामर्थ्यानिशी पदार्पण करून कवितेचा चेहरा मोहरा बदलविणारा, उलथापालथ करणारा आणि एकच हल-कल्लोळ उडवून देणारा अत्यंत ताकदीचा कवी म्हणून नामदेव ढसाळ यांचा उल्लेख करावा लागेल. कवी ढसाळ यांचे 'गोलपिठा', 'मूर्ख

म्हाताऱ्याने डोंगर हलवले ' व ' आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्रः प्रियदर्शनी ' हे तीन कवितासंग्रह कालानुक्रमे चार वर्षात प्रकाशित झाले आहेत त्यांचा गोलपिठा हा कवितासंग्रह प्रकाशित होण्यापूर्वीच कवी ढसाळांनी आपल्या कवितेने वाचकांचे लक्ष वेधून मराठी कवितेला सामर्थ्यवान कवी प्राप्त झाल्याचं लक्षात आणून दिलं होतं. त्यांच्या एकदम सुरुवातीच्या कविता जरी दुर्लक्षिण्यासारख्या होत्या तरी गेल्या सहा-सात वर्षातील त्यांच्या काव्यलेखनाच्या कालखंडातच त्यांनी आपले वेगळेपण व आपले स्थान सिद्ध केले आहे. नामदेव ढसाळांची कविता ही आसमंत फाडून येणाऱ्या विजेसारखी येऊन कोसळते अन्याय, अत्याचार, दारिद्र्यावर. शिष्टसंमत शब्दांना फासावर लटकावून ती ऊर फोडणारी वेदना प्रचंड आगीच्या लोळासारखी धुमसत राहते आणि पेटवीत राहते येथील हजारो वर्षांच्या प्रवासातील काळोख, नाकारते यापुढे अंधाराचे यात्रिक होण्याचे,

सूर्याकडे पाठ फिरवून त्यांनी शतकांचा प्रवास केला
आता अंधारयात्रिक होण्याचे नाकारलेच पाहिजे

(गोलपिठा : आता)

अंधारयात्रिक होण्याचे नाकारत असतानाच लक्तरांतील हीनांची, दीनांची अब्रू जेव्हा गोलपिठातून नागविली जाते तेव्हा हा कवी म्हणतो,

अंधाराने सूर्य पाहिला तेव्हा
शब्द हुंकारले
नरकाच्या कोंडवाडचात
किती दिवस राहायचं आम्ही ?
श्वास घुसमटत . . . .
. . . . .
–तुमच्या पापाचे छिनाल घट फोडण्यासाठी
–शब्द म्हणाले
अंधाराने सूर्य पाहिला तेव्हा

(गोलपिठा : अंधाराने सूर्य पाहिला तेव्हा)

मुंबईतील गोलपिठा नावाचा जो वेश्यांचा भाग आहे त्याचे मेंदूला झिणझिण्या आणणारे, डोकं सुन्न करणारे, शरीराचा थरकाप उडवून देणारे अग्निचित्र नामदेव ढसाळ शब्दबद्ध करतात. ढसाळांच्या गोलपिठात आहेत अर्धपोटी किंवा पोटभर अंधार घेऊन जगणाऱ्या, शरीराचे नुसते सापळे, उकिरडचात किंवा घाणीत, फुटपाथवर, गटारात वळवळणाऱ्या किडचांसारखी माणसे. शरीरभर रोगांचं साम्राज्य घेऊन जगणाऱ्या, चिंतेत मरणाऱ्या वेश्या. गोलपिठातील जगात संस्कृती नावाला देखील नाही. तिच्यापासून मुद्दाम, बुद्धिपुरस्सर तेथील लोकांना दूर ठेवल्या गेले आहे. राजकीय स्वातंत्र्य मिळून व स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या तत्त्वांचा उदोउदो करणारी लोकशाही शासनप्रणाली स्वीकारून जवळपास तीस वर्षांचा काळ लोटला तरी गरीबांची गरीबी, दारिद्र्य, अस्पृश्यांवरील अन्याय, अत्याचार यांचे दास्य संपलेले नाही. येथे सामान्य माणसाला सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा दिली जात नाही, अशी लोकशाही आज जरी मेली तरी आम्हाला कवडीची खंत वाटणार नाही. ही भावना तीव्रपणे व्यक्त करताना कवी ढसाळ आपल्या **'कॉम्रेड अर्थात १२ बलुतेदारांसाठी'** या दीर्घ कवितेत म्हणतात,

ही लोकशाही नाहीहे
ही विटंबना सतरा पिढचांची मूग गिळून पोसलेली
.....
.....
हा पिळवणुकीचा पिंजरा
.....
.....
.....
लोकशाही डुल्लत डुल्लत जाय आपुन त्वांड वासून पाय
ही लोकशाही नाहीहे ही विटंबना सतरा पिढचांची
म्हणा म्हणा कॉम्रेड दंड ठोकून म्हणा

हाण सख्या तुझीच बारी
लोकशाही मेली तर डेंगण्यामारी

(गोलपिठा)

स्वातंत्र्य हे सामान्य माणसाला उपभोगता यावं, त्याची गोड फळे त्यालाही चाखता यावी म्हणून या स्वातंत्र्याबद्दल अपेक्षा व्यक्त करताना ते स्वातंत्र्याला उद्देशून लिहितात,

तू न्हायला नकोस काळ्या खडकाआड
तू झोपायला नकोस स्वच्छ इस्तरीच्या गालिच्यावर
.....
सर्वांच्या डाळरोटीवर पसर गूळखोबरं
.....
.....
.....
तू ये आणि उरातला गहिवर
ज्याच्या चांदण्या तुझ्या मार्गात पसरलेल्या
तू ये झोळणा घेऊन ज्यात पान
सुपारी
काथ
चुना
लवंग
अत्तर

(गोलपिठा : निमित्त १५ ऑगस्ट ७१)

येथे उगवणारा प्रत्येक दिवस लाच खाणाऱ्या माणसासारखा शरमिंदा होऊन येथला परंपरेचा पाठिराखा होतो. 'माणसं भादरून पेपरवटमधी कुणी बंद केलीयत' असं विचारताच कवीला प्रकाश लॉकअप झालेला दिसतो. करपलेल्या आतड्यात साधी मातीही भरायला मिळत नाही हे पाहताना कवीस माणूसपणाचीच किळस येते. दारिद्र्याच्या शेताची वहिवाट करणारे कवी ढसाळ 'रक्तात पेटलेल्या अगणित सूर्यांना'

बोलावताहेत आणि या 'शहरा शहराला आग लावित चला' असे सांगताहेत. इतकेच नव्हे तर पुढे जाऊन हा कवी येथील माणसाने कार्य करावे व कशासाठी हेही सांगतो.

माण्साने पहिल्या प्रथम स्वत:ला
पूर्ण अंशाने उध्वस्त करून घ्यावे
.....
.....

चरस गांजा ओढावा
अफीन लालपरी खावी
मुबलक कंट्री प्यावी
.....
.....

याला त्याला कुणालाही आयमयणीवरून
गाली द्यावी धरुन पिदवावे
.....
.....

मर्डर करावा झोपलेल्यांची कत्तल करावी
.....
.....

पोरीबाळीशी सइंद्रिय चाळे करावे म्हातारी म्हणू नये
तरणी म्हणू नये कवळी म्हणू नये सर्वांना पासले पाडावे
व्यासपिठावर समग्र बलात्कार घडबून आणावे
.....
.....

येशूच्या पैगंबराच्या बुद्धाच्या विष्णूच्या वंशजांना फाशी द्यावे
देवळे चर्च मशिदी शिल्पे म्युझियम कुस्करून टाकावे
.....
.....
.....

हे सारे सारे विश्वव्यापी गळूप्रमाणे फुगू द्यावे
अनामवेळी फुटू द्यावे रिचू द्यावे
नंतर उरल्या सुरल्यांनी कुणालाही गुलाम करू नये लुटू नये
काळा गोरा म्हणू नये तू ब्राह्मण तू क्षत्रिय तू वैश्य तू शूद्र असे हिणवू नये
.....
.....
आभाळाला आजोबा अन जमिनीला आजी मानून त्यांच्या कुशीत
गुण्यागोविंदाने आनंदाने राहावे
चंद्रसूर्य फिके पडतील असे सचेत कार्य करावे
एक तीळ सर्वांनी करंडून खावा माण्सावरच सूक्त रचावे
माण्साचेच गाणे गावे माण्साने

(गोलपिठा : माण्साने)

येथला जातीचा, धर्माचा, येथल्या कप्प्या कप्प्यांचा विचार पूर्ण अंशाने उध्वस्त करून नंतर येथे माणूस हा फक्त माणूस असावा. तो कुणाचाही गुलाम असू नये, माणसाने माणसाचेच माहात्म्य गावे. जात, धर्म, नाती, गोती, काळा, गोरा, उंच, नीच इत्यादी विषमतेच्या विचारांचा लवलेशही असता कामा नये. सर्वांना पाविल्याने, समतेने, प्रेमाने बंधुभावाने वागविल्या जावे व एक तीळ सर्वांनी करंडून खावा असा मानवतावादी विचार ढसाळ यांनी या कवितेत अशा पद्धतीने मांडला आहे की ही कविता म्हणजे ढसाळांची सर्वोत्कृष्ट कविता ठरावी. मराठी कवितेचे ते अमूल्य लेणे ठरावे.

याशिवाय गोलपिठातील 'डॉ. आंबेडकर', 'पाणी', 'येथला प्रत्येक हंगाम' व 'मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले' या संग्रहातील 'शूद्राचं जीवन घेऊन', आईच्या समजुतीसाठी', 'दु:खाचा वाढदिवस', 'कस्टडीतला पहारा देणारा पोलीस' ह्या कविता दीर्घकाळ लक्षात राहण्यासारख्या उल्लेखनीय आहेत.

'आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्र: प्रियदर्शनी' ही

दीर्घ कविता म्हणजे ढसाळांच्या परिपक्व विचारांच्या प्रतिभेचा उत्तुंग आविष्कार ठरावा. या कवितेत दलितांच्या दुःखाच्या तमाम छटा व त्यातून मुक्त करणाऱ्या वाटा स्पष्ट होतात. ही साधी उद्देशिका नाही तर खंडकाव्याचा हा नवा प्रकार आहे. या दशकातील काव्याचा हा अतिशय उत्कृष्ट नमुना आहे. दलित कवितेत मौलिक भर टाकणारी ही ढसाळांची कविता कोण्या व्यक्तीवर त्याचं माहात्म्य गाणारी कविता नाही. चिर जीवनमूल्यांसाठी लढाई लढणाऱ्या तत्त्वांविषयी ही कविता आहे. समग्र ढसाळ या कवितेत उभे राहिलेले दिसतात.

शाश्वत मूल्यांच्या गोष्टीसाठी
शब्द पणास लावणारा कवी मी
घेऊन आलो आहे स्वतःच्या
पददलित वर्गाची 'आयडेंटीटी'

किंवा

मी तडफड तोय नि घामाने डबडबतोय
मी अनुभवतोय प्रसववेदनांचं दुःख
काय लिहू
कस्सं कस्सं लिहू
भूकेबद्दल की दारिद्र्याबद्दल
दैन्याबद्दल की दास्याबद्दल
छळांबद्दल की बळांबद्दल
संस्कृती
रीतिरिवाज
पायरी
देव धर्म दगड
.....
ह्यांच्या नावावर त्यांनी आम्हाला मारलंय
ठेचलंय मारलंय
त्यांनी तोडल्येत लचके आमच्या हाडामासाचे.

साळांच्या गोलपिठातील कवितेत हागमूत, डेंगणे, लवडा, जतांच्या माळा, लेडाची गाडगी, झवणं याशिवाय डेडाळे, डल्ली, सल्लीबोटी, गुडसे, डीलवोळ इत्यादी शब्द येतात की जे उच्चारणाऱ्यालाही चुकल्या चुकल्यासारखे वाटते. कोणाच्याच संस्कृतीत न बसणारे हे शब्द असतात. परंतु ढसाळांच्या कवितेत ते अशा पद्धतीने येतात की त्या कवितेचा तेच प्राण ठरतात. कवी किती प्रक्षुब्ध झाला आहे याच्या थर्मामिटरचे काम हे शब्द करतात. एरव्ही अश्लील वाटणारे हे शब्द कविता वाचताना मात्र त्यांनीच कवितेचा आशय समृद्ध होतो व उंची वाढते असे प्रकर्षाने दिसून येते. कवी नामदेव ढसाळ यांच्या कवितेने मराठी कवितेचे दालन समृद्ध झाले आहे. म्हणून मराठीच्या अभ्यासक्रमात त्यांचाही समावेश झाला आहे.

यशवंत मनोहर

असाच दुसरा प्रतिभावान कवी म्हणून यशवंत मनोहर यांचा विचार करावा लागेल. गेल्या पंधरा वर्षांपासून ते काव्यलेखन करीत आहेत. प्रारंभी मनोहर यांच्या प्रेम कवितेने मराठी वाचकांचे लक्ष वेधून घेतले होते. सुंदर, भावमधुर शब्दांची पेरण, उत्कट, तरल भावनांचे स्पंदन त्यांच्या सुरुवातीच्या कवितांमध्ये दिसायचे. त्यांच्या त्या कविता प्रतिष्ठान, युगवाणी, मनोहर इत्यादी मराठीच्या दर्जेदार नियतकालिकांतून प्रकाशित होत असतानाच त्यांच्या कवितेने लक्षवेधी वळण घेतले. आणि त्यातूनच उत्थानगुंफा या त्यांच्या संग्रहाचे प्रकाशन झाले.

कवी यशवंत मनोहरांची कविता प्रचलित काव्यप्रवाहाची कास धरणारी, चांदण्याच्या स्वप्नात विचरणारी, मध्यमवर्गीय वाङ्मयाच्या प्रकाशझोताने दिपून जाणारी असली तरी स्वयंतेजाने तळपणारी आहे अशी टीका आमचे काही थोर टीकाकार मित्र करताना दिसतात आणि दलित कवींच्या यादीतून मनोहरांना सफाईदारपणे उडवण्याचा प्रयत्न करतात. कवी मनोहरही स्वतःला दलित कवी समजत असो किंवा नसो परंतु मनोहरांच्या या चार, पाच वर्षांतील कवितेतील बदल लक्षात

घेतला तर त्यांनी सामाजिक जाणिवांची, बांधिलकीची, पददलित समाजाच्या बाह्य व आंतरिक मनोवृत्तीची, त्यांच्या भावभावनांची, समाजमनाशी सुसंवाद साधणारी अशी दर्जेदार कविता लिहिली आहे. दलित कवितेला अभिप्रेत असलेला विद्रोह, नकार व स्वीकार, आशय व अभिव्यक्ती त्यांच्या कवितेत प्रभावीपणे येत असल्याने कोणी इतर व स्वत: मनोहर त्यांना दलित कवी समजो अथवा न समजो मी मात्र त्यांना अत्यंत प्रत्ययकारी, लक्षणीय दलित कवी समजतो. मनोहरांच्या आजच्या कविता वाचल्यावर आज मराठी कवितेत मान्यता, प्रतिष्ठा प्राप्त झालेल्या दलित कवींच्या पुढे त्यांची कविता झेपावणारी आहे असे दिसते. एवढेच नव्हे तर आजच्या मराठी कवितेतही त्यांची कविता अग्रेसर दिसते. मनोहर शब्दांसाठी अडून बसत नाहीत तर शब्दांचे खजिने त्यांच्यासाठी सदैव उघडे असतात आणि प्रतिमा हात जोडून उभ्या असतात. त्यांची भाषा ओजस्वी, ओघवती व मनस्वी आहे. तिला नाद आह, लय आहे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे तिचे स्वत:चे अंगभूत नेत्रदीपक काव्यगुण आहेत.

या देशातील शास्त्रे, पुराणे, वेद आदींनी निर्माण केलेली माणसांचीच कोंडी, येथील अनेक धर्मपंथांनी आवळलेले, दाबलेले माणुसकीचे गळे पाहताना कवी यशवंत मनोहर तळतळून जातात, त्यांच्या अंगाची लाही लाही होते, जीवाचा थरकाप होतो. त्यामुळे ते शांत राहूच शकत नाहीत, त्यांचे कविमन आक्रंदून उठते आणि म्हणते,

जाताना मुक्याने जाणार नाही या पसाऱ्याला शाप देऊन जाईन.

येथे तथाकथित उच्चभ्रूंनी आपल्या सोयीनुसार व सर्वसामान्यांना फसवणाऱ्या ज्या अनेक गोष्टी करून ठेवल्या, त्यांच्या व्याख्या केल्या, कप्पे केले त्यात इतरांना प्रवेश नाही. ह्या असल्या खोट्या गोष्टी पाहून कवी मनोहर त्याच कवितेत म्हणतात,

तुम्ही निर्मिलेल्या चकव्यांचे प्रदेश
तीक्ष्ण चोचींनी तोडतात माझे लचके, भोवती जीवघेणा आकांत

आणि शोभिवंत कुचकेपणाला तुम्ही म्हणता साहित्य
केवळ जरतारी शब्दांना दिपून तुम्ही महाकवी म्हणता
तुम्ही करता पूजा पुष्पावगुंठित घाणीची
अनंत विश्वे दारिद्र्याला तुम्ही गोष्ट सांगता राजा आणि राणीची
तुम्ही लिहा साहित्य, शास्त्रे लिहा तत्त्वज्ञाने सोयीची
परंतु येथे मिरासदारी आहे काहींची हे मी ओरडून
आकांतून सांगत जाईन
जाताना मुक्याने जाणार नाही या पसाऱ्याला शाप देऊन जाईन

(उत्थानगुंफा : निषेधनामा)

कवी मनोहरांनी पाहिली आहेत येथे सर्वनाशात विव्हळणारी द्वारे, काही प्रतिष्ठित ठेकेखोरांनी डोळ्यांच्या वाळवंटांनी जपलेले चिंध्याचे लांबलेले वाळवंट, इथे प्रकाश रुजू दिला जात नाही, येथला प्रत्येक येणारा वहर गुलाम असलेला, आणि म्हणूनच कवीचे मन तडफडते, कळवळते. इकडे, तिकडे, सभोवती दिसणाऱ्या या दुःखाला कोणीही वारसदार नाही. अशा वेळी या बेवारशी दुःखाला हा शब्दप्रभू 'मी माझा शब्द देऊन जाईन' असे म्हणतो आणि शाप देत म्हणतो,

दुभंगून जाऊ दे पृथ्वी
मला विझवण्यासाठी प्राचीन मंदिरातील घंटानी चालविलेला गजर
जमिनदोस्त होऊ दे
. . . . . .
. . . . . .
. . . . . .
ही मारेकऱ्याची महावस्त्र ध्रुवांधार फाडत जाईन
पापांच्या या सर्वच राहुटचा मी बेगुमान जाळत जाईन
जाताना मुक्याने जाणार नाही या पसाऱ्याला शाप देऊन जाईन
येताना उत्तरे देऊन आलो होतो जाताना प्रश्न घेऊन निघून जाईन

(उत्थानगुंफा : निषेधनामा)

या हिंदुधर्मातील समाजव्यवस्थेने अस्पृश्य ठरविलेल्या लोकांना रोजचे मरण दिले. त्यांना सहन कराव्या लागणाऱ्या वागणुकीत, अपमान, लाजिरवाणेपणात क्षणाक्षणाला त्यांचे मरणेच असते. त्यांची भावनाहीन, निर्विकार शरीरे नुसती जगत असतात. त्यामुळे अत्यंत जवळच्या माणसाला किंवा मोठ्या भावाला हृदयातील, आतल्या कप्यात होत असलेली घालमेल कवी 'निर्वाणीचे पत्र' या कवितेत लिहितो.

डोळ्यांच्या या खाचात माझ्या पहा सूर्यास्ताची रांग
आणि हरक्षणी मरत मरत कसे जगावे तेवढे सांग

या क्षणाक्षणाला मरण्याने कवी तडफडतो, त्याच्या भावना अनावर होतात,

मी शब्द शोधतोय भाऊ इथे निर्णायक काळोखात
तडफडतोय नित्य जसे प्रेत तडतडावे सरणात

.. ..

... ...

कुठल्या सागरात बुडून माझा दाह शांत करु सांग
किंवा दरक्षणी मरत मरत कसं जगावं ते सांग

(उत्थानगुंफा : निर्वाणीचे पत्र)

सभोवती स्मशानच आहे. त्यात आकांत केल्याने किंवा ही निष्पर्ण वृक्षांची वस्ती स्वतःच पालवीभक्षक असल्याने त्यात ओरडलो, आक्रोश केला तरी काही फायदा नाही. कोणीही येथे ऐकणारे नाही याची जाणीव कवीला असल्याने त्याच्या ओठात वणवे पेटलेले आहेत, लाव्हा खदखदत आहे आणि ह्या वणव्यांना किंवा बाहेर येऊ पाहणाऱ्या लाव्हास काही उत्तर आहे का असा प्रश्न ते भाऊस विचारतात,

ओठात थडकलेला लाव्हा त्याला कुठले उत्तर सांग
किंवा दरक्षणी मरत मरत कसे जगावे तेवढे सांग

(उत्थानगुंफा : निर्वाणीचे पत्र)

येथे शब्दांची पुजा करणारेच आजवर कवी झालेत. त्यांनी त्यांचे जरतारी मखमली शब्द फक्त कल्पनांच्या हिंदोळ्यावर झुलविलेत. माणसांच्या

आणि तेही ज्यांच्या वस्तीत आनंदाचा, सुखाचा, समृद्धीचा किरण कधीच दिसला नाही अशांच्यासाठी तर त्यांनी आपले शब्दही अस्पर्शित ठेवलेत हे पाहून हा कवी लिहितो,

शब्दांची पूजा करीत नाही मी माणसांसाठी आरती गातो
ज्यांच्या गावात सूर्य नाही त्यांच्यासाठी दुवा मागतो

या वस्तीतून चालताना प्रत्येक पावलागणिक अंधार पाहताना कवीला त्याच्या लहानशा जीवघेण्या आयुष्याचाच संताप येतो. येथे ज्या हातांनी खून होतात ते हातच मानाचे जीवन जगतात, पुन्हा, पुन्हा अन्यायाच्या त्याच विषारी इतिहासाची पुनरावृत्ती होते. ज्या अन्यायांनी ज्या अनेकांचे जीवनच बरबाद केले, भयाण, वैराण केले त्याचा हिशेब आपल्या शब्दांतून देण्यास कवी कटिबद्ध झाला आहे.

ज्याप्रमाणे कुणाची जयंती गुढी पताकांनी घराला शोभिवंत करून साजरी करतात त्याप्रमाणेच या देशात प्रत्येक वर्ष दलितांवरील बहिष्कारांनी, अत्याचारांनी सजविल्या जाते. निष्पाप दलितांचे जीव घेऊन त्यांच्या रक्तावर येथे आनंदोत्सव साजरे होतात, जे स्वतःला नीतिमान समजतात तेच या ठिकाणी गरीब पतिव्रतांची इज्जत नग्न करून त्यांची धिंड काढतात आणि एवढी पापे करूनही त्यांना मात्र मानाने जगण्याचे सर्व अधिकार मिळतात, वरदान असते. अशांची नावे जाहीर करणारा हा कवी नंतर म्हणतो,

त्यांच्यासाठी ही कविता त्यांच्या श्वासांना दिशा नाहीत
त्यांच्यासाठी ही कविता ज्यांच्या हृदयात आशा नाहीत
त्यांच्यासाठी ज्यांना इथे ठाव नाहीत, गाव नाही, नाव नाही
. . . . . .
शक्य असेल तर प्रकाशाची स्तोत्रे गाणारी झाडे होवोत
या माझ्या शब्दांची त्यांच्या वैराणात
. . . . . .
शक्य असेल तर शब्दांचे दिवे होवोत

त्यांच्या अंधारखिन्न स्मशानात

. . . . . .

. . . . . .

त्यांच्यासाठी ही कविता ज्यांना भूक संकटासारखी वाटते

. . . . . .

गोदऱ्यांप्रमाणे आयुष्यं ज्यांची इतरांसाठी त्यांची खंत कवितेत माझ्या
जळत ठेवतो

शब्दांची पूजा करीत नाही मी माणसांसाठी आरती गातो

(उत्थानगुंफा : माणसांसाठी आरती)

असा हा माणसांसाठी आरती गाणारा कवी मात्र अंतर्मुख होऊन स्वतःचं परीक्षण करताना अत्यंत कठोर होतो. कठोर चिंतनशील परीक्षण हे समाजाच्या गाडीला वेग आणारे 'गेयर' आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणानंतर या समाजातील आपसातील दुही, पुढाऱ्यांची स्वार्थासाठी, पदासाठी भांडणे, त्यांनी केलेल्या समाजाच्या एकीची शकले आदींचा समाचार घेतो. बाबासाहेबांनी या समाजाला स्वाभिमान शिकविला, शिक्षण घ्यायला, एकी करायला व संघर्ष करायला शिकविले आणि ह्या समाजाला एका उच्च स्थळी आणून सोडले. आम्ही मात्र त्याला पुन्हा गर्तेत लोटत आहोत. बाबासाहेबांचे अनुयायी म्हणवून घेण्यास आम्ही नालायक आहोत, आम्ही घोर अपराधी आहोत. म्हणून कवी म्हणतो,

त्याच्या आठवणींशी डोळे भिडवतानाही आता अपराध्यासारखे वाटते

. . . . . .

नंतर गरजणारे सूर्यसंदेश दफन केले आपणच मोहल्ल्या मोहल्ल्यात
दोस्त हो ! त्यांच्या दिग्दर्शक आठवणींना सोडचिठ्ठ्या दिल्या आपण
त्या आपल्या कनवाळू बापाने उजेडाची इस्टेट
राजकारणाच्या जुगारात हरलो आपण

. . . . . .

. . . . . .

आपण सर्वांनी अभद्र संध्याकाळ भोवती जमा केली दोस्त हो !
या संध्याकाळी झाकोळताना खिन्न काळीजच चिरडल्यासारखे वाटते
त्यांच्या आठवणींशी डोळे भिडवतानाही आता अपराध्यासारखे वाटते

(उत्थानगुंफा : त्याच्या आठवणींशीही डोळे भिडवताना)

अशा या क्षितिज कवेत घेऊन उभे राहण्याचे सामर्थ्य असलेल्या कवी मनोहर यांच्या 'जन्मासंबंधी एक कविता', 'बांगला देश', 'मारोती कांबळे', 'आंबेडकरांच्या ओठावरील प्रलयंकारी सूर्य' या आणि अशाच इतर कविता त्यांच्या विशिष्टतेची जाणीव करून देतात. कवी मनोहर यांच्या अनेक कवितांतून निराशावाद दिसत असला तरी तो भविष्यातील वाटा प्रकाशमय करण्यासाठी प्रतिज्ञाबद्ध झालेला आहे. त्यांची कविता वाचताना कवीच्या मनात चाललेली घालमेल, भावनांना आलेले उधान आणि त्यातून त्यांना सांगावयाचा विचार हा प्रभावीपणे, स्पष्टपणे लक्षात येतो व खोलवर रुतून बसतो. त्यांच्या कवितेतील रुग्णाईत दारे, डोळ्यांचे वाळवंट, चिंध्यांचे आभाळ, जळतानाचे रात्र, दिवस, कान फुंकणारा आर्त काळोख, निर्लज्ज अंधारगुहा, ओठातील सूर्य, उधळलेले ऊर, हाडांचे कळप, अंधारगुहांचे महासागर, अनंत जिद्दी वादळे, क्षितिज पेरणे, पापणकाठ, मनातला भूकंप, आंधळ्या श्रद्धांची विरूप गर्दी, अध्यात्मालाही सनसनाटी मेकअप, माणूस ऑफ करून, धाप लागलेला म्हातारा सूर्य, आक्रंदन करणारी स्मरणे, आंधळे आग्रह, कंदिलासारखे वेचित फिरणे, डोळ्यात गुंतलेला अंधार, कोड फुटलेल्या दिशा, काविळ झालेले विचार, हेटाळणीचे काच, सूडबुद्धीची थुंकी, अरण्यहृदया, प्रेत-वर्या, अध्यात्माने विष देऊन मारलेले क्षितिज, दुःखपुत्रा, ओसाड भविष्य, वांझोटे जाते हे आणि असेच कितीतरी शब्द आणि प्रतिमा मराठी कवितेच्या जगात प्रवेशून या कवीच्या भविष्यातील वाटा व स्थान स्पष्ट करणाऱ्या आहेत.

दया पवार

जीला आपण दलित कविता संबोधतो तीत प्रारंभीच जे दोन, तीन

कवितासंग्रह प्रकाशित झालेत त्यांत दया पवार यांच्या 'कोंडवाडा' ह्या कवितासंग्रहाचा उल्लेख करावा लागेल. दया पवार हे मेश्राम, हिवराळे, निंबाळकर, मनोहर, इंगळे यांच्यानंतर काव्यलेखन करू लागले. सुरुवातीला त्यांच्या प्रेमकविता माणूस, वाङ्मयशोभा, पैंजण, रंभा, मेनका या मासिकांतून प्रकाशित झाल्या. परंतु त्या कवितांनी त्यांचे नाव मराठी वाचकांच्या लक्षात राहिले नाही. ते सर्वपरिचित झाले १९६८–६९ नंतरच. 'कोंडवाडा' या संग्रहात लिहिलेल्या कवितेच्या 'माझे शब्द' या भूमिकेत स्वतः पवार म्हणतात, 'वादळात वृक्ष उन्मळून पडावा तसे माझे आयुष्य होते.····स्वतःचे माध्यम हवे याकरिता माझी कविता धडपडत होती.···भारतीय सांस्कृतिक जीवनात ही दरी आहे, याची जाणीव पुन्हा प्रकर्षाने येते. हे सांस्कृतिक द्वंद्व नाहीसे करण्याकरिता माझी कविता बळी पडली तरी चालेल, या भूमिकेशी मी आलो आहे.' ही काही वाक्ये कवीच्या भावनांचा, चिंतनाचा व काव्यलेखनाचा उद्देश स्पष्ट करतात. सांस्कृतिक द्वंद्व नाहीसे करायला निघालेला हा कवी 'प्रक्षोभ' या कवितेत म्हणतो,

पोलादी चौकटीआड
माझ्या मनातला मी
बोलू लागला बंडाची भाषा

ही बंडाची भाषा बोलत असतानाच कवीला येथील अत्याचार दिसतात. कोवळा पोर भडकत्या चितेत फेकल्या जाताना दिसतो. मायाबहिणींच्या निरेला हात घालणारे दुःशासन दिसतात आणि मग त्यांना बाबासाहेब आंबेडकरांची आठवण होते. तो प्रखर तेजाने तळपणारा सूर्य अस्तात गेल्यावर ज्या पुढाऱ्यांचा समाजाने जयजयकार केला तेही बेटे निस्तेज काजवेच निघाले. जे लवकरच विझले. म्हणून हा कवी समाजालाच 'तुम्ही प्रकाशाचे पुंजके' व्हायला सांगतो.

दया पवारांच्या कवितेवर कवी नारायण सुर्वे यांच्या कवितेचा प्रभाव आहे. हे कवी पवारही मान्य करतात. मुंबईतील घराची राहण्याची समस्या अतिशय बिकट आहे. एकाच खोपटात किंवा खोलीत

तीन तीन, चार चार बिऱ्हाडं. त्यामुळे नवदाम्पत्यास एकांत असा मिळतच नाही. याचं प्रत्ययकारी चित्र कवीने 'पहिली रात्र' या कवितेत रेखाटले आहे. तर अशीच दुसरी कविता म्हणजे 'गस्ती नसलेली वस्ती ही होय. रस्त्यावर, फुटपावर कलम केलेली माणसे डबक्यातील शेवाळासारखी.

कोजागिरीच्या चांदण्यात सारे जग गरगरत असताना, आनंदले असताना मात्र येथे गरिबीत चादणे भोवंडून जाते.

युगानुयुगे अन्याय, अत्याचार घडत असताना आणि वाल्मिकीसारखा महाकवी वेशीबाहेर जन्मला असतानाही त्याने मात्र त्याविषयी एक शब्द न लिहिता रामराज्याचे स्तुतिपर काव्य लिहावे याची खंत कवी पवाराना वाटते. म्हणून ते महाकवी वाल्मिकीला उद्देशून म्हणतात,

हा अन्याय अत्याचार वेशीवर टांगणारा
एक जरी श्लोक तू रचला असतास
तर तुझे नाव काळजावर कोरुन ठेवले असते

(कोंडवाडा : हे महाकवे)

जशी महाकवी वाल्मिकीबद्दल कवी खंत करतो तशीच खंत या देशाबद्दलही करतो. आम्ही या देशाचे आद्य नागरिक असूनही आम्हाला कसे दूर ठेवल्या जाते, म्हणून या देशाला महान कसे म्हणावे हा प्रश्न कवीस पडतो.

कवी दया पवार 'सभा' या कवितेतून दलित समाजाच्या आजच्या दुःस्थितीचे अत्यंत सूक्ष्म निरीक्षण करतात,

कुणाचा कुणाला बसेना मेळ
अध्यक्षपदाच्या शितासाठी
जमली सारी भुतावळ
हादरला तिथला पिंपळपार
मेणबत्तीचा उजेड विझला
सारा ..... सारा अंधकार

या समाजात असलेला हा अंधकार पाहून कवी अस्वस्थ आहे. हे दास्य, दैन्य दूर व्हावे यासाठी त्यांची कविता आहे. 'कोंडवाडा', 'क्रांती', 'गांधी जन्मशताब्दी', 'टेरीलीन शर्टातला मी', 'संस्कृती', 'ब्रोकन मेन' इत्यादी कवितांना त्यांचा स्वतःचा आवाज आहे. दया पवारांच्या कवितेतील शब्द साधे, सोपे पण ते बांधण्यांचे कसब त्यांचेच आहे.

नरेश इंगळे

यांचा 'अंगारा' नावाचा कवितासंग्रह. इंगळे यांची कविता काहीशी अनाकलनीय अशा स्वरूपाची परंतु उधानून, झपाटून आलेली अशी आहे. येथील समाजाच्या बसविलेल्या उतरंडीची धूळधान करून समग्र क्रांती या कवीला अभिप्रेत आहे. आणि अशा क्रांतीसाठी सर्वांनी आपल्या भालावर टिकळा लावण्याची गरज आहे. असे गर्जून सांगणारा हा कवी, स्वतःही कवितेच्या माध्यमाने आतून बाहेरून पेटलेला जागोजागी दिसतो.

देशासाठी प्राण पणाला लावून शत्रूशी लढलेल्या एका दलित सैनिकाला त्याच्या शौर्याबद्दल स्वातंत्र्यदिनी परमवीर चक्र बहाल करण्यात येते. तो सोहळा सुरू असताना इकडे मात्र त्याच्या आईवर खेड्यात बलात्कार होतो. या घटनेचे अत्यंत भेदक चित्र कवी इंगळे रेखाटतात. राजकीय स्वातंत्र्य आणि सामाजिक स्वातंत्र्य यांतील भेदच अप्रत्यक्षपणे स्पष्ट करतात. जोवर या देशातील दीन–दलितांना, गोरगरिबांना सामाजिक स्वातंत्र्य मिळत नाही तोपर्यंत या राजकीय स्वातंत्र्याला अर्थ उरत नाही. येथे दलितांना कोणतेच स्वातंत्र्य नाही याची जाणीव इंगळे करून देतात. हे सांगत असताना इंगळे कमालीचे अस्वस्थ व क्षुब्धही झालेले असतात. इंगळेच्या 'अंगारा'ने काही आशा निर्माण केल्या होत्या. पण त्यानंतर त्यांचे काव्यलेखन थांबले आहे की काय एवढ्या मंदगतीने होत आहे. ते त्यांनी वेगाने करावे म्हणजे दलित कवीतील चांगला कवी गळणार नाही.

चोखा कांबळे

'पिंपळपान' या दीर्घकवितेने चोखा कांबळे हे मराठी रसिक व अभ्यासकांसमोर आले. या काव्यात 'पिंपळपान' हे प्रतीक घेऊन हिंदु-धर्मात शूद्र ठरविलेल्या जाती, स्त्री व वेश्या यांच्या दुःखाला वाचा फोडलेली आहे. समाजवृक्षाचे हे पान गळलेले आहे. पीडलेल्या समाज-मनाची ही कथा व व्यथा आहे

बुद्धाला बोधिवृक्षाखाली ज्ञानप्राप्ती झाली होती. मानवतेला लागलेली दुःखाची कीड कशी दूर होईल याचाच ध्यास घेतलेल्या बुद्धाच्या डोक्यात आलेला विचार हा विज्ञानवादी, सुसंबद्ध जीवन जगण्यासाठी मार्गदर्शक मूलभूत भौतिकवादी होता. याच डोळस जाणिवेने चोखा कांबळे यांनी 'पिंपळपान' हे प्रतीक घेतले असावे. हिंदुधर्माने शूद्र मानलेला पददलित समाज, स्त्री व वेश्यांच्या दुःस्थितीचे व त्या घृणास्पद जीवनाशी लढण्याच्या लढाईचे ते शब्दरूप आहे. अशा मुक्तीचे गाणे गाणारा हा कवी जगातील पिळलेला माणूस जागृत होऊन जेव्हा एक होइल तेव्हा प्रत्येक माणसाला सन्मानाने जगावयास मिळेल असा आशावाद या शेवटी कवितेत व्यक्त करतो.

त्र्यंबक सपकाळे

गेल्या चार–पाच वर्षांत जी काही ठळक नावे लक्षात राहण्यासारखी आहेत त्यात कवी त्र्यंबक सपकाळे हे एक आहे. 'सुरुंग' नावाचा त्यांचा कवितासंग्रह प्रकाशित झाला आहे व त्यावर मराठीच्या अभ्यासकांनी प्रतिक्रियाही नोंदविल्या. कवी सपकाळे यांची साध्या, सोप्या शब्दांची कविता दलित समाजातील खोल अनुभव घेऊन येते. सर्वत्र नागवल्या गेलेल्या समाजाची अबोल दुःखं मुखर करण्याचा प्रयत्न करते आणि या देशाला हे नागवेपण अजूनही झाकता आले नाही हेही ठणकावून सांगते.

मास्तरविना क्षितिजावर धुळाक्षरे गिरविणारा व वाचणारा हा

कवी सुरुंगाचा स्फोट होणार असल्याचे सांगण्यासाठी तथागताचे डोळे मागतो आहे.

कवी सपकाळे यांची 'स्वागत' ही उपरोधात्मक व 'शांत ! शांत ! !' ह्या चांगल्या कविता. 'सुरुंग' या संग्रहात एक ऐरणी बोलीतील कविता आहे जिचा उल्लेख येथे करणे मी आवश्यक समजतो.

एकाच गाडीतील दोन प्रवासी बसायला दाटीवाटीने एकमेकांना जागा देतात. जोपर्यंत एकमेकांची जात माहीत होत नाही तोपर्यंत एकमेकांशी गप्पागोष्टी, चर्चाच करीत नाही तर एक दुसऱ्याजवळील पदार्थही खातात. मात्र जेव्हा एकाला दुसऱ्याची जात खालची आहे असे कळते तेव्हा तो उलटचा करतो व खाल्लेले बाहेर पाडू लागतो किंवा पडू लागते आणि विचारले तर सांगतो की काही झाले नाही, गाडी लागली आहे. हे विलक्षण मर्मभेदी चित्रण सपकाळे यांनी 'गाडी लागनी माल्हे गाडी लागनी' या कवितेत केले आहे.

सपकाळे यांच्या चांगल्या कवितांपैकी ही एक कविता आहे. सपकाळे यांच्या कवितेचे स्थान अजून निश्चित व्हावयाचे असले तरीही जाणीवपूर्वक चालविलेल्या प्रयत्नांचे फळ त्यांना निश्चितच मिळत आहे.

प्रल्हाद चेंदवणकर

भरपूर आशय व अभिव्यक्ती घेऊन आलेल्या नव्या चेहऱ्यांपैकी यांचा ठसा पक्क्या स्वरूपात ठसवणारा 'ऑडिट' हा कवितासंग्रह. गेल्या पाच वर्षांतील त्यांच्या कवितेच्या निर्मितीत वर्णव्यवस्था, धार्मिक रूढी, आर्थिक विषमता यांचे कवीला लागलेले चटके स्पष्ट जाणवतात. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या समाजाला तसेच कवीला डोळस, सशक्त, स्वाभिमानी बनविण्याचे एक जबरदस्त इन्जेक्शन दिले. प्रकाशाच्या किरणांचे हजारो हात झालेला हा कवी लोड करून ठेवलेल्या बंदुकीसारख्या कविता आवरू शकत नाही. दलितांवर होणाऱ्या अत्याचाराच्या रोज प्रकाशित होणाऱ्या बातम्या वाचल्यावर कवी आक्रंदून टाहो फोडतो, तो रस्त्यावर येतो. लाठीमार, अश्रुधूर, गोळीबाराला

भीक घालत नाही,
रक्ताच्या थारोळचात उमटतं
लखलखीत प्रतिबिंब
दलितांचा बिनधास्त आवाज
दणाणत असतो रस्त्या रस्त्यावर
अश्रुधूर, लाठीमार, गोळीबार पचवित, पचवित
घराघराचा बनतो पोलादी किल्ला
लढत असतो क्रांतीचं निशान घेऊन
खांद्यावर .....
.....

(ऑडिट : उसळता सूर्य)

इतर दलित कवींसारखे कवी चेंदवणकरसुद्धा समाजाच्या दुंभगलेपणाचा, फाटाफुटीचा धिक्कार 'नमक हराम' या कवितेत करतात. एका निश्चित दिशेला निघालेला हा ध्येयार्थी कवी 'दुष्काळग्रस्त उध्वस्त चुली' पाहून म्हणतो,

श्वासा श्वासागणिक धुमसणाऱ्या
ह्या दुष्काळग्रस्त, भूकेकंगाल, उध्वस्त चुली
रस्त्या रस्त्यावर जेव्हा विखुरल्या जातात
तेव्हा आभाळात गुरगुरणाऱ्या
असंख्य बाँबधारी विमानासारख्या
त्या मला दिससात.

प्रल्हाद चेंदवणकर यांच्या संग्रहातील 'ऑडिट', 'वरात', 'त्यांचा शोधही लागलेला नसावा', 'माझा बाप' ह्या कविता त्यांचे वैशिष्टय सांगून जातात. चेंदवणकरांच्या कविता वाचल्यावर नारायण सूर्व्यांच्या कवितांचा थोडाफार प्रभाव त्यांच्यावर जाणवतोच. त्यातून संपूर्ण मोकळे होऊन 'चेंदवणकरांची कविता' स्वयंप्रकाशित होईल यात वाद नाही.

शशिकांत लोखंडे

नवीन कवीपैकी ज्यांनी आशा निर्माण केल्या त्यात शशिकांत

लोखंडे यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. त्यांचा कविता संग्रह प्रकाशित झाला असला तरी स्फुट कवितेनेच वाचकांचे लक्ष वेधून घेतले आहे. हजारो वर्षाच्या अन्यायाचे समाजपुरुषाच्या पाठीवरील वळ पाहून हा कवी येथील दांभिक आणि खुज्या संस्कृतीचा धिक्कार करतो. दुःखांचे महासागर पचवून जगतानाही संस्कृती व स्मृती शास्त्र, पुराणे यांचा हवाला देऊन दलित समाजाची वाटेल तशी अमानवी विटंबना करण्यात आली याची खंत कवी करतो.

ज. वि. पवार

ज. वि. पवार यांचा नुकताच प्रकाशित झालेला 'नाकेबंदी' हा कवितासंग्रह. सातत्याने चार–पाच वर्षे काव्यलेखन करणाऱ्यांमध्ये पवारांचे स्थान निश्चित झाले आहे. बागडणाऱ्या वयात कारावास भोगतोय हे सांगणारे कवी पवार पन्नास वर्षे मागे उलटून जेव्हा पाहताहेत तेव्हा त्यांना काय दिसते ! तर बाबासाहेब जेव्हा दलितमुक्ती लढ्याची महाडच्या संग्रामापासून सुरुवात करतात तेव्हा या भारतात परिस्थितीचा काळोखच काळोख पसरलेला होता. त्यांच्या वाटेवर खाचखळग्यांनीच त्यांचे स्वागत झाले. अनेक अडथळे झेलत या महामानवाने परिस्थितीवर मात करून येथील बहिष्कृत निद्रिस्त जगाला जागृत केले, मुक्यांना मुखर केले, पांगळ्यांना वेगवेडे करून धावायला सांगितले. त्यामुळे कवी पेटलेला आहे व समुद्राला आग लावायला निघाला आहे,

तुझे शब्दच असे की
काठ्यांनी संगिनी व्हाव्यात
तुझा संघर्षच असा की
हाकाट्ये तुझ्या पायाजवळ गळून पडावीत
. . . . . .
आणि तू तू पेटवतोयस मला
आता समुद्राला आग आपणच लावली पाहिजे

(नाकेबंदी : आज पन्नास वर्षांनी)

येथील नागवलेल्या दलितांची–मायबहिणींची इज्जत व अन्याय, अत्याचार यांच्याविरुद्धचा आवाज हा कवी पवारांच्याही कवितेचा विषय होतो. त्यामुळे विद्रोहाचा ज्वालामुखी आतल्या आत कोंडून कसा राहील, असा सवालही पवार उपस्थित करतात. त्यांच्या 'कॅबरे' ह्या कवितेत बांद्रयाच्या झोपडपट्टीतील दलितांच्या फाटलेल्या जीवनाचे शब्द चित्र रेखाटताना कवी प्रचंड पेटलेला आढळतो. 'का पेटला नाहीस', एकदा जन्मून घ्या,' 'तांबडं फुटलंय,' 'रक्ताची माणसं', किंवा 'वरळी: जानेवारी १९७४' ह्या आणि इतरही कविता क्षुब्ध झालेल्या मनाची ग्वाही देतात. मात्र पवारांच्या बऱ्याच कवितांमधून आशयाच्या संदर्भात तोच तोपणा आल्यासारखा वाटतो. पण 'पाणी प्यायची सुट्टी,' 'दुष्काळाची झुंज' या कविता वेगळ्या ठराव्या.

या शिवाय राम दुतोंडे (रापी जेव्हा लेखणी होते), अर्जून डांगळे (छावणी हलते आहे), आशा थोरात (पानगळ), बी. रंगराव (इडिपस), हरिश बनसोडे (हू विल डायग्नोझ इट ?) अशोक पाटील (बस्तान), सुरेश कदम (मांजर), शांताराम हिवराळे (अश्रुचा उन्हाळा), सुखराम हिवराळे (शब्दायण), बापुराव जगताप (निळ्या पहाडाच्या कविता), प्रकाश जाधव (दस्तखत), दु. मो. लोणे (घुगऱ्या), भीमसेन देठे (होरपळ), डब्ल्यु. कपूर (बंधमुक्त) प्रज्ञावंत गौतम (माझा द्वेष पोसलाय), अजय रामटेके (युद्धाई) इत्यादि काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. त्यांचा येथे सविस्तर विचार करणे अशक्य आहे.

अशे हे दलित कवी सामाजिक जाणिवेने पेटलेले, यांच्या शब्दात अंगार आहे, जो जाळणार आहे अन्यायाला, अंधत्वाला, ढोंगीपणाला, अत्याचाराला. यांच्या ओठात लाव्हा खदखदत आहे प्रक्षोभाचा. विद्रोहाची आणि मानवतेची क्षितिजे उबविण्यासाठी प्रतिज्ञांचे अग्निबाण हातात घेऊन आणि अंगात पोलादाचे चिलखत चढवून हे निघाले आहेत प्रकाशाचे गीत गात. म्हणून या कवींसंबंधी बोलणारी जीभही पोलादाचीच असायला पाहिजे. कुठल्याही अनधिकारी जीभेने या कवींसंबंधी

बोलण्याचे अनाठायी धाडस करून आपल्याला हास्यास्पद करून घेऊ नये.

या लेखात दलित कवींच्या लेखनाचा कालखंड संदर्भासाठी जाणीवपूर्वक दिला आहे. संक्षिप्तपणे येथे काही कवींच्या कवितांवद्दल लिहिण्याचा हा प्रयत्न केला. या लिहिण्याला जागेची मर्यादा असणारच. याशिवाय जे सातत्याने काव्यलेखन करीत आहेत आणि ज्यांनी वाचकांचे लक्ष वेधून काही आशा निर्माण केल्या आहेत, ते कवी आहेत, माधव कोंडविलकर, उमाकांत रणधीर, धर्मराज निमसरकर, रतनकुमार पाटलीपुत्र.

ज्यांनी भरपूर प्रमाणात आणि सकस काव्यलेखन केले ते कवी सुखराम हिवराळे यांचा कवितासंग्रह प्रकाशित झाला तर दलित कवितेत भर पडेल. मराठीचे श्रेष्ठ कथाकार, कादंबरीकार व दलित साहित्याचे एक प्रमुख आधारस्तंभ बाबुराव बागूल यांनीही ६६–६७ च्या दरम्यान काव्यलेखन केले जे लक्षणीय आहे. बागूलांनी काव्याचा प्रकार हाताळण्याचे सोडू नये.

आज मोठ्या प्रमाणात मराठी कवितेत दलित कवितेची भर पडत आहे. त्याचे प्रमाण आणि वेग खूप आहे. त्यात लिहिणारे एमेस अंधेरीकर, सौ. सुनंदा भोसले, मा. कं. वंळज, शिवा इंगोले, भगवान सवाई, इ. मो. नारनवरे, धनंजय गुडदे, अरविंद निकाळजे, का. रा. वालदेकर, दादाभाऊ साळवे, तुका कोचे, दामोदर मोरे, कुंदा गायकवाड, सौ. सुरेखा भगत, सुधाकर गायकवाड, अशोक बनसोडे, राम गायकवाड, के. एम्. देवळे, अरुण कांवळे, पुंडलिक धोंगडे, भीमराव शृंगारे, नामदेव पोघे, कु. शशिकला वरपे, चंद्रकांत वानखेडे, अमिताभ पद्मपाणी, वि. ए. राजगुरु, मीना गजभिये, ल. स. रोकडे, बबन चहांदे, मोरेश्वर वाहाणे, मधुकर ताकसांडे, नीलकांत चव्हाण, ज्ञानेश्वर वानखेडे, भीमराव शिरवाळे, मधुकर पानतावणे, प्रकाश खरात प्रसेनजीत ताकसांडे इत्यादी तरुण मंडळी आहे. मी समजतो आंब्याच्या प्रचंड वृक्षाला लागलेला हा भरघोस मोहर आहे. त्यातील काही झडणार, जळणार,

काही गळणार आहे. उरलेल्यांचे मात्र गोड फळात रूपांतर होणार आहे. यांची कविता मान्यवर दलित कवींच्या पुढे कितपत झेपावते ह्याचे उत्तर भविष्यात मिळणार आहे परंतु आज दलित कवितेवर होत असलेला तोच तोपणाचा, एकारलेपणाचा आणि पुढच्या कवींची भ्रष्ट नक्कल करण्याचा आरोप आपण तपासून पाहणे आवश्यक ठरणार आहे दलित कविता आज जरी भोवऱ्यात गरगरल्यासारखी दिसत असली तरी त्यातून ती निश्चितच बाहेर पडणार आहे. कारण दलितांचे दलितत्व दूर करण्यासाठी प्रतिज्ञांच्या बंदुका खांद्यावर घेऊन निघालेल्या या प्रतिभावान कवींना या समाजाच्या आनंदाची सुखाची, त्याच्या कुटुंबवत्सलपणाची, माणुसकीची, जीव ओवाळून टाकाव्या अशा त्याच्या प्रामाणिक जगण्याची, त्याच्या इतर प्रश्नांची, उत्तरांची, त्याच्या विधायक कृत्यांची आणि अशाच जीवन जगण्याच्या इतरही संदर्भाची कविता लिहावी लागणार आहे. कारण या समाजाचे सबंध जीवनच इतरांच्यापेक्षा वेगळे आहे. या कवितेची नाळ या समाजाशीच जोडली असल्याने त्याचे सर्वांग तिला चित्रीत करावे लागणार आहे. सच्चा व प्रामाणिक पण वेगळा जीवन अनुभव हाच तिचा सर्वात मोठा अलंकार असल्याने तिला फालतू कलावादाच्या किंवा इतर कसल्याही कृत्रिम नटण्यामुरडण्याची गरज नाही. म्हणून दलित कवितेची उंची व व्याप्ती हीच मराठी कवितेचा उंचीचा व व्याप्तीचा मानदंड ठरणार आहे आणि त्याचे अनुकरण इतरही भारतीय भाषांमधून जेव्हा होईल तेव्हा दलित कविता जागतिक कवितेच्या पीठावर दैदीप्यमान ठरणार आहे.

• • •

दलित कथा : एक अभ्यास

दलित कथेचा अभ्यास करताना मराठी कथेतील तिचे स्थान व स्वरूप ठरविण्याअगोदरही मराठी कथेचा संक्षिप्त आढावा घेतला तर मला वाटते फारसे वावगे ठरू नये. अर्वाचीन मराठी कथेच्या पार्श्वभमीवरच दलित कथेचे स्वरूप तिची वैशिष्टचे त्र एकूण मराठी कथेतील तिचे नेमके स्थान ठरविता येईल. आणि म्हणून अर्वाचीन मराठी कथालेखनाचा इतिहास, कथा, लेखक व कथेचे स्वरूप पाहू या.

अर्वाचीन मराठो कथा व कथाकार

मुद्रित अर्वाचीन मराठी कथेची परंपरा व इतिहास सुमारे सव्वाशे वर्षांचा आहे. कारण मराठीतील पहिली कथा १८५४ साली विष्णु घनश्याम नावाच्या लेखकाने लिहिली. ही कथा नोव्हें. १८५४ ला 'मराठी ज्ञानप्रसारक' या मासिकाने क्रमश: चार अंकातून प्रकाशित केली. कथा निर्मितीची ही सुरवात फारच मंद होती. त्याच मासिकाने

पुढे दहा वर्षात फक्त सोळा कथा प्रकाशित केल्या. यावरून लिहिणारे कथा लेखक किती व त्यांच्या लिहिण्याचा वेग आपल्या लक्षात येतो. काही कथांवर तर कथाकारांची नावेही नसायची. जशा कथा कमी लिहिल्या जात होत्या तसे त्या प्रकाशित करणारी मासिकेही जवळ जवळ नव्हतीच.

या सुरवातीच्या मराठी कथा, कामकथा, व्यभिचार कथा, उत्तान कथा, प्रेमकथा, साहसकथा, अद्‌भूत कथा, परिकथा, दंतकथा, अशा स्वरूपाच्या होत्या. स्वतंत्र वास्तववादी स्वरूपाच्या त्या कथा नव्हत्या. त्यांच्यावर बोकोशिओ यांच्या 'दि कॅमेरॉन' या तंत्र प्रसिद्ध कथा संग्रहाचा जबरदस्त प्रभाव होता. 'दि कॅमेरॉन'चा इंग्रजी अनुवाद १८६० साली प्रकाशित होऊन तो भारतात आलेला होता. भाषांतरकाराचे नाव मात्र त्यावर नव्हते. 'दि कॅमेरॉन' मधील कथांची शैली व विषय यांनी मराठीचे सुरवातीचे कथाकार झपाटले गेले होते. यात गैर नव्हते. कारण त्याअगोदर त्यांच्यासमोर कथा लेखनशैली वा पद्धतीचा मराठी भाषिक लेखकांचा कोणताच आदर्श वा परंपरा नव्हती. पुढे पुढे यातील काही कथांचे स्वैर अनुवाद झाले, काहीच्या कथानकांचा उपयोग करण्यात आला. काही कथांची शब्दशः भाषांतरे झालीत. स्वतंत्रपणे कथा निर्मितीक्षम असलेल्या कथाकारांनी नुसती शैली आदर्श म्हणून स्विकारली. १८९० नंतर काही परदेशी कथांची भाषांतरे झाली. त्यात जर्मन व चिनी भाषेचा समावेश होता. ह्या कथा मराठीत आणण्याचे काम त्यावेळी मराठी ज्ञानप्रसारक, विविध ज्ञानविस्तार, ज्ञानसंग्रह, मनोरंजन व निबंध चंद्रिका ही मासिके १८९० पर्यंत करीत होती. या मासिकांनी बोटावर मोजण्या इतक्या गोष्टी छापल्या. १८९० साली (ह. ना. आपटचांनी) 'करमणूक' नावाचे मराठी मासिक सुरु केले. आणि करमणूकीद्वारे त्यांनी मराठी कथा सामान्य वाचकाला वाचावयास शिकविली. नंतर १८९१ च्या सुमारास निघालेल्या लोकमित्र, शालापत्रक, महाराष्ट्र कोकिल, सुशील, आदी मासिकांनीही मराठी कथा प्रकाशित केल्या. पण त्या मौलिक स्वरूपाच्या नव्हत्या.

रहस्य कथा खऱ्या अर्थाने मराठीत आणण्याचे काम १८९५ साली निघालेल्या मासिक 'मनोरंजन' ने केले. रहस्य कथांचा आजही मोठा वाचक वर्ग आहे. तसाच तो त्याकाळी 'मनोरंजन'ने निर्माण केला. १९०३ पर्यंत म्हणजे सुमारे ५० वर्षांच्या प्रदीर्घ काळात मराठी कथेत म्हणावी तशी भर पडली नाही. या काळात १७ मासिकांनी कथा प्रकाशित केल्या. ज्यांचा वाङ्मयीन दर्जा खालच्या प्रतीचा होता. तो विचारात घेण्याजोगा मुळीच नाही. कथा नावाचा वाङ्मय प्रकार मराठीत आला एवढाच त्याचा फायदा झाला असे म्हटले तर फारसे वावगे ठरू नये. मराठी कथेच्या सुरवातीच्या पन्नास वर्षाच्या काळात एकही मान्य व्हावा असा कथासंग्रह निघाला नाही. त्याउलट मात्र पन्नास वर्षात सुमारे सव्वाशे कादंबऱ्या प्रकाशित झाल्या. या सव्वाशे कादंबऱ्यांपैकी महत्वाच्या लक्षणीय किती हा मुद्दा जरी बाजूला सारला तरी कथेपेक्षा कादंबरी प्रकार जन सामान्यात रूजू झाला होता, त्याने मूळ धरले होते. यावरून असेही अनुमान काढायला हरकत नाही की बोकॅशिओचा आदर्श समोर ठेवून लिहिल्या गेलेली कल्पनाप्रधान स्वैर कथा पूर्णपणे अपयशी ठरली होती.

१९१५ साली मात्र हरिभाऊंच्या स्फुट कथांचे संकलन प्रकाशित झाले. तर १९१६ साली वा. म. जोशी यांचा 'नवपुष्करंडक' नावाचा कथासंग्रह प्रकाशित झाला. वरील कालखंडात हरिभाऊंनी 'करमणूक' मधून, गुर्जरांनी 'मनोरंजन' मधून कथालेखन केले. पुढे कथा प्रकाशित करण्याऱ्या मासिकांचीही संख्या वाढत गेली. व त्यात कथालेखन करणाऱ्या लेखकांची भर पडत गेली. काही ध्येय धोरण ठरवून मराठी कथा प्रकाशित करणाऱ्या मासिकांचा विचार करताना करमणूक, मनोरंजन, रत्नाकर, यशवंत, किर्लोस्कर, अभिरुची, सत्यकथा या मासिकांच्या नावाबरोबर लेखकांचीही नावे जुळून येतात. व मग मराठी कथेच्या विकासाचे महत्त्वपूर्ण टप्पेही अभ्यासात येतात.

वि. सी. फडके, गो. गं. लिमये या प्रसिद्ध कथाकरांनी कथालेखानास १९११ साली प्रारंभ केलेला आढळतो. तर 'मनोरंजन'च्या या

काळातच दिवाकर कृष्ण यांनी कथालेखन केले. दिवाकर कृष्णाची कथा तोपर्यंत लिहिल्या गेलेल्या कथेच्यापेक्षा वेगळ्या स्वरूपाची होती. बोधवाद, धर्मतत्व शिकविणे किंवा मनोविनोद सांगणे याला दिवाकर कृष्णांच्या कथेने फाटा दिला. व सहेतुकपणे ती स्वतंत्र अस्तित्व घेऊन आली. १९२६ ते १९४५ ह्या कालखंडात दुसरा टप्पा सुरु झालेला दिसतो. याच काळात यशवंत हे स्वतंत्रपणे कथेला वाहिलेले मासिक निघाले. तसेच किर्लोस्कर, स्त्री, मनोहर, जोस्ना, प्रतिभा, संजिवनी, कला, पारिजात, इत्यादि मासिके या कालखंडात निघाली. या मासिकांनी लघु कथेच्या वाढीसाठी खास प्रयत्न केले. प्राधन्याने कथांना स्थान दिल्याने या कालखंडात चांगल्या कथाकारांची नामावली आपल्या डोळ्यासमोर येते. त्याचवरोबर याच काळात लघुकथेचा विकास झालेला आढळतो. व कथावाङ्मय प्रकार नुसताच लोकप्रिय नाही तर इतर वाङ्मय प्रकारांच्यापेक्षाही वरचढ झालेला दिसतो. हा कालखंड कथेच्या भरभराटीचा म्हटला पाहिजे. या कालखंडात ना. सी. फडके, वि. स. खांडेकर, य. गो. जोशी, वि. वि. बोकील; अनंत काणेकर, दत्तात्रय रघुनाथ कवठेकर, श्री. म. माटे, वरेरकर, ना. ग. गोरे, डॉ. अ. वा. वर्टी, लक्ष्मणराव, सरदेसाई, सुखटणकर, कमलाबाई टिळक, कृष्णाबाई, विभावरी शिरुरकर. आनंदीबाई किर्लोस्कर, या व इतरही बऱ्याच कथाकारांनी आपल्या कथांच्या निर्मितीने व वैशिष्टचाने आपले नाव मराठी कथाकारांच्या यादीत समाविष्ट केले. त्याच काळात दिघे, ठोकळ, चोरघडे कुसुमावती देशपांडे यांनीही आपली हजेरी लावली होती. विनोदी कथेलाही या काळात चांगलेच अस्तित्व प्राप्त झाले होते.

चिं. वि. जोशी व प्र. के. अत्रे ही दोन नावे विनोदी कथाकार म्हणून प्रामुख्याने पुढे होती. १९४५ च्या नंतर मराठी कथेला नवे वळण लागलेले दिसते. नव्या प्रवृत्ती व प्रकृतिच्या नवसाहित्याला यावेळी सुरुवात होते. काव्य व कथा यात नव साहित्य पहिल्यांदा प्रवेशते. मर्ढेकरांनी त्यांच्या काव्यातून नव्या प्रवृत्ती, प्रकृति स्पष्ट केल्या तर कथेच्या या काळात गाडगीळ, गोखले, भावे, माडगूळकर यांनी बदल

घडविला. व नव कथाकार म्हणून आपले नाव पक्के केले. याच काळात शांताराम यांचेही नाव वरच्या चारांच्या ओळीत गुंफावे लागते.

१९४५ ते १९६० हा कालखंड अशा नव प्रवाहाने वाहून निघाला. तसा जुन्या व नव्याच्या संगमानेही या काळात प्रवाहात थोडीफार भर पडली. पण नव्याचे धोके टाळून व जुन्यातील चांगले घेऊन कांही कथाकारांनी कथा लिहिल्या. त्यात प्रामुख्याने श्री. ग. जोशी, मोकाशी, वसुंधरा पटवर्धन हे कथाकार होते.

१९६० नंतर अनेक नवीन कथाकार पुढे आले. त्याअगोदरच ग्रामीण कथेला सुरुवात झाली होती. त्यात द. मा. मिरासदार, व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, आनंद यादव, रा. रं. बोराडे यांनी वाचकांचे लक्ष आपणाकडे वेधून घेतले होते. याच सुमारास मराठी कथेत बदल झालेला होता. ग्रामीण कथेबरोबरच मार्क्सवादी विचार घेऊन कांही कथाकार लिहीत होते. तर मराठी कथेला वाढविण्यासाठी श्री. दा. पानवळकर, मधु मंगेश कर्णिक, चि. व्यं. खानोलकर, लिला श्रीवास्तव, दिलीप चित्रे, जी. ए. कुळकर्णी हे नवनवीन प्रयोग व विषय हाताळण्याच्या खटपटीत होते. नियतकालीके व अनियतकालीके यांची संख्या सारखी वाढत होती. आणि त्यातून शेकडो गोष्टी, दीर्घकथा, लघुकथा, लिहिल्या जात होत्या. मध्यम व उच्चवर्णीय, व वर्गीय, माणसांच्या भाव भावना, त्यांचे साचेबद्ध जीवनातील प्रेम, दुःख, त्यांच्या वास्तव व कल्पनेतील मनोरथांचे चित्रण करण्यात मराठी कथा समर्थ झाली होती.

या वरील सर्व कथाकारांनी वेगवेगळे विषय घेऊन कथेच्या संदर्भात वेगवेगळे प्रयोग केले असले तरी मराठी कथेत येथील समाजातील तळागाळाच्या माणसाचे चित्रण केले नाही. हे कथा-वाङ्मयाच्या इतिहासातील कटुसत्य आहे.

श्री. म. माटे यांनी मात्र 'उपेक्षितांचे अंतरंग' चितारण्याचा मौलिक स्वरूपाचा प्रयत्न केला. त्यात दलितांविषयी सहानुभूती व

कळवळा होता. परंतु माटे दलितांच्या प्रश्नांकडे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्यापेक्षा गांधीवादी दृष्टीकोनातून पाहात होते. स्वतःला गांधीवादी म्हणवणाऱ्या काही कथाकारांनी मात्र या विषयाला स्पर्शही केला नाही.

असा हा मराठी कथेचा प्रवाह अनेक अंगांनी, अनेक दिशांनी वळणे, वळसे घेत या सव्वाशे वर्षात बऱ्याच स्थित्यंतरातून जाऊनही फारसा रुंदावु शकला नाही. मध्यमवर्गीय परंपरा, व त्यांच्या निष्ठा जोपासण्यात मराठी कथेचा जन्म व प्रवाह खर्ची पडला. कारण ही कथा लिहिणारे कथाकारही त्याच वर्गातील असल्याने त्यांच्या जाणीवा एका मर्यादेपलिकडे जात नव्हत्या, जाणे शक्य नव्हत्या. मध्यमवर्गाच्या जीवनातील बदलणारे प्रश्न व त्यांची उकल करण्याचा प्रयत्न मराठी कथा करीत होती. कधी मनोविश्लेषणात्मक, कधी कौटुंबिक, सांस्कृतिक व पारंपरिक मूल्यांचा पुरस्कार करणारी. तर कधी मध्यमवर्गीय प्रेम हे कथांचे विषय घेऊन येणारी. भाषेचे सौंदर्य व बुद्धीचे चातुर्य खुलविण्यात किंवा दाखविण्यात या कथांचा हातभार लागला. हे जरी खरे असले तरी जीवनतील तळागाळाकडे ह्या कथा कधी वळताना दिसल्या नाहीत.

झोपडपट्टीतील, महारवाड्यातील किंवा मांगवाड्यातील माणूस कथेचा नायक कधी झाला नाही. ही माणसे किंवा ती ठिकाणे कथांमधून आलीत ती विद्रुपरूपाने व किळसवाणा प्रकार दाखवायला. त्यांचा चांगूलपणा, प्रामाणिकपणा, दिलेरपणा, निर्भिडपणा, शूरपणा किंवा इतरही तत्सम गुण रेखाटण्याचा प्रयत्न कोणत्याही कथाकाराने केला नाही. याच काळात बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्य व तत्वज्ञानापासून प्रेरणा घेऊन काही दलित कथाकार कथा लिहू लागले होते. त्यात अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, बंधुमाधव वगैरे प्रमुख कथाकारांनी काही ताकदवान विद्रोही तर काही निवेदनात्मक कथा लिहिल्या. समाज जीवनाचे चित्रण करणे व दुःख वेशीवर टांगणे हा भाग त्याकाळी त्यांच्या डोळ्यापुढे होता. त्यांच्या त्या काळातील लिखाणात चळवळीसंबंधीचा विचार जरी असला तरी ती साहित्याची चळवळ नव्हती. त्यांचे प्रयत्न मौलिक, भक्कम परंतु तरीही वैयक्तिक व फुटकळ स्वरूपाचे होते. मात्र ही

कोंडी १९६३ नंतर बाबुराव बागूलांच्या मराठी कथेतील आगमनाने फोडली. नंतरच दलित कथा प्रवाहाला सुरूवात झाली. अनेक कथाकार आपल्या लेखण्या परजून सरसावले. पण दलित कथेचा आढावा घेतांना मात्र अण्णाभाऊ साठे, बंधुमाधव व शंकरराव खरात यांना वगळता येणार नाही. त्यांच्यापासूनच तिचा विचार करावा लागेल. कारण त्यांनी दलित जीवनावरील लिहिलेल्या कथा, त्यांचे एकंदर स्वरूप व प्रमाण विचारात घेतले तरच आजच्या दलित कथेचा आवाका वाढतो.

दलित कथाकारांना किंवा लेखकांना मुद्रित प्रसिद्धीसाठी तशी वाणच होती. मासिके, नियतकालिके नव्हती. सुरवातीस डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संपादित व प्रकाशित केलेल्या 'बहिष्कृत भारत', 'जनता' व नंतरच्या 'प्रबुद्ध भारत' या साप्ताहिकांतून काही कथाकार कथा लिहीत होते. त्यात बंधुमाधव, यादवराव गांगुर्डे, निर्गुणा कांबळे, रमेश शिंदे यांचा समावेश जरी असला, तरी त्यातील फक्त बंधूमाधव यांनी सातत्याने कथालेखन केले. खालच्या जातीतील अन्यायावर प्रकाश झोत टाकण्याचा त्यांनी आपल्या निवेदक शैलीने प्रयत्न केला. १९५० ते १९५४-५६ पर्यंत त्यांनी कथालेखन केले, तरी पुढे मात्र त्यात खंड पडला. व आता कोठे बंधुमाधव यांचा 'आम्हीही माणसं आहोत' (१९८१) हा पहिलावहिला कथासंग्रह प्रकाशित झाला.

अण्णाभाऊ साठे :

(खुळंवाडी, बरबाद्याकंजारी, आबी, भानामती, लाडो, फरारी, गजाआड इत्यादि कथासंग्रह)

अण्णाभाऊ साठे यांनी १९४९ पासून कथालेखनास प्रारंभ केला व तेव्हापासूनच त्यांच्या कथा प्रकाशित होऊ लागल्या. सुरवातीला 'मशाल', 'आज्ञा', 'युगांतर' या नियतकालिकांमधून त्यांच्या कथा जरी प्रकाशित झाल्या असल्या तरी पुढे मात्र महाराष्ट्रातील लक्षावधी वाचकांचे आवडते लेखक अण्णाभाऊ झाल्याने इतरही दर्जेदार वाङ्मयीन नियतकालिकातून व विशेषांकातून त्यांच्या कथा प्रकाशित होण्याचा मान अण्णाभाऊंना मिळाला.

अण्णाभाऊ साठे यांना कथाकार, कादंबरीकार, शाहीर, कलावंत आदी भूमिकातून पाहतांना त्यांच्याविषयी जे आजपर्यंत लिहिल्या गेले ते अतिशय अल्प व तोकडे आहे. आणि जे लिहिल्या गेले तेही पूर्व-ग्रहदूषितपणे, त्यांना पुरेसे न समजून किंवा वरवर पाहून. ते लिहिणेही अण्णाभाऊंवर अन्यायकारक आहे असे मला वाटते. वाङ्मयाच्या सर्व क्षेत्रात स्वैरपणे संचार करणारा व स्वतंत्रपणे दर्जेदार लेखन करणारा एवढ्या प्रचंड ताकदीचा लेखकही या देशात जातियवादाच्या काळ्याकुट्ट अंधारात गडप केला जातो याचे उदाहरण म्हणजे अण्णाभाऊ साठे. अण्णाभाऊंना त्यांच्या लिखाणाबाबत व कार्याबाबत न्याय मिळाला नाही. त्यांच्या साहित्याचे खऱ्या अर्थाने मूल्यमापन झाले नाही. हा खालच्या समजल्या गेलेल्या जातीत जन्मलेला कलावंत व थोर साहित्यिक साहित्य व कलेच्या प्रांगणातही उपेक्षित ठेवल्या गेला ही वस्तुस्थिती आहे, जी प्रकर्षाने जाणवते. अण्णाभाऊंची साहित्यसेवा आज मान्य असलेल्या व ज्यांच्यावर भरमसाठ लिहिल्या जाऊन अनेक गौरव ज्यांना प्राप्त करून दिल्या गेले आहेत, अशा तथाकथित उच्चभ्रू साहित्यिकांच्या साहित्यसेवेपेक्षा लाख मोलाची आहे. अण्णाभाऊंनी कथा, कादंबऱ्या शाहिरी व वगनाट्य आदी वाङ्मय प्रकार यशस्वीपणे हाताळले. त्यांच्या काही कलाकृती तर मराठी वाङ्मय दरबारात मानाचे स्थान मिळविणाऱ्या ठराव्या. त्यांच्या या मौलिक व विपूल साहित्याचा विचार करताना त्यांना जातीच्या नावावर त्यात काही 'कन्सेशन' मागून त्यांना मोठे करणे हे जसे आम्हास मंजूर नाही, तसेच ते खालच्या जातीचे म्हणून त्यांच्या कलाकृतींचा विचार न करणे किंवा केलाच तर कसले तरी 'लेबल' लावून व त्यातही जातियवादी दृष्टी ठेवणे हेही आम्हांस मंजूर होणार नाही. अण्णाभाऊंच्या कथा, कादंबरी वाङ्मयाची निकोपदृष्टीने टिका व्हावयास पाहिजे. म्हणून या लेखात त्यांच्या कथा वांङ्मयासंबंधी विचार करण्याचा प्रयत्न केला आहे.

कथा लिहिण्याची स्फूर्ती व मार्क्सवादी अण्णाभाऊ

अण्णाभाऊंनी मॅक्झीम गोर्कीच्या कथा वाचल्या व त्यांना लिहि-

ण्याची स्फूर्ती मिळाली व साठे मार्क्सवादी लेखक होते ते आपल्या साहित्यातून साम्यवाद सांगतात असे मार्क्सवादी मंडळी म्हणतात. आणि असे म्हणताना हेही म्हणतात की अण्णाभाऊंनी मॅक्झीम गोर्की वाचला, ते मार्क्सवादी होते व कथांमधून साम्यवाद सांगत होते म्हणून ते मोठे होते. आणि अण्णाभाऊ कम्युनिस्ट पार्टीचे कार्यकर्ते होते म्हणून त्यांचे लेखन मार्क्सवादी आहे, ते मार्क्सवादी आहे म्हणून ते प्रचारवादी आहे आणि म्हणून ते टाकावू आहे अशी भूमिका इतर टीकाकार घेतात. परंतु ह्या दोन्हीही भूमिका अण्णाभाऊच्या साहित्याचा निकोप विचार करणाऱ्या नाहीत असे मला वाटते. अण्णाभाऊंनी कथा लिहिण्यासाठी मॅक्झीम गोर्की यांच्याकडून स्फूर्ती घेतली असेल किंवा त्यांच्या शैलीवर गोर्कीचा प्रतिमा, रूपक, उपमा यांच्या संदर्भात प्रभाव असेलही. परंतु एवढ्याने अण्णाभाऊंच्या कथांना कुठेच उणेपणा येत नाही. गिरणीत काम करताना कामगार चळवळीशी व तिथल्या संघटनेशी त्यांचा संबंध आला यात वाद नाही. त्यांनी मार्क्सवादी साहित्य वाचले. संघटनेत व पक्षात काम केले, पक्षाच्या प्रसारासाठी ते कलापथक घेऊन गावोगाव भटकले हेही निर्विवाद सत्य आहे. पण म्हणून ते फक्त वर्ग लढ्यापुरताच विचार करीत होते असे म्हणणे बरोबर होणार नाही. अण्णाभाऊंनी भुके कंगाल लोकांच्या कथा लिहिल्या म्हणून अण्णाभाऊ नुसता साम्यवादाचा विचार करीत होते असे म्हणणे चूक आहे. त्यांच्या भोवतीच्या वातावरणामुळे (पक्ष व संघटना) तसे म्हणणे शक्य होते. परंतु कथा-कादंबरी लिहितांना अण्णाभाऊ भारतीय दलित माणूस विसरलेले दिसत नाही. रशियातील वर्ग भेद व भारतीय वर्ग भेद यातील महदंतर अण्णांच्या हृदयातील आतल्या कप्प्यात जाणवत होते. आणि म्हणूनच पुढे अण्णाभाऊंनी पक्ष व संघटना सोडली हेही आपल्या लक्षात येते. अण्णाभाऊंनी आपल्या सर्व कथा-कादंबऱ्याचे नायक भारतीय समाज व्यवस्थेतील खालची माणसेच निवडली. त्यांना त्यांनी कथामधून विद्रूप केले नाही. (कारण तोपर्यंत ती माणसे मराठी कथाकारांच्या टवाळीचा किंवा फारच झाले तर सहानुभूतीचा विषय होती) त्यांनी त्या माणसांचा

स्वाभिमान रेखाटला, लढवय्या बाणा रेखाटला. त्यांच्या जीवनात आशावाद निर्माण करून, जगण्याची जिद्द पेरली. एवढे असूनही अण्णाभाऊंना मार्क्सवादी कसे म्हणणार ?

अण्णाभाऊंना मार्क्सवादी समजून त्यांच्या कथांचा विचारच न करणारे जातियवादी टीकाकार मराठीत कमी नाहीत. अण्णाभाऊंचे साहित्य हे प्रचारवादी आहे असे म्हणणे उचित होणार नाही. कारण असेच जर म्हटले तर जगातील उत्कृष्ट कलाकृतीही बाद कराव्या लागतील आणि मग मराठीतील साऱ्यांना पुन्हा तपासावे लागेल. जातीयवादाचा भोगवटा अण्णाभाऊंच्या वाटेला आलेला आहे. हेही स्पष्ट जाणवते. इंदूमती शेवडे यांच्या 'मराठी कथा उगम आणि विकास' हया ग्रंथात सुरुवातीपासूनच्या साऱ्याच अटरसटर मराठी कथाकारांच्या कथा लेखनाचा उहापोह केलेला आहे. पण अण्णाभाऊंबद्दल एक अक्षरही यात लिहिलेले नाही. हे कशाचे द्योतक समजावे ? आणि म्हणून त्या साऱ्या बाबींचा विचार केला तर असे दिसून येते की मराठीचा टीकाकार एखाद्या कलावंताचा व त्याच्या कलाकृतीचा विचार करताना तो अगोदर कोणत्या जातीचा आहे, तो कोणत्या पक्षात काम करतो इत्यादी गोष्टींवरच लक्ष केंद्रित करतात व मग त्याच्या कलाकृतीचे त्या जातीय व पक्षीय चष्म्यातून मूल्यमापन करतात,त्या कलावंताची उंची ठरवितात. अण्णाभाऊंच्या बाबतीत तर असे नक्कीच झाले आहे.

अण्णाभाऊंनी कथा-कादंबऱ्या विपूल लिहिल्या. कथासंग्रह व कादंबऱ्या आज त्यांच्या नावावर प्रकाशित आहेत. इतरही बरेच लेखन त्यांनी केले आहे. त्यांच्यातील कसदार किती ह्याचा विचारही झाला पाहिजे. परंतु एक गोष्ट मात्र खरी की अण्णाभाऊंचे सारेच ललित लेखन तत्कालीन पारंपरिकता मोडणारे आहे. ते कल्पनेच्या वावटळीत भराऱ्या मारणारे नाही तर सामाजिक व आर्थिक विषमतेच्या डोंगरात शब्दांचे सुरुंग उडवून तयार केलेल्या समतेच्या खोल आणि मजबूत पायावर उभे आहेत.

अण्णाभाऊंनी ज्या काळात लिहायला सुरूवात केली तो काळ व त्यावेळच्या लेखकांचे लेखन पाहिले तर त्यांच्या लिखाणात साचलेपणा आलेला होता. तेव्हा मध्यमवर्गीय माणसाचे चित्रण व भावदर्शन कथेतून होत होते. प्रेम हा कथेचा सर्वमान्य विषय होता. मात्र अण्णाभाऊंनी अशा माणसाची कथा लिहिली की जो त्यापूर्वी मराठी कथा वाङमयात फिरकला नव्हता. मांग, महार, रामोशी, वंडावाला, चोर, दरोडेखोर आदी समाजात गुन्हेगार व खालच्या समजल्या जाणाऱ्या जातीतील लोक हे अण्णाभाऊंच्या कथांचे नायक झाले. जन्मापासूनच अण्णाभाऊ ज्यांच्यात वावरले होते ते सारे त्यांनी प्रामाणिकपणे चितारले. ती माणसे आली, त्यांचे स्वभाव आले, त्यांच्या जीवनाच्या समस्या आल्या. ज्या माळरानात आणि दऱ्याखोऱ्यात अण्णांचे बालपण गेले होते ते प्रदेश, त्या कडेकपारी अण्णाभाऊंच्या कथा, कादंबऱ्यातून बोलक्या झाल्या. अण्णाभाऊंची ही माणसं अत्यंत प्रामाणिक, जीवनात आशावादी म्हणून लढाऊ वृत्तीची आहेत. गुन्हेगार असूनही ती नीतीमान आहेत. या हिंदूसमाजात ज्यांना कस्पटासमान लेखल्या गेलं, ज्यांना गुन्हेगार केलं ती माणस अण्णांनी आपल्या कथा, कादंबऱ्यामधून महान केली. त्यांना नीतीच्या अत्त्युच्य शिखरावर नेऊन बसविले. 'दुर्दैवी' कथेतील सयाजी काय किंवा 'माहेराची वाट' या कथेमधील गोंदा काय; सूडानं पेटलेला सयाजी, दुश्मनाची मुलगी रखमा रात्रभर घरी असूनही तिच्याबद्दल कुभावना मनात न आणता तिला सकाळी गावाला सुरक्षित पोहचवितो. तर असहाय तरुणीची अब्रू लुटणाऱ्या सहकारी दरोडेखोर गणाला गोळी घालून ती माहेराला पोहचेपर्यंत तशीच बंदूक हातात घेऊन तिच्या संरक्षणाची हमी देऊन दरोडेखोर गोंदा तेथेच उभा राहतो. हे व अशाच प्रकारचे प्रसंग अण्णाभाऊंच्या कथांचे प्राण आहेत. आणि अण्णाभाऊंच्या गोष्टीतील हीच बाब मी महत्त्वाची समजतो. पोटासाठी दरोडे टाकणाऱ्या माणसाने किंवा जातीयतेमुळे होळी झालेल्या कुटुंबानेही नीतिमत्ता गमावू नये हा अण्णाभाऊंच्या अनेक कथांचा गाभा आहे.

आंबेडकरवादाकडे

आणि नीती हा बुद्ध विचाराचा पर्यायाने आंबेडकरवादाचा गाभा आहे. बुद्ध तत्त्वज्ञानामध्ये नीतीला प्रथम स्थान दिल्या गेले आहे. माणसा-माणसात स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय ही जीवनमूल्ये पेरायची असतील तर नीतीला सर्वोच्च स्थान दिले पाहिजे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांगतात. हा विचार बाबासाहेब आपल्या लिखाणातून, भाषणातून व कार्यातून सतत मांडत होते. अनिश्वरवाद, अनात्मवाद, पूर्वजन्म,पूनर्जन्म कर्मकांड,अंधश्रद्धा,चमत्कार आदीवर त्यांनी कोरडे ओढले. भारतीय दलितांच्या या उद्धार कार्याकडे सर्व जगाचे लक्ष होते मग त्यातून अण्णाभाऊ (आणि तेही दलित असताना) कसे सुटतील ? बाबासाहेबांचा हाच नीतीमतेचा व अनिश्वरवाद, अनात्मवाद, पूर्वजन्म, पुनर्जन्म, अंधःश्रद्धा, चमत्कार आदीचा विचार अण्णाभाऊंनी आपल्या कथांमधून उचललेला दिसतो.

म्हणून पुढे पुढे १९५६ नंतर ते डॉ. बाबासाहेब आबेडकरांकडे झुकलेले दिसतात. आणि हीच गोष्ट अण्णाभाऊंचा साहित्यिक किंवा कलावंत म्हणून विचार करताना महत्त्वाची ठरते. कारण प्रत्येक कला-वंताच्या दोन अवस्था असतात १) अपरिपक्व (Immature) २) परिपक्व (Mature) त्याचा सुरवातीचा काही काळ अपरिपक्वतेचा असतो. तो कलानिर्मिती करीत असतो पण त्याची वैचारिक बैठक निश्चित झालेली नसते. अण्णाभाऊंच्या जीवनातील असा काळही आम्हास शोधता येतो. म्हणून ते मार्क्सवादी असलेच तर त्यांच्या लेखनाच्या सुरवातीच्या काळात. म्हणजेच अपरिपक्वतेच्या काळात. नंतर मात्र ते पूर्णपणे आंबेडकरवादी होते असे दिसते.

'जग बदल घालुनी घाव । सांगुन गेले मला भीमराव ।।' हे गीत काय किंवा 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या झुंजार लेखणीस' ही 'फकिरा' ची अर्पण पत्रिका काय, ही त्याची द्योतक आहेत. फकिराच्या अर्पण पत्रिकेने हे तर स्पष्ट होते की अण्णाभाऊ बाबासाहेबांच्या लेखणीवर जीव ओवाळून टाकत होते. त्याशिवाय का त्यांनी 'फकिरा' सारखी

सर्वोत्कृष्ट कलाकृती तिला अर्पण केली ! या संदर्भात टीका करताना काही तथाकथित टीकाकार म्हणतात अण्णाभाऊ मार्क्सवादी होते म्हणून ते बाबासाहेबांना भेटले नव्हते. परंतु ही टीका भोंगळ स्वरूपाची आहे. एकमेकांना भेटलेलीच माणसे एक दुसऱ्याचा विचार घेतात असे कसे म्हणता येईल ?

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांमध्ये स्वाभिमान पेरला व त्यांना ताठ मानेने जगण्याची जिद्द शिकविली. त्यांच्या मनात अन्यायाची चीड निर्माण केली. तोच स्वाभिमान, तीच जिद्द, व अन्यायाची चिड अण्णाभाऊंनी आपल्या कथानायकांना दिली. म्हणून आंबेडकरी असलेला हा सर्वाचा आवडता समर्थ कथा लेखक दलित साहित्यातील अग्रणी कथा लेखक होय.

शाळेची पायरी न चढलेले अण्णाभाऊ वारणेच्या खोऱ्यातील वाटेगावच्या वाटेवरून मुंबईला चालत आले. जीवनाच्या विद्यापीठात खडतर अनुभवाच्या अनेक सन्माननीय पदव्या त्यांनी मिळविल्या. म्हणूनच त्यांच्या कथा त्या समृद्ध अनुभवांशी अतिशय प्रामाणिक राहिल्या. समाजातील तळगाळाचा माणूस हा अण्णाभाऊ साठचांच्या कथांचा नायक झाला. त्यांची माणसे, जी त्यांच्या अवती भवती वावरत होती, जगत होती, कष्ट करीत होती, भांडत होती, प्रेम करीत होती ती माणसं त्यांनी आपल्या कथांमध्ये जीवंत केली. मराठी कथेला ही माणसं तोपर्यंत परकी होती. तीच माणसं अण्णाभाऊंनी त्यांच्या कथांमधून प्रभावीपणे उभी केली. मांग, गारूडी, फासेपारधी, वडार, रामोशी, कैकाडी इत्यादि गुन्हेगार समजल्या जाणाऱ्या जमातीतील ही माणसे दिलेर, शूर, प्रामाणिक, निर्भय, कष्टाळू नीतीमान असतात हे अण्णाभाऊंनी समर्थपणे रेखाटले. त्यांचा माणसांच्या सच्चेपणावर विश्वास होता म्हणून ते म्हणत,

'माझी जीवनावर फार निष्ठा असून मला माणसं फार आवडतात. त्यांची श्रमशक्ती महान आहे. ती जगतात, जगाला जगवतात. त्यांच्या बळावरच हे जग चालतं. त्यांची झुंज, नि त्याचं यश यावर माझा

विश्वास आहे. त्यांना विद्रूप करणं मात्र मला आवडत नाही. नव्हे मला भिती वाटते. ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरली नसून दलितांनी आपल्या हातावर पेलली आहे, असं मी म्हणतो. अशा या माणसांना वैफल्याच्या नावाखाली विद्रुप करू नये असं माझं मत आहे..... ....मी जे जीवन जगतो, पहातो, अनुभवतो तेच मी लिहितो." असा जीवनावर नितांत प्रेम करणारा हा महान कथाकार त्याच्या माणसांना विद्रुप कसा करणार ? अण्णाभाऊंच्या कथेतील माणसं ही त्यांच्या अवती भोवतीची माणसं असतात, त्याचं जीवन हे अण्णांनी जवळून पाहिलं अनुभवलेलं असतं. म्हणूनच सत्यासाठी, नीतीसाठी, अन्यायाशी झुंज देणारे नायक अण्णाभाऊंनी आपल्या कथांमधून ताठ उभे केले. सुलतान कथेतील पोटासाठी तुरुंगात जाणारा बेकार सुलतान, तेथे कमी भाकरी देण्यात येतात व त्यामुळे पोट भरल्या जात नाही म्हणून लढण्याची भाषा करतो. त्याचा परिणाम म्हणून त्याला इतरांपेक्षा दोन भाकरी जास्त मिळतात. संघर्षाशिवाय काहीही मिळत नाही हे तत्व अण्णाभाऊंनी आपल्या कथांमधून मांडले. हेंच तत्व सांगणारी दुसरी कथा 'वंडवाला'. तात्या मांग हा कथानायक. कोरडी भाकर खात खात आपण केव्हा ना केव्हा मरणारच आहोत, मग जमिन मिळविण्यासाठी मेलो तर काय वावगे ? या विचाराने तो पेटतो. आणि जमिनदारांवर हल्ला करून तुरुंगात जातो. तुरुंगातून बाहेर पडल्यावर पुन्हा जमिनदाराचा वाडा पेटवून देतो व पुन्हा जास्त काळ तुरुंगात जातो. 'हक्कासाठी संघर्ष करा' ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची शिकवण अण्णाभाऊ साठ्यांनी आपल्या कथांमधून समर्थपणे सांगितली. जातीवरील गुन्हेगारीचा कलंक धुवून काढणे व गुन्हेगार जात म्हणून चावडीवर जावून दिवसातून तीन वेळा हजेरी लावणे याच्या विरुद्ध लढणारा सावळा मांग, 'स्वराज्य माहच्यात काडीचाही बदल करू शकले नाही.' असे खडसावून सांगणारा व म्हणून पोटासाठी कोंबड्या चोरणारा रामु, पोटासाठी गुन्हेगारी पत्करणारा 'बरबाद्या कंजारी' ही अन्यायाविरुद्ध आग ओकणारी भरदार, दमदार माणसे अण्णाभाऊंनी प्रथमच मराठी कथेत आणली. जीवनातील

आर्थिक व सामाजिक विषमतेविरूद्ध लढणारी आशावादी बेडर माणसे अण्णाभाऊंनी आपल्या कथांमध्ये रेखाटली. पोटासाठी दरोडे घालणारे मांग, रामोशी नीतीमत्तेसाठी मात्र स्वःतच्या सहकाऱ्यांनाही गोळी घालतात. जीवनात नीतीला एवढे महत्व देणारा कथाकार मराठी वाङ्मयात विरळाच. अण्णाभाऊंनी वास्तव जगात कष्टाचे सागर उपसून मराठी वाङ्मयात दौलतीचे डोंगर रचले आहेत. म्हणूनच मराठी कथायुगाचे पारणे फेडणारा हा दलित कथाकार अण्णाभाऊ साठे दलित कथेचाच नव्हे तर विश्वकथेचा मुकुटमणी ठरतो. दलितांच्या जीवनातील दैन्य, दास्य, लाचारी व विद्रोह यांना अण्णाभाऊंनी विहंगम चितारले व आकारले असून त्यातून निर्माण झालेली कथाशिल्पे ही दलित वाङ्मय लेण्यातील अजोड कलाकृती होत. उत्तुंग व जीवनातील दाहक अनुभवांचा साठा त्यामुळे अण्णाभाऊंच्या कथांना एक वेगळ्याच सुंदरतेची अपूर्व अशी मौलिक सुवर्ण झालर लावलेली आढळते. शेकडो समर्थ दलित कथा लिहणाऱ्या या पहिल्या कथाकाराचे स्मरण केल्याशिवाय दलित कथेला पुढे जाता येणार नाही.

शंकरराव खरात :

(सांगावा, बारा बलुतेदार, दौंडी, टिटवीचा फेरा, तडीपार, सुटका, आडगावचं पाणी, गावशीव, मुलाखत इ. कथासंग्रह)

मराठी कथेने जे जीवन पाहिले नव्हते ते जीवन अण्णाभाऊ साठे यांनी समर्थपणे आपल्या कथांमधून मांडले. गुन्हेगार जाती जमातीतील अन्यायाविरुद्ध झगडणारी माणसे त्यांनी जशी उभी केली, तितक्याच प्रभावीपणे शंकरराव खरातांनी गावातील बारा बलुतेदार व गावाबाहेरील भटक्या जमाती यांच्या जीवनाचे यथार्थ चित्रण रेखाटले. किंबहुना गावातील जातियतेत आर्थिक विषमता आणि सामाजिक, आर्थिक शोषण किती गुंतागुंतीचे व अन्यायमूलक असते याचे स्पष्ट व वास्तव शब्दांकन आपल्या कथामधून शंकरराव खरातांनी १९५८-५९ सुमारास सुरू केले.

अण्णाभाऊ साठचांच्या कथांनी दलित कथेचा उगम होतो तर शंकरराव खरातांच्या कथांनी त्या उगमाचे पात्र रूंदावते. मांग, महार, चांभार, कुंभार, रामोशी, कोळी, गुरव, धोबी (परीट), न्हावी, सुतार, लोहार, सोनार, या बारा बलुतेदारांची आर्थिक व सामाजिक कोंडी कशी होते याचे मार्मिक व हृदयाला पीळ पाडणारे प्रसंग आपल्या कथांमधून खरातांनी उभे केलेत. शेकडो वर्षे चालत आलेली बलुतेदारी आर्थिक विषमतेबरोबरच सामाजिक विषमतेमधील जातियता कशी टिकवून ठेवते हे सांगताना खरातांची कथा नुसतीच वैशिष्टचपूर्ण राहात नाही तर ती अनेक अंगांनी गुणसंपन्न होते.

शंकरराव खरात हे काही मराठीतील इतर कथाकारांप्रमाणे 'जन्मजात' कथाकार नव्हते. लहानपणापासून दास्य व दारिद्र्याचे चटके सहन करीत शिकल्यासवरल्यानंतर, समाजातील भयानक विषमता डोळसपणे पाहिल्यावर व डॉ. बाबासाहेब आंबेडकर नावाच्या सूर्याच्या प्रकाशात न्हाऊन निघाल्यानंतरच त्यांच्यातील कथाबिजाला अंकूर फुटले व त्यांच्यातील कथाकार तळागाळीतील समग्र आणि समर्थ कथा प्रसवू लागला.

पददलितांच्या जीवनातील सुक्ष्म बारकावे व मन हेलावून सोडणारे प्रसंग खरातांनी आपल्या कथांमध्ये चित्रित केले आहेत. त्यांच्या नायक व नायिका अण्णाभाऊंच्या किंवा बाबुराव बागूलांच्या नायक नायिकांप्रमाणे बंडखोर, विद्रोही नाहीत. ते विद्रोहीची, नकाराची भाषा बोलतही नाहीत. परंतु खरात त्यांच्या जीवनातील नाटच अशा पद्धतीने व खुबीने रेखाटतात की ते वाचल्यावर वाचकाच्या मनातच बंडाचे वादळ उभे राहते. त्यांनी चित्रित केलेला रामा महार काय किंवा बंडा मांग काय, आपले जगण्याचे अनावर दुःख शांतपणे, संयमाने मांडतात. गावातील लाकडं फोडणं, तालुक्याला टपाल घेऊन जाणं, गावात मामलेदार आला तेव्हा चावडीवर रात्रभर जागत राहणं आणि या सततच्या कामानं जेवायला व घरात मुलगा तापानं फणफणत असता त्याला पाहायलाही रामा महाराला क्षणाचीही उसंत मिळत नाही. शेवटी त्यामुळेच मुलगा

दगावतो. रामा महार विषण्ण मनानं गुडघ्यात मान घालून खोपटात बसलेला असतांना पुन्हा पाटील त्याला बोलावयास येतो. गावात डॉक्टर येणार आहे म्हणून दवंडी द्यावयास सांगतो. त्यावेळी रामा महार चडफडून बोलतो व चिड व्यक्त करतो.

'तुमच्या या मरमर कामानं पोटचं पोरगं आज मातीत घातलं. आमाला काय जीव न्हाई व्हय ? का यवढा सरकारी गाडा माझ्याच्यानं आडलाय ! मानसाला दुःख हाय का न्हाय ? मांग सारखं काऽम, काऽम' पुढे तो म्हणतो,

'जुलूम गेला कामानं, पण पोटभर आन मिळेना. आंगाला धडूतं लागेना अन् आज या कामापाय पोटचा गोळा मातीत घातला.' आयुष्यभर मर, मर काम करूनही पोटाला अन्न नाही की अंगावर कपडा नाही.' ही आर्थिक विषमता ग्रामीण जीवनात बलुतेदारीनं घट्ट पकडून ठेवली होती. ती बलुतेदारी जीवनाला उध्वस्त करणारी आहे. हे सांगताना बंडा मांग आपल्या आईला म्हणतो.

'आये ! ह्यो चऱ्हाटचाचा धंदा घाम पडेस्तोवर करायचा. चार-आठ आनं हाताला लागायचं. काय या धंद्यात चव ?' माणसाला देशोधडीला लावणारी, जाती, जातीच्या नरकात रुतवून ठेवणारी ही बलुतेदारी मराठी कथाकारांना दिसली नाही. शंकरराव खरातांनी मात्र ती सुक्ष्मपणे टिपली. रूढी, परंपरेने घालून दिलेली ही गुलामगिरी भिषण होती. चांभाराच्या मुलाने वडीलोपार्जित जोडे, चपला बनवाव्या, मांगाने डफडे वाजवावे, दोर वळावे, सुताराने गावाचे लाकुडकाम, लोहाराने लोखंडाचं काम आयुष्यभर करायचं व त्यासाठी बलुतं मागून जीवनाचा गाढा फरफटत ओढत न्यायचा, असं हे जग शंकररावांनी वाचकांना प्रथमच दाखविलं.

शंकररावांनी भटक्या जमातीचं विस्कळीत जीवनही तितक्याच प्रभावीपणे आपल्या कथांमधून आणलं. तद्वतच येथील खेड्यापाड्यातील राजकारणामुळे झालेला बदल व तेथील सामाजिक व्यवस्थेवरील, चांगले,

वाईट परिणाम याचेही उठावदार चित्र खरातांनी आपल्या कथांमधून रेखाटले.

शंकरराव खरातांची भाषाशैली साधी, सोपी आहे. त्यांची कथा वाचतांना एखादी चित्रमालिका डोळ्यापुढून संथपणे सरकत जावी असे वाटते. प्रसंगातील बारकावे, कंगोरे ते अतिशय उत्तमपणे चित्रित करतात. त्यांची निरिक्षणाची दृष्टी सुक्ष्म व तीक्ष्ण आहे. परंतु त्यांचे कथानायक त्यांच्या वाट्याला आलेलं दुःख सोसणारे, अन्यायाची चीड मनातल्या मनात ठेवून तडफडणारे असतात. क्वचितच एखादा बंडा तराळ वतनी जमीनीसाठी गावातल्या ईनामदाराला काठीनं मरेस्तोवर मारतो. अर्थात हा 'विद्रोही' बदल शंकरराव खरातांच्या कथांमध्ये अलिकडील आहे. शंकरराव खरात हे विपुल लेखन करणारे लेखक. त्यांनी कथा, कादंबरी, समिक्षा, आत्मकथा, तत्वज्ञान इत्यादि ८ लेखन प्रकार समर्थपणे हाताळले आहेत. परंतु खरात कथाकार म्हणूनच मराठी वाचकालाच नव्हे तर इतरही भाषिकांना परिचित आहेत. म्हणूनच त्यांच्या कथा बऱ्याच वर्षांपासून क्रमिक अभ्यासक्रमात आहेत. त्यांच्या लेखनावर पी. एच. डी. सारख्या अत्युच्य पदवीसाठी संशोधनही चालू आहे.

बाबुराव बागूल :

(जेव्हा मी जात चोरली होती, मरण स्वस्त होत आहे, सूड)

बाबुराव बागूल हे दलित कथेचे एव्हरेस्ट शिखर पादाक्रांत करणारे पहिले गिर्यारोहक आहेत. मराठी कथेला त्यांच्या कथांची उंची गाठता येणार नाही. कारण मराठी कथेची कण्हत, कुथत चालणारी वाटचाल जेथे संपते, तेथून बागूलांच्या वायुवेगाने चालणाऱ्या कथेची सुरवात होते व ती इतक्या वेगाने तळागाळातील माणसाच्या शेवटच्या प्रश्नापर्यंत, त्यांच्या जीवनातील जीवघेण्या प्रसंगापर्यंत पोहचते की जसे एखादे स्फुटनिक डोळ्याचे पाते लवते न लवते तोच त्याने प्रचंड वेगाने अंतरिक्षात प्रवेश करावा. बागूलांच्या कथेचे सामर्थ्य ते आहे. बागुलांची ही दलित कथा, विश्वकथा आहे.

बाबुराव बागूलांच्या 'जेव्हा मी जात चोरली होती' या पहिल्याच कथासंग्रहाने वाचकांचे डोळे दिपून गेले, मेंदू सुन्न केले. कारण बाबुराव बागूलांनी ज्या समाजाची बांधिलकी स्विकारली आणि ते ज्या समाजावर लिहू लागले तो समाज, तोपर्यंतच्या कथालेखकांच्या दृष्टीपथात न येणारा, न मावणारा, तेथील विश्व त्याला न पेलवणारे व न पाहवणारे होते. ज्वालामुखीचा उद्रेक व्हावा, त्यातून भळभळत खदखदत लाव्हा बाहेर पडून सर्वत्र पसरावा, तेव्हाच प्रचंड भुकंप व्हावा, झाडे, इमारती, पर्वत उन्मळून पडावे; धो, धो वाहणाऱ्या नद्या क्षणार्धात ओस व्हाव्या, त्यामुळे साऱ्या सृष्टीचं चित्र बेसूर व्हावं, बदलावं, भयानक व्हावं, अस्वस्थ करणारं असावं, असं बागूलांची कथा वाचतांना होते किंवा यापेक्षाही काहीतरी काहीतरी भयंकर होते. कारण बाबुराव बागूलांच्या लेखणीत विलक्षण सामर्थ्य आहे. त्यांच्या कथेतील जग हे मराठी लेखक, वाचकांना परिचयाचं नाही. जातियतेच्या खोल गर्तेत हजारो वर्षे खितपत पडलेला समाज व त्याचे त्यामुळे त्याचे झालेले अनंत जीवघेणे हाल आणि अपेष्टा बागूलांनी अनुभवल्या आहेत. दारिद्र्याच्या कडक उन्हाळ्यात ते होरपळून निघाले आहेत. जातियतेच्या लाल लाल तव्यावर आपल्या समाजाबरोबरच त्याचे शरीर व मन पोळले आहे, भाजले आहे. त्यांनी आपल्या समाजाची जीवघेणी अगतिकता, लाचारी, दारिद्र्य, दास्य, त्यांच्यावर होणारे अत्याचार, बलात्कार, जाळपोळ, हाणामारी आणि त्यांचे राग, लोभ, त्वेष, अन्यायाची चीड, विद्रोह इत्यादींची साठवण आपल्या हृदयाच्या कप्प्यात करून ठेवली आहे. म्हणूनच बागूलांच्या कथा रौद्र, भीषण वाटतात. त्यांच्या कथेतील जग वाचकांच्या दृष्टीत न मावणारे आहे. त्यांचा नायक हा विद्रोही, बंड करणारा, अन्याय, अत्याचाराविरुद्ध लढण्यासाठी सतत पुढे असणारा योद्धा वाटतो. येथील परंपरेने, रूढीने, धर्म व देवाने ज्यांच्या जीवनाचे तुरुंग केले ते तुरुंग फोडून पुढील विजयासाठी सुरूंग पेरीत हा नायक क्रांतीची मशाल घेऊन निघालेला आहे. सम्यक क्रांतीचे स्पष्ट व निर्मळ चित्र त्याच्या डोळ्यापुढे आहे. तो कोणत्याही परिस्थितीत 'मोडेन पण वाकणार नाही' असा नायक आहे. त्याला जीवनाचा नवा आशय व

जगण्याचा नवा अर्थ मिळाला आहे. त्याला ताठ मानेने जगण्यासाठी उभे करण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवाच्या कर्तृत्वाचा प्रताप आहे. हा नायक कथेतून उभा करताना बाबुराव बागूलांच्या विचारांची स्पष्टता दिसून येते. बागूल आपल्या कथांमधून दलितांच्या बाजूने भक्कमपणे व खंबीरपणे उभे राहतात. हे स्पष्ट करताना ते त्यांच्या 'जेव्हा मी जात चोरली होती' या कथासंग्रहातील 'स्वगत' मध्ये लिहितात,

'मी जन्माने दलित होतो. आर्थिक दृष्ट्याही दलितच आहे. पण विचाराने, जीवनाने आणि ध्येयवादानेही मी दलित जनतेच्या बाजूचा होतो. जर डॉ. बाबासाहेबांसारखे, भगवान बुद्धासारखे महापुरुष सर्व मोह धुडकावून दलित जनतेची बाजू घेतात, अनेक क्रान्तीकारक दलितांचे जीवन परिवर्तन करण्यासाठी आत्मत्याग करायला निघतात, तर मी तशी बाजू का घेऊ नये ? ज्याने दुःख पाहिले आहे, अनुभवले आहे त्याने दलितांची बाजू का घेऊ नये ?' ही विचारांची सुस्पष्टताच बाबुराव बागूलांच्या कथांचा केन्द्रबिंदू आहे. येथील दलितांच्या उध्वस्त जीवनातून स्वाभिमानाने जगणारा, अन्यायाविरुद्ध वाघासारखा चवताळणारा माणूस डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केला. हाच स्वाभीमानी माणूस बाबुराव बागूलांच्या कथांचा नायक झाला. तो येथील सामाजिक व आर्थिक शोषणाचा कट्टर शत्रु तर सामाजिक समतेचा आणि न्यायाचा मित्र झाला.

रूढी, परंपरा, देव, धर्म तो नाकारू लागला. माणूसकीचे हक्क हिरावून घेणाऱ्यांच्या विरोधात बंड करून ताकदीनिशी उभा राहिला. बागूलांचे हे कथानायक सर्व तळागाळातील समाजाचे नायक झाले. बागूलांच्या कथेतील पात्रे भन्नाट असतात. स्वतःचा काम, राग, लोभ, द्वेष, मत्सर इत्यादि मानवी प्रवृत्तींसह ती बागूलांच्या कथेत येतात. ही झपाटलेली माणसे त्यांची वस्ती, त्या वस्तीतील झोपड्या, झोपड्यातून डोकावणारे दारिद्र्य, तेथील चिखल, उंदीर, घुशी, पाली, सरडे, मुंग्या, साप यांचे उद्वेग, चीड, घृणा, आणणारे चित्र अतिसुक्ष्म पद्धतीने त्यांच्या कथांमधून साकार झालेले असते. उन्हात जळलेल्या, पावसात भिजलेल्या या

झोपडपट्टयातील माणसांचा बेछूटपणा, रानटीपणा, क्रुरपणा, प्रेमळपणा, शूरपणा, दिलेरपणा, पिसाटपणा, त्यांचे वात्सल्य, ममत्व, उदारता इत्यादि मानवी स्वभावाचे बारकावे बाबुराव बागूल आपल्या कथांमधून रेखीवपणे टिपतात. बागूलांचे अनुभवविश्व अफाट व वेगळे आहे. त्यांची सामाजिक जाणीव परिपक्व विचारांनी परिपूर्ण असल्याने ते आपल्या कथांमधून सामाजिक विषमतेची तात्विक चिरफाड करतात. म्हणूनच त्यांच्या कथांचे नायक किंवा इतर पात्रे मधून मधून जीवनावर, येथील परिस्थितीवर, रूढी, परंपरांवर भाष्ये करतात. परंतु या भाष्यांना नुसते पुस्तकी तत्वज्ञानाचे स्वरूप राहत नाही तर ही जीवनभाष्ये बागुलांच्या कथांमध्ये एकजीव होतात. नव्हे तीच त्यांच्या कथांना उंची देऊन, लेखकाची समर्थतता सिद्ध करतात. शिकलेला सवरलेला जय नावाचा भंगी तरुण जीवनाचे सुखस्वप्न पाहतो. परंतु त्याने वडिलोपर्जित व जातीने दिलेले गुधाण साफ करण्याची नोकरी करून दारिद्र्याशी झगडण्यात कुटुंबास साहाय्य करावे असे त्याच्या बापाला वाटते. म्हणून तो पोराला तसे सुचवितो. पण बापाची ती सूचना जय धुडकावून लावतो, व विचारतो, '..... भंग्याच्या मुलाने भंग्याची नोकरी केली पाहिजे असे कोणी सांगितले आहे ?' त्याचा बाप उत्तरतो, 'आपल्या दुःख, दैन्याने, धर्माने अन् देशाने !

जय त्यावर म्हणतो, कोणता धर्म ?— ज्याने माणसाला मोडून टाकले, पशु लेखले त्या धर्माने ? माणसांपेक्षा दगडाला महत्त्व देतो त्या देशाने ? त्यांचे ऐकायला मी तयार नाही. दैन्य आणि दुःख या दोघांनीच दिले असल्यामुळे त्यांनाच धक्के देऊन दूर करायला सांगितले पाहिजे. पण ते दूर करणार नाहीत. मी करतो मला परिक्षा पास होऊ द्या—' भंगीकामाचा तिरस्कार करून त्याने ते आपल्यावर लादले त्याबद्दल चीड व्यक्त करणारा 'विद्रोह' कथेतील वरील भाष्य करणारा जय, किंवा 'जेव्हा मी जात चोरली होती, या कथेतील नोकरी निमित्त परगावी गेले व राहण्यासाठी जागा मिळावी म्हणून जात लपविणारा तरुण जेव्हा आपल्या मनातील वेदना प्रकट करताना म्हणतो, ' ....या दुर्दैवी देशात माणसाने दलित जातीत जन्म घेऊ नये. घेतल्यास असे दुःख, असा अपमान सहन करावा

लागतो की, त्याहून मरण बरे वाटते. विष प्यारे होते. अंत:करणातील अमृत सडून जाते. अन् उरते फक्त तरवारीपेक्षा क्रूर, कठोर चीड...' या व अशाच भाष्यांनी बागूलांची कथा सखोल होत जाते. बाबुराव बागूल कवी हृदयाचे विचारवंत आणि उत्तुंग प्रतिभेचे कलावंत असल्याने त्यांच्या कथांमधून एक विचाराचा धागा काव्यात्म पद्धतीने गुंफलेला दिसतो. परंतु त्याने त्यांच्या कथांना वैगुण्य तर येत नाहीच उलट अनेक अंगांनी तिच्यात सामर्थ्य, ओतल्या जाते.

बागूलांची भाषा आक्रमक, संपूर्ण विद्रोह व्यक्त करण्यास लागणाऱ्या ताकतीची भाषा आहे. बंड व नकार यांना पेलणारी व बळ देणारी भाषा बागूल आपल्या कथांमधून सहज वापरतात. कवी मनाच्या बाबुरावांची कथाशैली कधी, कधी काव्यात्म होत असेल तर नवल नाही.

'जेव्हा मी जात चोरली होती' या कथासंग्रहाच्या प्रस्तावनेत मराठीच्या ख्यातनाम कवियत्री व लेखिका शिरिष पै म्हणतात, 'त्यांची कथा ही मला एखाद्या चौकटीत न मावणाऱ्या आक्रमक चित्राप्रमाणे वाटते. ढग भरून आलेले असावेत, वारा मोकाट धावत सुटलेला असावा, जंगलातली झाडे खवळून, पिसाळून हादरत असावीत, धुळ पाचोळ्याने वातावरण गदगदून, कोंदावून गेलेले असावे, सृष्टीच्या काळजातले वादळ कोणत्या क्षणी स्फोट होऊन उधळत बाहेर पडेल हेही सांगता न यावे आणि अशा रौद्र रूपाचे चित्र एखाद्या व्याकुळ, बैचन अस्वस्थ आणि संतप्त, चित्रकाराने काळ्या, जांभळ्या, तपकिरी करडया रंगातून बेभानपणे रंगवावे. ते चित्र कसे असेल ? असे चित्र कुठच्याही चौकटीत अडकून रहावयास तयार होईल काय ? बागुलांच्या कथेचे नेमके असेच आहे.' श्रीमती शिरिष पै यांनी बागुलांच्या कथांबद्दल हे लिहिलेले यथार्थ आहे. 'मरण स्वस्त होत आहे' या कथासंग्रहातील 'आई' 'कवितेचा जन्म,' 'सूर्याचे सांगती' ह्या काही कथा तर विश्वकथेच्या पातळीवर श्रेष्ठ ठराव्या. म्हणूनच बाबुराव बागूलांच्या कथेने दलित कथेची पर्यायाने विश्वकथेची उंची, खोली वाढली आहे.

बाबुराव बागुलांनाही अण्णाभाऊ साठयांप्रमाणे 'कम्युनिस्ट' ठरवून 'वाळीत' टाकणारे काही दळभद्री लोक आहेतच. तद्वतच बाबुराव बागूलही

मार्क्सच्या अर्थशास्त्राचे जीवनातील महत्त्व प्रतिपादन करतात, याचा अर्थ हा नव्हे की ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर व बुद्धाच्या नितीवादाचे पर्यायाने मानवतावादाचे तत्वज्ञान नाकारतात. उलटपक्षी बाबासाहेब व बुद्धाचे तत्वज्ञानच जगाला पुढे नेऊ शकते यावर बाबुराव बागूलांचा ठाम विश्वास आहे.

या संदर्भात बागूलांच्या 'आंबेडकर भारत' मधील कथांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. या कथा दलितांचे एकमेव नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनचरित्र व तत्वज्ञानावर बेतलेल्या आहेत. बाबासाहेबांच्या जीवनातील घटनांचे आणि विचारातील बारकावे अत्यंत कलात्मक पद्धतीने कथांच्या रूपात बागूलांनी समर्थपणे रेखाटले आहेत. 'आंबेडकर भारत' मधील कथा हे बागूलांचं खास वैशिष्ट्य समजावं लागेल. 'जेव्हा मी जात चोरली होती' व 'मरण स्वस्त होत आहे' या संग्रहातील कथांसारख्या 'आंबेडकर भारत' मधील कथा बागूलांच्या आंबेडकरी विचारांचे सखोल चिंतनच प्रकट करतात.

बाबुराव बागूलांच्या लिखाणाचा आवाका अण्णाभाऊ साठे किंवा शंकरराव खरातांसारखा प्रचंड नाही. परंतु त्यांच्या लिखाणाची गुणात्मक उंची व मूल्ये ही आजच्या दलित कथेत सर्वोच्च आहेत. बागूलांची मानवी जीवनावर श्रद्धा व प्रेम आहे. माणसाच्या हातातील कर्तृत्वावर त्यांचा भरोसा आहे. म्हणूनच ते माणसाला महान मानतात. माणूस हाच विश्वाच्या जडण घडणीचा एकमेव कर्ता करविता आहे. हा त्यांचा विचार त्यांच्या प्रगल्भ बुद्धीवादाची स्पष्ट ग्वाही देतो.

योगीराज वाघमारे :

(उद्रेक, बेगड)

बाबुराव बागूलांच्या नंतर ज्या तरुण कथाकारांनी वाचकांचे लक्ष वेधून घेतले त्यापैकी योगीराज वाघमारे हे महत्त्वाचे कथाकार आहेत. बाबुराव बागूलांचा विद्रोही नायक, बंडाची आक्रमक भाषा किंवा त्यांच्या कथांची कोणतीच गुणात्मक ऊंची बाबुरावांच्या नंतर कोणत्याच कथा-

काराला गाठता आलेली नाही. हे जरी सत्य असले तरी योगीराज वाघमारे यांच्या कथांना स्वत:चा चेहरा आहे. तसेच स्वत:चे असे खास गुणवैशिष्ट्येही आहेत.

हा चेहरा व गुणवैशिष्ट्ये यांच्या 'उद्रेक' आणि 'बेगड' या दोन्ही कथासंग्रहांमधून स्पष्ट जाणवतात. योगीराज वाघमारे समाजातील गुणावगुणांचे सुक्ष्म निरिक्षण करत असताना दिसतात. म्हणूनच त्यांच्या कथांमधे कालच्या आणि आजच्या सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप चितारल्या गेले आहे. ग्रामीण भागातील अस्पृश्यता व त्यामुळे निर्माण होणारे दलितांवरील जीवघेणे प्रसंग, दलित सुशिक्षित जागृत तरुणांना सोसावी लागणारी क्रुर कुचंबना, दारिद्रय व सुशिक्षित दलित तरुणाची बेकारी, आंबेडकरी चळवळीने आलेली शिक्षणाची लाट व त्यामुळे घडलेली स्वाभिमानी मने या साऱ्या घडामोडीचे चित्रण योगीराज वाघमारे यथार्थपणे रेखाटतात.

वाघमारे यांचे अनुभवविश्व हे दलित जीवनाचे सर्वांगीण दर्शन घडविण्यासाठी समृद्ध आहे. आजच्या दलित जीवनातील कंगोरे त्यांना ठाऊक आहेत. नव्हे त्यांनी ते अनुभवले आहेत. म्हणूनच, दूरवरच्या खेड्यात मुद्दाम बदली करून पाठविलेला, आणि सर्व प्रयत्न करूनही पाहिजे त्या ठिकाणी बदली होऊ न शकणारा, त्यामुळे आजारी असलेल्या मुलीला साधे औषधही देऊ न शकल्याने तिच्या मृत्युनंतर ते आभाळा-ऐवढे दु:ख अगतिकपणे घेऊन जगणारा 'महारमास्तर' कथेत उभा करण्यात वाघमारे यशस्वी झाले आहेत. मॅट्रीक झाल्यावर तीन वर्षे बेकारीत काढावे लागलेल्या, नंतरही गावकीची कामे न करता साखर कारखान्यातील दुर्गंधीत मळी उचलण्याचे काम स्विकारणारा स्वाभिमानी दलित तरुण यांच्या कथेत समर्थपणे ऊभा राहतो त्यात नवल नाही.

कथाकार योगीराज वाघमारे हे अतिशय डोळस, सुजाण जागृत तरुण असल्याने समाज परिस्थितीचे वास्तविक भान त्यांना आहे. समाज प्रबोधनाची नेमकी विधायक दृष्टी त्यांना आंबेडकरी चळवळीने लाभली आहे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महानिर्वाणानंतर पुढाऱ्यांच्या

नादान स्वार्थीपणामुळे समाजात झालेली फाटाफुट व पडलेले गट हा चिंतेचा विषय वाघमारेच्या कथेत येणे अपरिहार्य आहे. तसेच अंधश्रद्धेवर कोरडे व झालेल्या अन्यायाविरुद्ध बंड ह्या आंबेडकरी शिकवणीही त्यांच्या कथेत सजगपणे येतात. त्यामुळे त्या कथा प्रचारकी वगैरे म्हणण्यास पारंपारिक दृष्टी जोपासणारे समिक्षक मागेपुढे पाहणार नाहीत. परंतु समाज प्रबोधनाचे भान, तत्वनिष्ठा व काही जीवनमूल्ये घेऊन जगणाऱ्या कलावंताला अशा टिकेची फारशी चिंता बाळगण्याचे कारण नाही.

योगीराज वाघमारे यांची भाषाशैली साधी, घटनाप्रसंग स्पष्ट चित्रीत करणारी आहे. त्यांच्या कथात आक्रमक आक्रस्ताळेपणा नाही. त्यांची शैली पाल्हाळीक किंवा भाष्ये करणारी नाही. त्यांच्या कथा काहीशा प्रादेशिक स्वरूपाच्या वाटत असल्या तरी सबंधच दलित समाजाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या आहेत. 'बंड', 'उद्रेक', 'वेगड', 'माझा बाप', 'नव्या सूर्याच्या शोधात' इत्यादि कथा वेगळेपण नोंदवून जातात. दलित जीवनातील भेदक प्रसंग, वाघमारे, अलिप्तपणे कलात्मक पद्धतीने आविष्कृत करतात. त्यांच्या कथेचे नाते त्यांच्या जीवनानुभावाशी अत्यंत प्रामाणिकपणे जखडलेले असल्याने त्यांच्या कथा अस्वस्थ करतात.

योगीराज वाघमारे यांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी लिहिलेल्या रूपक कथा होत. वेगळचा पद्धतीने लिहिलेल्या लहान लहान रुपक कथा दलित समाजातील मनोवृत्तीत प्रकाश टाकतात. या कथांमधून वाघमारे यांनी घेतलेली प्रबोधनाची दिशा मौलिक स्वरूपाची आहे.

याशिवाय सुखराम हिरवाळे : 'विश्वगंगेच्या काठी', बंधुमाधव, 'आम्हीही माणसं आहोत,' योगेन्द्र मेश्राम : 'रक्ताळलेली लक्तरे', अर्जून डांगळे : 'बांधावरची माणसं', वामन होवाळ : 'बेनवाड, व 'येळकोट', केशव मेश्राम। 'हकिकत व जटायु, अमिताभ : 'पड' इत्यादीचा दलित कथेचा अभ्यास करताना प्रामुख्याने विचार करावा लागेल. तद्वतच भीमराव शिरवाळे, ताराचंद्र खांडेकर, अरुण कांबळे, वामन निंबाळकर, अविनाश डोळस इत्यादींच्या स्फुट कथाही दलित कथेच्या संदर्भात

अभ्यासाव्या लागतील. दलित कथेच्या क्षितिजावर अजूनही बरेच नवे नवे चेहरे दिसू लागले आहेत.

आधुनिक मराठी कथा व दलित कथा यांच्यात महद्‌तंर आहे. दलित कथेच्या कक्षा जीवन जाणीवांमुळे रूंदावल्या असल्याने व शोषित माणसाच्या उत्कर्षाच्या सीमा तिच्या दृष्टीपथात असल्याने ती मराठी कथेच्या शेकडो योजने पुढे आहे. दलित, शोषित समाजाचे जीवघेणे दुःख, यातना व विषमता यांना ती वाचा फोडते, विद्रोह करते, आणि सम्यक दृष्टीने माणसाच्या प्रगतीचा व समतेचा विचार करते. हे भान भारतीय भाषांच्या कथा इतिहासात फक्त दलितकथेला असल्याने तिचे जागतिक कथेशी नाते जुळते.

• • •



दलित आत्मकथा : वेदनांचे आलेख

मागील अठरा-वीस वर्षांपासून दलित साहित्य चळवळीला वेग आला. हे साहित्य कविता, कथा, कादंबरी, आत्मकथा, नाटक इत्यादि वाङ्मयाच्या सर्वांगांनी बहरू लागले, फूलारू लागले. कवितेच्या तुलनेत इतर वाङ्मय प्रकाराची कमी प्रमाणात पण सकस व समृद्धपणे निर्मिती होवू लागली. जीवनाचा एक, एक पदर हळूवारपणे उकलू लागला. कारण भारतीय समाजातील दलित हा जगातील कोणत्याही शोषितांमध्ये सर्वात जास्त व जास्त काळ शोषित राहिला आहे. त्याचे दु:ख, त्याचे दास्य, गुलामगिरी, त्यामुळे त्याच्यावर झालेले अन्याय, अत्त्याचार हे कल्पनातीत आहेत. त्याला जे जीवन हजारो वर्षे जगावे लागले ते इतके भयंकर छळयुक्त तितकेच घृणास्पद आहे. अज्ञान, दारिद्रय, लाचारी, अंधःश्रद्धा, अनिष्ट रूढीपरंपरा इत्यादींमुळे तो दगडागत संवेदनाहिन, बधीर अवस्थेत जगत होता. त्याचे जगण्याचे भावविश्व मारल्या गेले होते, त्याच्या

कल्पनाशक्तीचा व विचारशक्तीचा खून झाला होता. परंतु आता दलित साहित्याने या भावविश्वाला जीवदान दिले आहे. किंवा इतके वर्षे कोंडून ठेवलेल्या या जीवनाला अर्थ प्राप्त करून देण्यासाठी तो साहित्याच्या सर्वांगांनी मोहरून आला आहे. त्याच्यावर झालेल्या अन्याय अत्त्याचाराच्या विरोधात तो आग ओकू लागला आहे. तर कथा कादंबऱ्यामध्ये त्याचे नायक व त्यांचे नायकत्व तो सिद्ध करू लागला आहे. त्याने जे यातनामय जीवन भोगलं आणि भोगत आहे याचे वास्तव चित्रण तो आत्मकथेत समर्थपणे चितारू लागला आहे. आत्मकथा हा दलित साहित्यातील अनुभूतीचा सर्वात समृद्ध भाग म्हणावा लागेल. या आत्मकथांमधून दलित जीवनाचे भोग, त्याची दाहकता मनाला अस्वस्थ करणारी असते. स्वत:ची कथा कथन करणारा आपले आजवरचे जीवन कसे, कसे घडत गेले, त्याविषयीच्या आठवणी तो सांगत असतो. तद्वतच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्वज्ञानाने व चळवळीने त्याच्या सांस्कृतिक, शैक्षणिक, सामाजिक जीवनात कसा बदल झाला, हे सत्य पाहण्याचाही त्याचा प्रयत्न असतो. दलित साहित्यातील आत्मकथा म्हणजे दलिताच्या सांस्कृतिक क्रांतीचा इतिहास आहे. दलित आत्मकथा म्हणजे दलितांच्या वेदनांचे आलेख आहेत.

दलित साहित्यातील आत्मकथा या वाङ्मय प्रकारात आतापर्यंत समृद्ध व सकस बरीच पुस्तके प्रकाशित झाली आहेत. ज्यांचा सतत उल्लेख झाला ते प्रा. प्र. ई. सोनकांबळे यांचे आठवणींचे पक्षी, लक्ष्मण माने (उपरा), दया पवार (बलुतं), माधव कोंडविलकर (मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे), शंकरराव खरात (तराळ-अंतराळ), उत्तम बंडू तुपे (काट्यावरची पोटं), नानासाहेब झोडगे (फांजर), केशव मेश्राम (हकिकत आणि जटायू), रूस्तम अचलखांब (गावकी), पार्थ पोळके (आभरान) इत्यादींचा त्यात समावेश असला तरी आपल्या पुस्तकाच्या पृष्ठे मर्यादेमुळे येथे त्यातील फक्त काहींचीच संक्षिप्तपणे चर्चा करता येईल.

प्रा. प्र. ई. सोनकांबळे :

(आठवणींचे पक्षी)

पुस्तक प्रकाशित होण्याअगोदर अस्मितादर्श या त्रैमासिकामधून प्रा. प्र. ई. सोनकांबळे यांनी 'आठवणींचे पक्षी' या शीर्षकाखाली काही आठवणी लिहिल्या. त्या हृदयाला स्पर्श करणाऱ्या, मन हेलावून सोडणाऱ्या अशा असल्याने सुज्ञ वाचकांकडून त्यांचे सर्वत्र अभिनंदन झाले. सोनकांबळे यांची भाषाशैली मराठवाड्याच्या उस्मानाबाद जिल्ह्याच्या खेडचातील आहे. ती ओढून-ताणून किंवा कसरत करून आणलेली नाही, तर त्या भाषेशिवाय सोनकांबळे यांना त्या आठवणी नागरी भाषेत सांगताही आल्या नसत्या. किंवा सांगितल्या असत्या तर आज जे 'आठवणींचे पक्षी' इतक्या उंचीवर गेले आहेत ते गेलेही नसते. म्हणजे सोनकांबळे यांच्या भाषाशैलीने त्या आठवणींना जीवंतपणा आला आहे. अतिग्रामीण बोली-भाषेत कथन करतांना वाक्ये लहान लहान व सुटसुटीत आहेत. हेही सोनकांबळे यांच्या भाषेचे खास वैशिष्ट्य आहे. त्याच्या निवेदनात एक लय, लकव आहे, जी प्रादेशिकतेची उमेदवारी करतेच. त्याचबरोबर कथन करणाऱ्याचा त्या काळातील भोळेपणा, वेंधळेपणा, निरागसपणा दाखविते. त्यांच्या कथनशैलीने त्या काळाचे व त्या, त्या स्थळाचे वास्तव, स्पष्ट चित्र डोळ्यासमोर उभे राहते.

आई, वडील निर्वतल्यानंतर निवारा व पोटाचा प्रश्न सोडविण्यासाठी 'आक्का' (मोठी वहीण) च्या आडोशाला राहणारा लहानग्या 'पल्या' (प्रल्हाद) च्या त्या आठवणी आहेत. त्या आठवणी सांगतांना प्रा. प्र. ई. सोनकांबळे यांनी त्यांच्या आजच्या प्रगल्भ, प्रौढ, नागरी व्यक्तिमत्वाचा पुसटसाही स्पर्श 'पल्या' किंवा 'परलाद' च्या निरासग, बाळबोध व वेंधळ्या व्यक्तिमत्वाला होवू दिला नाही. सोनकांबळे कमालीच्या तटस्थेने, संयमाने तितक्याच सहजतेने त्या लिहून जातात. त्यांच्यावर झालेला अन्याय हे चीड आणणारे, अमानुष असतानाही सोनकांबळे कुठेही तोल सुटू देत नाहीत. संबंध आठवणीत कोठेही अभिनिवेश नाही की, आक्रस्तळेपणा नाही की, कोणतेही निवेदन नाही. म्हणूनच सोनकांबळे यांचे 'आठवणींचे पक्षी' जे

जास्त परिणामकारक उतरले आहेत. जातीव्यवस्थच्या विषमतेने कोवळ्या परलादचे काय, काय हाल झाले याचे मनाला सुन्न करणारे विदारक अनुभव 'आठवणींचे पक्षी' वाचकांच्या समोर ठेवते. अर्धी चतकोर, विटलेली शिळी भाकरी मिळावी म्हणून सडकं कुत्रं ओढणारा, शेण काढून गोठा साफ करणारा, लाकडे फोडणारा किंवा मिळेल ते मरेस्तोवर काम करणारा परलाद वाचकास नुसताच अस्वस्थ करीत नाही तर या विषम समाजव्यवस्थेची चीड निर्माण करतो व विद्रोहाचा ज्वालामुखी धगधगत ठेवतो.

जातीयव्यवस्थेने एका समाजजीवनाचे केलेले वाळवंट परलादच्या रूपाने 'आठवणींचे पक्षी'त भेदकपणे ऊभे करण्यात सोनकांबळे शंभर टक्के यशस्वी ठरेल आहेत. तसेच ते त्या कठीण व भीषण परिस्थितीवर मात करण्यात जीवनातही यशस्वी ठरले आहेत. गावाने परलादाला कवडीची किंमत दिली नाही, माणसाच्या रूपाने वागविलं नाही, तिथं कसलं प्रेम नाही, आत्मियता नाही. तरीही अनवाणी पायानं चालणारा व पोटात अन्नाचा कण नसणारा परलाद शिक्षणाची कास सोडत नाही. शिक्षणाने पुढे जावून मोठं व्हावं या जिद्दीनं तो आलेल्या संकटांना सतत सामोरा जातो, या पायावाटेवर जे जे रूतेल, ओरबडेल, खरचटेल ते सर्व झेलत सहन करत चालायचं; ते सहन केल्याशिवाय गत्यंतर नाही ही मोठी समज लहानग्या परलादला परिस्थितीनं शिकविली असते. म्हणूनच तो पुढे शिकून मोठा होतो. एका मोठ्या नावाजलेल्या कॉलेजचा उपप्राचार्य होतो. ही जीवनावरची निष्ठा सर्वच दलितांबरोबर सोनकांबळे यांनाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्वज्ञानाने दिली. जीवनाच्या अस्पृश्यतेमुळे सर्व दलितांच्या वाट्याला आलेल्या दु:खाचे असंख्य कंगोरे सोनकांबळे यांच्याही वाट्याला आलेले आहेत. आणि त्याच्या भरीसभर म्हणन लहानपणी वारलेल्या आई-वडिलांचे दु:ख व त्याग, पोरकेपणामुळे त्यांची झालेली ओढाताण याचे भेदक चित्र त्यांनी साकार केले आहे. वेदना आणि दु:ख यांनी खच्चून भरलेल्या ह्या आठवणी त्यांच्या जीवनाला पूर्णपणे खग्रास ग्रहणाप्रमाणे झाकाळून टाकतात. ज्या पाणवठ्याचे पाणी गुरेढोरे पितात त्या पाणवठ्याचे पाणी पिण्याबद्दल सवर्णांकडून शिव्यांची

लाखोली वाहिल्या जाणे, गावातील सवर्ण हिंदुची मुलगी सासरी जात असतांना अचानक समोर आल्याने 'अशुभ महारडा' म्हणून झालेली संभावना किंवा प्राध्यापक झाल्यानंतरही गावात गेल्यानंतर मिळणारी अपमानास्पद वागणूक या सारख्या कितीतरी जीवघेण्या आठवणी सोनकांबळे यांनी समर्थपणे शब्दबद्ध केल्या आहेत. हे सर्व सांगत असताना सोनकांबळे यांनी कुणावरही आगपाखड केली नाही, कुणाला शिवीगाळ केली नाही की कसल्या प्रकारचा त्रागाही केला नाही. (अर्थात केला असता तर त्यांचे फार काही चुकले असते असेही नाही.) परंतु कलावंत म्हणून लागणारा संयम त्यांनी पुरेपुर पाळला आहे. हे वेदनांचे इतके प्रचंड वाळवंट तुडवित असतांना ओलाव्याच्या जागाही चित्रित करायलाही सोनकांबळे विसरले नाहीत. या सर्व गुणवैशिष्ट्यानी सोनकांबळे यांचे 'आठवणींचे पक्षी' हे दलित आत्मकथांचा मानबिंदू ठरावा.

लक्ष्मण माने :

(उपरा)

भारतीय समाजव्यवस्थेत जाती जमातीची जी उतरंड आहे त्यात खाली ठेवलेल्या व नीच समजल्या गेलेल्या जातीतही अनेक जाती, पोट-जाती आणि जमाती आहेत. ज्यांना अस्पृश्य ठेवल्या गेले त्या जाती गाव-शीवेबाहेर झोपडचांमधून राहायच्या, आजही राहतात. त्यांनी गावातील स्पृश्य म्हणविणाऱ्या लोकांची निकृष्ट प्रतीची कामे करावी व सेवा करावी असा नियम या समाजव्यवस्थेत होता. म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक चळवळीने यात आता हळूहळू बदल होतही असेल; परंतु हे चित्र संपूर्णपणे बदलले नाही.

या खालच्या जातींना स्वत:चा एक व्यवसाय होता. मांगांनी डफडे वाजवावे, दोर टोपल्या, केरसुण्या (झाडू) तयार कराव्या, चांभारांनी मेलेल्या जनावराचे चामडे कमवावे, त्यापासून मोट, जोडे, चपला इत्यादी चामडचाचे साहित्य बनवावे, या व अशाच प्रकारची हलकीसलकी कामे त्यांच्या वाटचाला आली होती. त्यांच्या धद्यांना प्रतिष्ठा नव्हती. परंतु

त्यांना स्वतःचे गाव होते, झोपडी होती आणि पोटाला अर्धी-चतकोर शिळी, वाळलेली, भाकरी मिळत होती.

या जाती व्यतिरिक्त ज्यांना आपण विमुक्त भटक्या जमाती म्हणतो त्यांना स्वतःचे गाव नाही. झोपडी नाही, धंदा नाही. पोट भरावयाचे साधन नाही. गावोगाव भटकंती करून गावाबाहेर माळावर पालांमधून राहावे, रानावनातून कंद, मुळे गोळा करून, पशूपक्षांची शिकार करून पोटांची खळगी भरावी किंवा दगड, माती, रानमुळ्या, शिंपल्या, सुई-धागा, गळ्यातील मणी, पोत इत्यादी विकून घास-कुटका मिळवून उदर-निर्वाह चालवावा असा या विमुक्त भटक्या जमातीचा जगण्याचा कार्यक्रम असतो. यात मांग-गारूडी, फासेपारधी, वडार, कैकाडी, मसनजोगी इत्यादींचा समावेश आहे. या जमातींचे जीवन अत्यंत कष्टदायक, अस्थिर व दारिद्र्याने पिडलेले आहे. शिक्षणाचा वाराही न लागलेल्या या जमातींना कोणत्याच नागरी संस्कृतीचा स्पर्श झालेला नाही. आणि अशा अवस्थेत जगणाऱ्या दलितांना आपले जीवन लेखी स्वरूपात कथन करणं ही काही साधी बाब नाही. म्हणून मराठीत अशा स्वरूपाचं लेखन या अगोदर कुणीही केलं नाही. तथाकथित इतर मान्य लेखकांना तर ते कल्पनेपलिकडील आहे. ही अत्यंत कठीण, तितकीच महत्त्वपूर्ण गोष्ट लक्ष्मण माने यांनी आपल्या 'उपरा' या आत्मकथनाने यशस्वीपणे केली आहे. 'उपराने' दलित साहित्याची व्याप्ती वाढविली आहे. गाढवाच्या पाठीवर संबंध किडूकमिडूक संसाराचे ओझे व स्वतःच्या डोक्यावर दारिद्र्य, लाचारी, अज्ञान, कष्ट, क्लेश व जीवनात आपले काहीच नाही या जाणीवेने उपरेपणाचे गाठोडे घेऊन गावोगाव भटकणाऱ्या कैकाडी या जमातीतील तरुणाची 'उपरा' ही आत्मकथा आहे. ही कथा लक्ष्मण माने यांचीच राहात नाही तर ती संबंध कैकाडी आणि तत्सम भटकंती करणाऱ्या कितीतरी भटक्या जमातीची होते. जीवनात कोणत्याच गोष्टीची स्थिरता व शाश्वती नसल्याने या अज्ञानी समाजात शिक्षणाला फारसे महत्त्व नाही. शिकून काय करायचे ! हा त्यांच्यासमोरचा सततचा प्रश्न आहे. सामाजिक स्थित्यंतरे व सुधारणा याच्यापासून ते शेकडो मैल

दूर आहेत. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सामाजिक व शैक्षणिक चळवळ तसेच विज्ञान युगाने जवळ आलेले जग या दोहोंमुळे आता कुठे, कुठे भटक्या जमातीतील एखादा तरुण शिक्षण घेत आहे, तो भाग निराळा व विरळाच.

लक्ष्मण माने शिक्षणासाठी आई-वडिलांपासून शहराला पळून जातात व पुढे त्यांना सामाजिक चळवळीत काम करणारा शिक्षकवर्ग, मित्रवर्ग भेटतो, त्यामुळे लक्ष्मण माने यांना जीवनाकडे मागे वळून पाहण्याची ही दृष्टी लाभली असे दिसून येते.

अडाणी समाज, अठरा विश्वे दारिद्र्य, टोपली, कणग्या, पाट्या बनवून व त्या विकून, कधी, कधी भुरटी चोरी करून पोट भरण्याची धडपड, अंधःश्रद्धा, चमत्कार, देवावरचा अगाध विश्वास व त्यामुळे विचार करण्याची खुंटलेली मती इत्यादी कारणांनी शिक्षणाचा गंध नसलेल्या समाजात मुलगा पहिला वर्ग पास झाल्यावर बापाचा आनंद ओसंडून वाहतांनाचा प्रसंग फारच बोलका, वास्तव व हृदयस्पर्शी उभा केला आहे. कधीही लाड न करणारा बाप कडेवर उचलून घेतो आणि (आनंदाने) रडावयास लागतो, बाप का रडतो आहे हे न कळल्याने लहानगा लक्ष्मण-ही रडावयास लागतो, या बापलेकांचे रडणे बघून वस्तीतील सारी लहान, सहान पोरं रडावयास लागतात, तेव्हा बाप ओरडतो,

'आर, कुनी मेलं व्हय, रांडच्यांनो, रडताया ते ?'

'आर, माझा ह्यो वाग पास झालाय, पास !' असं म्हणून बापाने लक्ष्मणचे पटापट मुके घेतले आणि साऱ्या वस्तीत व दिसेल त्याला ही आनंदाची बातमी सांगत सुटला. डोळ्यात पाणी उभे करणारे असे बरेच प्रसंग 'उपरा'त आहेत.

हजारो वर्षे ज्या समाजाला शिक्षणाचे दरवाजे बंद होते त्याला ते मिळू लागताच त्याचे महत्त्व, त्याचा आनंद किती होतो हे या प्रसंगाने स्पष्ट होते.

आईचे जीवघेणे बाळांतपण, कणगी, टोपलीसाठी फोक आणायला

गेल्यावर जंगलात जवळच दिसलेला अजगर, पारूमामीवरील बलात्कार व त्यामुळे तिचं वेडं होणं, यात्रेची नवलाई, शहरात शिकायला गेल्यावर खोलीवरील मुलांचे वागणे, कॉलेजात आलेले विलक्षण अनुभव, प्रेमविवाह व त्यामुळे ससेहोलपट इत्यादी वास्तव प्रसंग 'उपरा'मध्ये लक्ष्मण माने यांनी प्रचंड ताकदीनिशी जसेच्या तसे उभे केले आहेत. जीवन जगताना दारिद्र्यामुळे काय काय भोगावे लागते व किती भयंकर छळवणूक होते याचे विदारक प्रसंग आहेत. तसेच अज्ञान, अंधःश्रद्धा व चमत्कारावर असलेला विश्वास व्यक्त करणाऱ्या घटनाही आहेत.

या साऱ्या वास्तवाचे चित्रण करताना लक्ष्मण माने कमालीचे तटस्थ आहेत. आपल्या गत जीवनाकडे बघण्याची त्यांची दृष्टी कलावंत म्हणून नितळ आहे. 'उपरा'ने कलात्मक पातळीवरची गगनभेदी उंची गाठली आहे. लक्ष्मण माने यांची भाषाशैली हे एक वैशिष्ट्य आहे. सातारा जिल्ह्यातील ग्रामीण लकबी, मराठी, त्यात मधूनमधून नागरी मराठी, प्रसंगानुरूप कैकाडी व तिचे तेथेच दिलेले अनुवाद आणि शब्दार्थ यामुळे 'उपरा'तील भाषा ओघवती म्हणूनच वाचनीय आहे. 'उपरा' वाचताना हातातून सोडावेसे वाटत नाही. कारण त्यातील प्रसंग व भाषाशैली यांचा सुरेख संगम साधल्या गेला आहे. या साऱ्या गुणवैशिष्ट्यांनी 'उपरा' अजोड अमूल्य कलाकृती झाली आहे.

रूस्तुम अचलखांब :

(गावकी)

'गावकी' हे प्रा. रूस्तुम अचलखांब यांचं एक अजून वेगळं आत्मकथन. दलित लेखकांची आत्मकथने ही वेगवेगळी वैशिष्ट्ये, वेगवेगळचा भाषाशैली व समृद्ध अनुभवविश्व घेऊन येतील हे मी अगोदरच लिहिलं आहे. कारण निरनिराळ्या जाती-जमातीच्या जगण्याचे व भोगण्याचे अलग अलग पदर आहेत. त्यांच्या रीतीभाती, रूढी-परंपरा व वरिष्ठ समजल्या जाणाऱ्या जातींनी त्यांची केलेली छळणूक याचही प्रत्येकाचं असं आगळं मोजमाप आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सामाजिक चळवळ १९५०–५५ च्या काळात संपूर्णपणे फोफावली होती. खेडोपाडी तिचे लोण पोहोचले होते. मुला-मुलींना शाळेत घाला हा बाबासाहेबांचा संदेश व मेलली जनावरं ओढणं सोडा, जनावरांचे मांस खाणं बंद करा, गावकीची कामं बंद करा, ज्या धंद्याना प्रतिष्ठा नाही ते सोडून द्या हा त्यांचा आदेश त्यांच्या अनुयायांनी (प्रामुख्याने महारांनी) अंमलात आणावयास सुरवात केली होती. खेड्या-पाड्यातील अडाणी, गरीब महारांनी मुलामुलींना शाळेत घातले होते. आमची मुलंही भविष्यात मास्तर होतील, साहेब होतील ही सुखस्वप्ने त्यांना पडू लागली होती. त्यांचा स्वाभिमान जागृत झाला होता. एक मन्वंतर घडले होते. तो भारावलेला काळ होता. या-उलट सवर्ण हिंदूना महारांचे हे वागणे चिड आणणारे होते. महार माजले असा त्यांचा समज झाला होता. दोन समाज गटांमध्ये ठिकठिकाणी तेढ व संघर्ष निर्माण झाला होता. हजारो वर्षे गुलामगिरी, दास्य, दैन्य, कष्ट यांनी पिचलेला समाज नविन होवू घातलेल्या बदलाची वाटेल ती किंमत द्यावयास तयार होतो; तर दुसऱ्या बाजूला काहीही झाले तरी त्यांना वर येवू द्यावयाचे नाही ही भूमिका शोषितांची होती.

या काळात रुस्तुम नावाचा मुलगा शाळेत घातल्या जातो. जवळ पाटी नाही, पुस्तक नाही, दप्तर नाही. अशा अवस्थेत शाळेत जायचे, इतर मुलांपासून वेगळं बसायचे. महाराच्या मुलाचा स्पर्श झाला की विटाळ होतो या मास्तर आणि विद्यार्थ्यांमध्येही असलेल्या भावनेमुळे तिरस्कार, चिड व टिंगलीचा विषय व्हायचे हे सारे जगावेगळे दुःख व यातना लहानपणापासून या पिढीच्या वाट्याला आलेल्या आहेत. याचे भेदक व वेधक चित्रण अचलखांब यांनी गावकीमध्ये रेखाटले आहे. माने-गावच्या महारवाड्यातील बारीक-सारीक प्रसंग त्यांनी उभे करण्यात समर्थ लेखकाप्रमाणे लेखणी चालविली आहे. लग्नाचा सोहळा, नवर-देवाची गावातील मिरवणूक, पोळ्याचा सण व त्यानंतर महारांवर टाक-ण्यात आलेला बहिष्कार इत्यादी प्रसंगाचे बारकावे, त्यातील नाट्य लेखकाने यशस्वीपणे टिपले आहे. कल्याणची जत्रा, जत्रेतील तमाशा

पाहण्याची मौज-मजा, जालनाच्या शाळेत व वसतीगृहात प्रवेश आणि तेथील नाविन्य, हे चितारताना बारा-पंधरा वर्षांच्या काळाचा चित्रपट डोळ्यासमोरून सरकत असल्याचा भास वाचकास होतो.

महार आणि कुणबी यांचा पाण्यासाठी, नवरदेवाच्या मिरवणूकीवरून झालेला संघर्ष असो की तेल्यानं महारांना सुपारी देऊन व मोहित्यानं लमाणांना आणून शेतीच्या मालकीसाठी महार लमाणी यांच्यात लावलेले भांडण असो, अचलखांब यांनी वास्तव प्रसंग शब्दबद्ध केले आहेत.

लहानपणापासून अवखळ हरहुन्नरी असलेल्या रूस्तुमला गाणे, नाचणे तमाशा याचा नाद असतो. पुढे विद्यापीठात नाटचशास्त्र विभागात अध्यापक होतो. एवढं आत्मकथन करताना समाजाबद्दलचे बारकावे, आपआपसातली फुट व त्यामुळें बाबासाहेबांच्या निधनानंतर समाजात पडलेले तट त्याबद्दलचा तिरस्कार, आपण एवढे शिकून सवरून प्राध्यापक झाल्यावरही गाव आपल्याला अजून पायरीच्या खालीच ठेवतं, ही जीवघेणी खंत, म्हणून त्यामुळे देशाबद्दल वाटणारी चिड हे सारं कथन करताना अचलखांब कमालीचे अस्वस्थ असतात, तसेच ते वाचकालाही अस्वस्थ करतात.

'गावकी'ची भाषा मराठवाडा व वऱ्हाड याच्या सरहद्दीवरची भाषा आहे. संबंध गावकी त्या बोलीभाषेत लिहिली असल्याने तिला एक वजन प्राप्त झाले आहे. जीवंतपणा आला आहे. छोटचा, छोटचा प्रसंगांनी 'गावकी' उभी राहीली आहे. त्यामुळे हे वैशिष्टचपूर्ण आत्मकथन झालं आहे.

आता दलित तरुण आपआपली आत्मकथने लिहू लागली आहेत. ते सर्व वेगवेगळचा वातावरणात, वेगवेगळचा जाती, जमाती, पोटजाती व निरनिराळचा वातावरणात, निरनिराळचा चालीरिती, रूढी, परंपरातून आल्याने त्यांचे अनुभव परस्परांहून वेगळे राहणार आहेत. म्हणूनच ते एकसुरी होणार नाहीत. प्रत्येकाची भाषाशैली वेगळी राहणार आहे.

तसेच या सर्वच आत्मकथनांचे एक वैशिष्टच हे की, ही आत्मकथने तरुणांनी लिहिली आहेत. हे सारे तरुण सामाजिक बांधिलकी मानणारे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सांस्कृतिक, सामाजिक व साहित्यिक चळवळीतून आपल्या विचारांवर भक्कमपणे उभे राहिलेले आहेत.

त्यामुळे भूतकाळाकडे अलिप्तपणे पाहण्याची दृष्टी व भविष्याचा वेध घेण्याचे सामर्थ्य त्यांना मिळाले आहे.

उपेक्षित समाजाची समृद्ध अनुभूतीची ही आत्मकथने दलित साहित्याच्या अजोड कलाकृती ठराव्यात.

• • •

दलित रंगभूमी

दलित रंगभूमीविषयी विचार करण्याचा जेव्हा प्रश्न येतो तेव्हा दलित रंगभूमी असू शकते काय ? ती मराठी रंगभूमीपेक्षा वेगळी कशी आणि तिचे भवितव्य काय ? इत्यादी प्रश्न उपस्थित होतात. या प्रश्नांची उत्तरे मराठी रंगभूमी काल आणि आजच्या पार्श्वभूमीवर शोधावे लागतील.

नाटक कालचे

कालच्या मराठी रंगभूमीचा ढोबळ इतिहास पाहिला तर आपणास दिसून येते की १८४३ च्या सुमारास तिचा जन्म झाला. सुरवातीची नाटके पौराणिक होती. रामलीला, सीता स्वयंवर, शंकर-पार्वती विवाह असे चमत्कारिक आणि अद्‌भूत विषय ती रंगवित होती. त्यानंतर रंगभूमीचे दोन वर्ग पडले. त्यात सामाजिक जाणीव घेऊन नाटके सादर करणारांचा एक वर्ग व रंजनपर नाटके सादर करणारांचा दुसरा वर्ग. या काळात

कोल्हटकर, देवल आणि किर्लोस्कर या नाटक कंपन्यांनी रंगभूमीवर आपले वर्चस्व ठेवले. त्यात सामाजिक जाणीव घेऊन येणाऱ्यांच्या वर्गातील जाणीव ही उच्चभ्रू समाजाची जाणीव होती. किंवा असलीच तर मध्यम-वर्गीय होती. उच्च, मध्यमवर्गीय सामाजिक समस्यांचे दर्शन नाटककारांनी घडवून, कलावंतांनी ते रंगभूमीवर उभे केले. तत्कालीन समस्या, व त्यांची उकल, काही बोधप्रद आणि सुधारणात्मक विचार मांडण्यासाठी झाला. तसाच मनोरंजनासाठीही मराठी रंगभूमीचा वापर झाला. दारूचे दुष्परिणाम, हुंडा पद्धती, बाल-विधवाविवाह इत्यादी प्रश्न घेऊन मराठी रंगभूमी उभी राहिली, प्रेमाचा विषयही तिने घोळून घोळून चोथा केला.

१९३० नंतर नाट्य मन्वंतर घडले म्हणतात. त्याचे प्रवर्तक रांगणेकर, अत्रे म्हटल्या जातात. पण या मन्वंतराचे आणि समाजातील तळागाळाचे तसे काहीही नाते नव्हते. या काळातही रंगभूमी खाली येऊ शकली नाही. वर उल्लेख केलेल्या विषयांव्यतिरिक्त काल आणि आजही इतिहासातील राजे, थोर पुरुषांच्या जीवनातील काही प्रेमाचे, कधी शोकान्तिकेचे, रोमहर्षक प्रसंगाचे चित्रण मराठी रंगभूमीने टिपले. पण ह्या एका आचाराविचाराने येथील असंख्य माणसांचे जीवनच उद्ध्वस्त केले, त्यांना माणूस म्हणून जगण्याचा हक्क नाकारला व त्यांच्या जीवनाला किंमत दिल्या गेली नाही, ते मातीमोल केले. तो विचार, आचार होता चातुर्वर्ण्यव्यवस्थेचा. या वर्णव्यवस्था पद्धतीने सांगितलेली जातीव्यवस्था किती भयंकर होती. दाबल्या गेलेल्या तळागाळातील माणसाच्या आयुष्यातही काही नाट्य होतेच की नाही ? जाती, जातीतील भयंकर-पण जसे मराठी वाङ्मयकारांना दिसले नाही. तसेच ते मराठी रंगभूमी सजविणाऱ्या नाटककार, दिग्दर्शक, निर्माते, नेपथ्यकार, प्रकाशयोजक, संगीतकार, अभिनेते व इतरही सटरफटर संबंधितांनाही दिसले नाही. येथील समाज जीवनाला गतीरोधकाचे काम करीत असलेला विचार, आचार, रूढी, परंपरा यांना एक निश्चित स्वरूपात जो आळा बसायला हवा होता, त्यांच्यावर सर्वांगाने ज प्रहार व्हायला हवे होते त्या पद्धतीने मराठी माणसाच्या जीवनात मात्र कधी झाले नाही. अपवाद म्हणून

झालेले प्रहार तोकडे, एका मर्यादेपलिकडे गेले नाहीत. म्हणून मराठी वाङ्मयाचा शेकडो वर्षांचा इतिहास जसा एका विशिष्ट विचाराभोवती गरगरत राहिला तीच तऱ्हा मराठी रंगभूमीचीही झालेली आढळते.

मराठी रंगभूमीतील रंग आणि भूमी चातुर्वर्ण्यातील खालच्या वर्णासाठी कधीच राहिली नाही. चुकून माकून संवादात, खालच्या जातीचा उल्लेख उपहासाने, टिंगलीखातर किंवा शिवीसाठीच आला. एखादा घरगडी फडके मारीत, मारीत रंगभूमीवर आणल्या गेला तो विनोदी पात्र बनवून.

लोकरंगभूमी

मराठी रंगभूमीवर नाटके सादर होण्याचा अगोदर मराठी माणसाच्या जीवनात लोकरंगभूमी होती. यात भारूडे, गोंधळ, तमाशा यांचा समावेश होता. यापैकी तमाशाने जनसामान्यात एक वेगळी, आगळी आवड निर्माण केली होती. त्या काळात गोंधळ, भारूडे किंवा लळिते यांनी पारंपरिक पौराणिक मनांच्या मनोरंजनाची गरज भागविली. पण तमाशा तत्कालीन समाजजीवनाशी समरस होऊन, वास्तवात उतरत होता, तसाच तो गर्दीही खेचीत होता. मात्र मराठी रंगभूमीवरील नाटकांच्या उदयाने तमाशाला हीन व अप्रतिष्ठीत समजल्या गेले. (कारण तमाशा ही कला खालच्या वर्गातील मंडळी सादर करीत होती). आणि जातियवादी प्रवृत्तीचा प्रत्यय येथेदेखिल नाटककार व प्रेक्षकांनी दाखवून दिला. नाटक सादर करणे व पाहणे हे प्रतिष्ठेचे लक्षण समजल्या जाऊ लागले, तर तमाशा पाहणे अप्रतिष्ठेचे.

आजची रंगभूमी

आजच्या रंगभूमीचे स्वरूप पाहिले तर या रंगभूमीचे हौशी, धंदेवाईक व प्रायोगिक असें प्रकार दिसतात. धंदेवाईक नाटक कंपन्या भडक विषयांवरील नाटके सादर करून गल्ला भरतात, हौशी नाटक कंपन्या हौशी खातर नव्या जुन्या नाटकांचे प्रयोग करतात. तर प्रायोगिकवाले प्रयोगाच्या नावाखाली मनोविश्लेषणात्मक, काहीतरी क्लिष्ट किंवा

अतीवास्तवतेच्या नावाखाली, बीभत्स, लैंगिक, अश्लीलता दाखविणारे प्रयोग सादर करतात. हल्ली या प्रकारांना बराच ऊत आला आहे. तात्पर्य कालच्या रंगभूमीत आणि आजच्या रंगभूमीत तसा फारसा फरक झाला नाही. तीही उच्चभ्रू, मध्यमवर्गीयांसाठी रावत होती, आजही तिची तिच गत आहे.

रंगभूमीवरील तांत्रिक बाबतीत मात्र आमूलाग्र बदल झाला. फिरते व सरकते रंगमंच आले वेशभूषा, नेपथ्यात मोठा फरक झाला. नाटकांच्या विषयात बदल झाले. ते वर उल्लेखलेले वरच्या वा मध्यमवर्गीय समाजाचे चोचले पुरविण्याकरिता. हे सारे स्वत:ला रंगभूमीवरील नवप्रवर्तक समजू लागले.

तीस, चाळीस कलावंतांचा ताफा त्यांच्या येण्या-जाण्यासाठी खास मोटारगाडचा, सरकता, फिरता रंगमंच, त्यावर मोठमोठे राजवाडे, वाडचांची दृष्ये, अत्यंत किंमती सजावटीतील पडदे व फर्निचर, खर्चिक, अतिशयोक्तिपूर्ण जाहिराती, आणि हे सारे करण्यासाठी गिऱ्हाइकांकडून मोठचा किंमतीची तिकीटे लावून उकळलेले पैसे, असा हा आजच्या रंगभूमीचा थाट आहे, ही असली नाटके पाहायला कोण जाणार ? तर कारमध्ये, अतिशय ऊंची कपडचात (फॅन्सी ड्रेस कॉम्पीटिशनला जात आहोत अशा भावनेने दागदागिन्यांनी लडबडून साठ-सत्तरीची आजी, पंचेचाळीस–पन्नाशीची आई व वीस-बावीशीची मुलगी किंवा तसाच आजोबा, वडील, मुलगा यांचा क्रम लावून सहकुटुंब नाटकाला जाणे हे श्रीमंती व रसिकता उतु चालली हे दाखविण्याचे माध्यम झाले आहे. आलिशान थिएटर, महागडे तिकिटांचे दर आणि नाटक पाहायला आलेले भपकेबाज वस्त्रां-मधील श्रीमंत प्रेक्षक या साऱ्यांच्या साखळीमुळे हे सर्व सामाजिक व आर्थिकदृष्टचा वरील दर्जाच्या लोकांसाठी चाललेले आहे हे स्पष्टपणे जाणवते. यावर उपाय म्हणून जागतिक रंगभूमीवर इंटिमेट थिएटरचा विचार आला आहे.

इंटिमेट थिएटरचा विचार

जागतिक रंगभूमीवर आलेला इंटिमेट थिएटरचा विचार भारतात

व मराठी रंगभूमीवर हळूहळू येत आहे. नाटक पाहून झाल्यावर प्रेक्षक व कलावंत यांच्यातील जवळीकतेमुळे नाटकातील वास्तवाने प्रेक्षकांना अंतर्मूख होता यावे हा या मागील मूळ हेतू. इंटिमेट थिएटरमध्ये थिएटर लहान, प्रेक्षकांचा समान वर्ग (एकाच दराची तिकीटे) आणि नेपथ्य, रंगभूषा व बाकीच्या तांत्रिक बाबींना फाटा दिलेला असतो. रोजच्या जीवनातील प्रसंग प्रेक्षकांसमोर जसेच्या तसे उभे केले जातात व त्यामुळेच प्रेक्षक अंतर्मूख बनतात. इंटिमेट थिएटरची ही अभिव्यक्तीची प्रक्रिया सर्वसामान्य माणसाला रूचणारी व पचणारीही आहे.

मराठी रंगभूमीचा असा काळ आणि आजच्या संदर्भात विचार केला की एक गोष्ट स्पष्ट होते की दलित जीवनाचे चित्र रंगमंचावर आणल्या गेले नाही. आशय आणि अभिव्यक्तीच्या बाबतीत मराठी रंगभूमी पांढरपेशी राहिली. म्हणूनच दलित रंगभूमी वेगळी असू शकते काय या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी मिळते.

दलित रंगभूमी

दलित रंगभूमी वेगळी असू शकते असे उत्तर जेव्हा आपण देऊ, तेव्हा ती कशी असावी याचेही उत्तर शोधावे लागेल.

वाङ्मय प्रकारातील नाटक हा प्रकार दृश्य स्वरूपात प्रेक्षकांसमोर सादर करता येत असल्यामुळे त्याचा फायदा सर्वसामान्य अडाणी व शिक्षित जनतेलाही मिळू शकतो. रंगभूमी हे विचार देण्याचे प्रभावी माध्यम आहे. कथा, कविता, कादंबरी या वाङ्मयप्रकारापेक्षा ते प्रभावी आहे. कारण वरील कोणताही प्रकार एकावेळी एकच वाचक वाचू शकतो आणि तो ही फक्त शिक्षित. परंतु रंगभूमीवर सादर होणारे नाटक हे दृश्य स्वरूपात असल्याने त्याचा एकाच वेळी असंख्य प्रेक्षकावरील परिणाम कायम, तसाच पक्का होऊ शकतो.

म्हणून दलित रंगमंचावर येणारी नाटके ही पददलितांच्या जीवनातील रोमांचकारी घटनांनी भरलेली असावी. हजारो वर्षांच्या गुलामगिरीची जी जळमटे आजही त्याच्याभोवती गुंडाळलेली दिसतात त्यांच्या-

वर प्रहार करावे लागतील, समता, स्वातंत्र्य, बंधूता व न्याय हा विचार सर्वसामान्य माणसाच्या मेंदूपर्यंत पोहचवावा लागेल. या देशातील राजकीय लोकशाहीचे सामाजिक लोकशाहीत परिवर्तन करण्यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितलेला अनिश्वरवाद, अनात्मवाद, बुद्धीप्रामाण्यवाद, तर्कवाद, नीतिवाद, व विज्ञानवाद सांगणारा बुद्धविचार त्यातून प्रकट करावा लागेल. माणसा-माणसातील भेदभाव, हा स्वार्थी माणसानेच निर्माण केला असा विचार प्रभावीपणे सांगून येथील विषमतेचे दोस्त असलेले अधःश्रद्धा, चमत्कार, व कर्मकांडावर घणाघाती लागोपाठ प्रहार करावे लागतील.

सर्वसामान्य दलित माणसाचे, त्याच्या जीवनातील सुखादुःखाचे सखोल चित्रण त्यात असेल. त्याच्यावर झालेल्या अन्यायाची व अन्यायकारकांची काळीकृत्ये त्यांना नाटक रूपाने रंगमंचावर आणावी लागतील. त्याचे दोन फायदे असतील.

१) ज्यांच्यावर पिढ्यांपिढ्या अन्याय झाला आहे अशांनी तशी नाटके पाहिल्यावर त्यांचा संताप कायम टिकून राहील.

२) ज्यांनी अन्याय केले त्यांच्या काळ्याकृत्यांचा पाढा जगासमोर वाचल्या जाईल. दलित रंगभूमीवरील नायक हा पिडल्या गेलेला माणूस असेल. तो विद्रोही असेल, सर्व परंपरा झुगारणारा असेल, त्याला माणूसकीची चाड असेल व अन्यायाची चिड असेल.

दलित रंगमंच

अशी नाटके सादर करताना आम्हाला आजची थिएटर्स मिळणार नाहीत किंवा ही महागडी म्हणून परवडणारही नाहीत आणि अशा भपकेबाज, टोलेजंग थिएटर्सची आज गरजही नाही. लहान, लहान स्वस्त थिएटर्स, घरांचे, शाळांचे कंपाऊडस्, तसेच चौकाचौकात उघडचावरही ती सादर करावी लागतील शक्य झाले तर विद्युत प्रकाश, पेट्रोमॅक्स नाही तर शेवटी टेंभ्यांच्या (मशाली, पलिते) उजेडातही ती सादर करावीत. त्यासाठी कलावंतांना भरजरी किंमती कपडे, महागडे मेकअप याचीही गरज नाही. आहे त्या त्या कपडचावर, काहीही मेकअप न करता, फक्त

नाटचलेखनातील, दामदारपणा, संवादातील ताकद, आणि कलावंताच्या समर्थ अभिनयाने दलित नाटक उभे राहील. निग्रोथिएटर किंवा इन्टिमेट थिएटरच्या मार्गाने, अभिव्यक्तिच्या स्वरूपात, दलित रंगभूमी उभी राहावी. आशय मात्र दलिततत्वाचा बाणा ठेवूनच आलेला असावा, ज्यात मानवमुक्तीची स्वप्ने असतील.

आजची दलित रंगभूमी

ज्या पद्धतीने आणि वेगाने दलित साहित्यातील कथा, कविता, कादंबरी आत्मकथन व वैचारिक लेखन आज येत आहे, त्यांच्या तुलनेत नाटकांचे प्रमाण मात्र कमी आहे त्यातही दलितत्त्वाची आशय व अभिव्यक्ती घेऊन येणारे किती ? या प्रश्नाचे उत्तर निराशाजनक आहे. तरीही काही ठळक प्रयत्न आज होतांना दिसतात; ज्यात नागपूर, नांदेड, औरंगाबाद, पुणे, येथील प्रभाकर दुपारे, अमर रामटेके, दत्ता भगत, अविनाश डोळस, खुशाल कांबळे, भि. शि. शिंदे, टेक्सास गायकवाड, प्रेमानंद गज्वी, कमलाकर डहाट यांची नावे या संबंधात घ्यावी लागतील.

आजच्या दलित रंगभूमीसाठी तीन अंकी नाटकांपेक्षा अेकांकिका जास्त लिहिल्या जात आहेत व सादर केल्या जात आहेत असे दिसून येते. या संदर्भात प्रा. दत्ता भगत यांच्या 'आवर्त', प्रभाकर दुपारेचा 'साता समुद्रापलिकडे', प्रेमानंद गज्वी यांचा 'घोटभर पाणी', हे एकांकिका संग्रह व या शिवाय भि. शि. शिंदे, अमर रामटेके, टेक्सास गायकवाड, इ. मो. नारनवरे, योगिराज वाघमारे, सुखराम हिवराळे, खुशाल कांबळे कमलाकर डहाट इत्यादिंनी लक्षणीय एकांकिका लिहिल्या आहेत. या दलित नाटच्य लेखकांचं एक खास वैशिष्टच म्हणजे, जे नाटकं किंवा एकांकिका लिहीतात, प्रामुख्याने तेच त्याचे प्रयोगही करतात. त्यामुळे लेखक, दिग्दर्शकाला अभिप्रेत असलेले सफल प्रयोग सादर होतात. लेखक, दिग्दर्शक व कलाकार या तिन्ही भूमिकेतून एकच व्यक्ती उभी राहते हे दलित नाटक व रंगभूमी यांची एक अभिनव बाब ठरू पाहते. या सर्व एकांकिकामधून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाचे बीज रोवलेले आहे. अन्यायाविरुद्धचा संघर्ष, माणूस म्हणून ऊभं राह-

ण्याची धडपड, देव-धर्माने व जातीच्या विषमतेने केलेला भयंकर अन्याय, अज्ञान अंधःश्रद्धा, चमत्कार यावर ओढलेले कोरडे, दैन्य व दास्य यामुळे थकलेला व वाकलेला माणूस इत्यादी विषय या एकांकिकात हाताळले आहेत. कुठे, कुठे अंतर्मुख होवून बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर समाजात निर्माण झालेली स्वार्थी पुढाऱ्यांची गटवाजी यावरही कोरडे ओढायला या नाटककारांनी कमी केले नाही. जे, जे त्याज्य त्या, त्या विरुद्ध त्यांनी लेखनी परजली आहे.

आज ह्या एकांकिका रस्त्यांवर, गर्दीच्या ठिकाणी, साहित्य संमेलनाच्या ठिकाणी रस्त्यांवर, मोकळचा व बंदिस्त मंचावर होऊ लागल्या आहेत. त्या सादर करताना कलावंताना वेशभूषा किंवा रंग-भूषेचा फारसा सोस नाही. जबरदस्त संवाद, अभिनयाचा गुण व प्रेक्षक श्रोत्यांना नविन असलेला विषय, त्यामुळे यांच्या प्रयोगांच्यावेळी प्रेक्षकांना खिळवून ठेवण्यात त्यांना यश प्राप्त होते.

आता दलित रंगभूमी मोहरू लागली आहे. त्यांची वेगळी 'दलित नाटच संमेलने' भरू लागली आहेत. त्यात लेखन प्रयोग, दलित रंग-भूमीच्या समस्या, तिचा विकास यावर चर्चा, परिसंवाद आराखडे होवू लागले आहेत. एकूणच हा सर्व प्रकार आशादायक आहे. कारण दलित रंगभूमीला विस्तृत क्षेत्र उपलब्ध आहे. अशा विस्तृत व समृद्ध अर्थाने दलित रंगभूमी जेव्हा भक्कमपणे उभी राहील तो दिवस जागतिक रंग-भूमीच्या उद्घाटनचा दिवस असेल.

• • •

दलित साहित्याचे वैचारिक बळ

दलित साहित्याच्या विविध अंगांची निर्मिती, तिचे स्वरूप, वैचारिक भूमिका, प्रेरणा व व्याप्ती इत्यादी विषयांची चर्चा केल्यानंतर आपणास एक गोष्ट मान्य केली पाहिजे की, दलित साहित्य निर्मितीचा प्रारंभ जरी आपण खूप मागे जावून शोधत असलो तरी खऱ्या अर्थाने हा साहित्यप्रवाह १९६५-६७ च्या पुढेच गतीमान झाला आहे. या काळातील पाच-सात वर्षाच्या निर्मितीनंतर दलित साहित्याची व्याख्या, त्याची प्रेरणा, त्याने स्वीकारलेली मूल्ये व भूमिका, त्याच्या जीवन-जाणीवा स्पष्ट होत गेल्या, आकारत गेल्या. दलित साहित्याने माणसाला केन्द्रबिंदू मानून स्वीकारलेल्या समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय या जीवनमूल्यांमुळे ते विश्व साहित्याच्या पातळीवर उभे राहिले. विषमता, मग ती कोणतीही असो, नाकारणाऱ्या आणि माणसाच्या प्रगतीचा व नीतिचा भक्कमपणे पुरस्कार करणाऱ्या या साहित्याची व्याप्ती कोणत्याही विशिष्ट जात, पंथ, धर्मापुरती मर्यादित नाही हे सिद्ध झाले. ही साहित्य विश्वातील क्रांती होती. आज मात्र

काही प्रतिक्रांतीवादी मंडळी ग्रामीण साहित्य, जनवादी साहित्य यांच्या नावाखाली दलित साहित्यापेक्षा या अस्तित्वात नसलेल्या साहित्य प्रवाहांची व्याप्ती मोठी असल्याचा कांगावा व हास्यास्पद प्रयत्न करीत आहेत. या मंडळीच्या कोणत्याही प्रेरणा नाहीत, मूल्ये नाहीत, भूमिका नाही आणि यावरोबरच आवश्यक असलेली वाङ्मय निर्मितीही नाही. असो.

दलित साहित्य निर्मितीच्या प्रारंभ काळातच अजून एक गोष्ट दिसून येते की, याच काळात दलितांच्या चळवळीला जोर चढलेला आहे. डॉ. बाबासाहैब आंबेडकर यांच्या हयातीतील सामाजिक चळवळ व त्यांच्या महापरिनिर्वाणानंतर नेत्यांच्या कोत्या, सकुंचित व स्वार्थीवृत्तीमुळे संघटनेत झालेली दुफळी व चळवळीचे झालेले हाल या काळातील तरुणांनी डोळाभर पाहिले होते, अनुभवले होते. बाबासाहेबांचा हा संबंध समाज एकसंघ होता. त्यांच्या प्रगल्भ, गंभीर व खंबीर नेतृत्वाच्या भरारीपुढे दिशाही थिटया होत्या. त्यांना विरोध करण्याची (काही नामोल्लेख न करण्याइतक्या किरकोळ व्यक्ती वगळल्यास) कोणाचीही प्राज्ञा नव्हती. मात्र नंतर झालेली फाटाफूट ही जीवघेणी, मनाला तीव्र वेदना देणारी व बाबासाहेबांच्या चळवळीला मारक होती. समाजात एकप्रकारचे औदासिन्य आले होते. दलितांवरील अन्याय, अत्याचार वाढले होते. वेलछी, धाकली, बामणगावच्या घटना याच काळात घडल्या. त्यामुळे या काळातील दलित तरुण अंर्तमुख झाला. त्याला समाजभान प्राप्त झाले. त्याची अस्मिता जागृत झाली. तो आंदोलन, निषेध, घोषणा, मोर्चे, भाषणाद्वारे आपले मन, विचार, आचार प्रकट करू लागला तर दुसऱ्या बाजुला काही मंडळी लेखण्या सरसावून लिहू लागली.

पुन्हा एकदा नव्याने समाज ढवळून निघाला. बाबासाहेबांनी पाहिलेल्या समाजाच्या सुखस्वप्नांची पूर्तता करण्यासाठी दलित साहित्य निर्मितीच्या माध्यमाने चळवळ उभारू लागला. आपला हातभार लावू लागला. त्याला मानवमुक्तीची स्वप्ने पडू लागली. म्हणूनच दलित साहित्य निर्मिती ही सामाजिक, सांस्कृतिक चळवळीचा एक भाग आहे. ती सामाजिक बांधिलकी स्वीकारलेल्या साहित्यिकांची चळवळ आहे. नुसत्याच रंजनाचे

किंवा भंजनाचे साधन नाही, तर माणूस घडविण्याचे व देश उभा त्याला बलदंड करण्याचे ते माध्यम आहे. आकारहीन माणसांना आकार देण्याचे, मुक्यांना बोलकं करण्याचे, अशक्तांना सशक्त करण्याचे, थांबलेल्यांना गतीमान करण्याचे, व अज्ञान्यांना ज्ञानवंत करण्याचे ते एक महत्त्वाचे तेवढेच मौलिक साधन आहे.

दलित साहित्याची ही वैचारिक, तात्त्विक बाजू बाबासाहेबांच्या तत्त्वज्ञानात शोधून दलित साहित्याची भूमिका, समीक्षा व मूल्यात्मक घटना मांडण्यांचे अत्यंत महत्त्वाचे तेवढेच अवघड काम या काळात प्रा. म. भि. चिटणीस, डॉ. म. ना. वानखडे, बाबुराव बागूल, डॉ. भालचंद्र फडके, डॉ. यशवंत मनोहर, प्रा. रा. ग. जाधव यांनी केले. त्यांच्या अभ्यासपूर्ण वैचारिक लेखनाने दलित साहित्याला प्रचंड बळ प्राप्त झाले. दलित साहित्याला आकार मिळाला व दिशा गवसल्या. या भक्कम वैचारिक बळामुळे दलित साहित्याच्या विरोधकांना उत्तरे मिळाली. तसेच तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, नरहर कुरूंदकर, वा. ल. कुलकर्णी, पु. ल. देशपांडे, गं. वा. सरदार, वि. वा. शिरवाडकर, रा. भि. जोशी, मे. पुं. रेगे इत्यादी साहित्यिक, समीक्षक व विचारवंतांनी दलित साहित्य निर्मिती व तिची भूमिका याबद्दल नुसतीच पोच दिली नाही तर जागतिक साहित्याच्या क्षितिजावरील जीवनवादी साहित्याची ही प्रसन्न, सुखद पहाट आहे असे गौरवोद्‌गार काढले.

दलित साहित्याची वैचारिका बाजू समजावून घेताना, प्रा. म. भि. चिटणीस, डॉ. म ना. वानखडे, बाबुराव बागूल यांची भाषणे, लेख व केलेल्या चर्चा अभ्यासाव्या लागतील. त्यांच्या भाषण, लेखनाने दलित साहित्याची व्याख्या, प्रेरणा, व्याप्ती व मूल्ये ठरविण्याचे महत्त्वपूर्ण ऐतिहासिक कार्य केले आहे. प्रा. रा. ग. जाधव, डॉ. भालचंद्र फडके, डॉ. यशवंत मनोहर यांच्या लिखाणाने दलित साहित्याची समीक्षा, आकलन, सौंदर्यशास्त्र, स्वरूप व सिद्धान्त एकूणच साहित्य विषयक प्रश्नांची उत्तरे मिळाली आहेत.

डॉ. भालचंद्र फडके :

(दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह)

डॉ. भालचंद्र फडके यांनी दलित कविता, कथा, नाटक, आत्मकथन इत्यादी वाङ्मय प्रकारावर आस्वादात्मक समीक्षा लिहिली. दलित साहित्याची आवश्यकता, त्याचे मोठेपण व मराठी साहित्यापेक्षा निराळेपण, त्यातील आशय, अभिव्यक्ती व अनुभवसंपन्नता इत्यादीचे चिकित्सक आकलनात्मक मूल्यमापन केले.

कोणत्याही साहित्य-कला निर्मितीच्या प्रारंभ काळात त्याला नितळपणे हाताळून त्याची समृद्ध वाढ होण्यासाठी व त्याचे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी ज्या डोळस समीक्षेची गरज असते ते काम डॉ. भालचंद्र फडके यांनी केले.

प्रा. रा. ग. जाधव :

(निळी पहाट, साहित्य आणि सामाजिक संदर्भ, वाङ्मयीन आकलन)

दलित साहित्य चळवळीच्या प्रारंभापासून दलित साहित्य भूमिकेची वाङ्मयीन, सांस्कृतिक चिकित्सा करणारे प्रा. रा. ग. जाधव यांनी आपल्या 'निळी पहाट, साहित्य आणि सामाजिक संदर्भ, वाङ्मयीन आकलन' या ग्रंथांमधून दलित साहित्यातील दृश्य अदृश्य भावनांचा, सौंदर्याचा, जीवन जाणिवांचा शोध घेतला आहे. वाङ्मय समीक्षा करतांना लागणारी तरल, लवचिक सौंदर्यदृष्टी व दलित जीवन जाणिवा शोधताना लागणारी भौतिक, जीवनवादीदृष्टी व जबरदस्त ताकद या दोहोंचा अपूर्व मेळ त्यांच्या लिखाणात दिसून येतो.

'निळी पहाट' या ग्रंथात दलित समीक्षेचा दलित साहित्याचा विचार करतांना अनेक मूलभूत प्रश्नांचा व मुद्यांचा सखोल अभ्यासपूर्व परामर्श जाधवांनी घेतला आहे. दलित साहित्यासाठी त्याचा अभिजत वर्ग म्हणजे दलित अभिजनवाद निर्माण होणे कसे आवश्यक आहे; हा वर्ग कला साहित्य निर्मितीचे क्षेत्र नुसतेच टिकवून ठेवत नाही, तर तो ते अधिक समृद्ध व विस्तृत करण्यासाठीही कसा प्रतिसाद देतो, या दलित अभिजनवादाविषयी जाधवांनी प्रथमच विस्तृत लिहिले आहे. याशिवाय दलित

कलेचा आकृतीबंध, दलित शब्दब्रह्म दलित साहित्य व कलात्मक ताटस्थ, दलित पुराणकथा इत्यादी महत्त्वाच्या विषयांवर लिखाण करून दलित साहित्याला वैचारिक सौंदर्य प्राप्त करून देण्यासाठी जाधवांनी मूलभूत स्वरूपाचे मौलिक वैचारिक योगदान दिले.

डॉ. यशवंत मनोहर

(दलित साहित्य सिद्धान्त आणि स्वरूप, स्वाद आणि चिकित्सा)

प्रा. यशवंत मनोहर यांनी दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र प्रथमच सूत्ररूपाने मांडले. दलित साहित्यः सामाजिक बांधिलकीचा प्रश्न, दलित साहित्य आणि पुरोगामित्व, दलित साहित्य सिद्धान्तः आणि स्वरूप या-विषयांवर अत्यंत अभ्यासपूर्ण मूलभूत विचार व दलित साहित्याच्या अनेक प्रश्नांची चर्चा आपल्या खास वैशिष्ट्यपूर्ण शैलीत केली.

डॉ. यशवंत मनोहर यांनी मराठी वाङ्मयातील पारंपरिक समीक्षा, कलावाद व सौंदर्यशास्त्रावर मुळातच घाव घालून दलित साहित्यातील दलितांच्या जीवन जाणिवा, जीवनवादी समीक्षा व या साहित्याच्या सौंदर्यशास्त्राची चिकित्सक मीमांसा केली आहे.


याशिवाय प्रा. रावसाहेब कसबे, ताराचंद्र खांडेकर, राजा ढाले, प्रा. बाळकृष्ण कवठेकर, प्रा. गो. म. कुलकर्णी, प्रा. प्रभाकर मांडे, प्रा. म. सु. पाटील, डॉ. प्रा. ललिता कुंभोजकर इत्यादींनी दलित साहित्याची समीक्षा केली आहे.


प्रा. चिटणीस, डॉ. वानखडे, बाबूल, डॉ. फडके, प्रा. जाधव, डॉ. मनोहर इत्यादींचे हे वैचारिक लेखन दलित साहित्याचे बळ ठरते.

दलित साहित्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा लाभलेल्या तात्विक प्रेरणात्मक वारसा, वरील विचारवंतांनी भक्कमपणे सांभाळलेली वैचारिक साहित्यिक बाजू व निर्माण करीत असलेल्या कसदार, दर्जेदार कलाकृती यामुळे दलित साहित्य आज उच्च समजले जाणाऱ्या साहित्यपीठांच्या चर्चेचा, चिंतनाचा अभ्यासाचा विषय ठरावा यात नवल नाही. कधी नव्हे एवढी गंभीर अभ्यासपूर्ण चर्चा दलित साहित्यावर होऊ लागली आहे.

आणि साहित्याचे नोबेल पारितोषिक यापुढे जर भारतात कोणाला मिळेल तर तो दलित साहित्यिकच असेल असा आशावाद पुढे येऊ लागला आहे, यातच त्याची मौलिकता सिद्ध होते.

• • •





• दलित साहित्य हे दलित जाणिवेतून निर्माण झालेले एका नकाराचे व एका स्वीकाराचे साहित्य आहे.

• दलित साहित्य हे वर्ण व वर्गवादाच्या विरोधात वाङ्मयीन आवाज उठविते.

• समाजातील सामाजिक, आर्थिक विषमतेचा ते कडाडून विरोध करते व समतेचा तद्वतच माणसाच्या नीतीमान प्रवृत्तींचा ते स्वीकार करते.

• प्रत्येक माणसाच्या प्रगतीचा ते आलेख मांडते. म्हणूनच ते समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय आणि प्रज्ञा, शील, करूणा या मानवी मूल्यांचा भरभक्कमपणे पुरस्कार करते.

• दलित साहित्य हे समाजवादी, जीवनवादी, नीतीवादी, जडवादी भूमिका घेऊनच प्रकटते.

प्रबोधन प्रकाशन, नागपूर–४४० ००३